



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार २२ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## भारताला सर्वात मोठा झटका

# दुबई एअर शोदरम्यान भारताचे तेजस विमान कोसळले



**अबुदाबी/वृत्तसंस्था ::** दुबई एअर शोदरम्यान मोठा अपघात घडला असून एअर शो सुरू असताना भारतीय बनावटीचे तेजस लढाउ विमान क्रॅश झाले आहे. एअर शो सुरू असताना हे विमान क्रॅश होउन वेगाने खाली आले, घटनास्थळी धूर आणि आगीचे लोळ उठल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान या विमानाच्या पायलट ठार झाल्याची माहिती मिळाली आहे.समोर आलेल्या माहितीनुसार शुक्रवारी दुपारी दुबईमध्ये सुरू असलेल्या एअर शोदरम्यान हा अपघात घडला आहे, स्थानिक वेळेनुसार दुपारी दोन वाजून दहा मिनिटांनी हा अपघात घडला आहे.एअर शो सुरू असतानाच ही दुर्घटना घडली आहे. हे विमान अचानक जमिनीच्या दिशेने तीव्र वेगात खाली आले आणि कोसळले. घटनास्थळावरून मोठे आगीचे आणि धुराचे लोट उठल्याचे पाहायला मिळाले. घटनेबाबत अधिक माहिती अशी की एअर शो सुरू असतानाच हा अपघात घडला आहे, तेजस हे भारताचे स्वदेशी बनावटीचे लढाउ विमान आहे. या विमानाला माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी तेजस असं नाव दिले होते. या अपघातात भारतीय बनावटीचे लढाउ विमान कोसळल्याने हा आता भारतासाठी मोठा धक्का मानला जात आहे. दरम्यान हा एअर शो पहाण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती, यामध्ये लहान मुलांचादेखील मोठ्या संख्येने समावेश होता. अपघात होताच बचाव पथक घटनास्थळी पोहोचले. गर्दीला अपघात स्थळापासून पांगवण्यात आले आहे. दरम्यान या विमानात असलेल्या पायलटबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळू शकलेली नाहीये, त्याचा शोध सुरू आहे. दुबई एअर शोचा एक व्हीडीओ चांगलाच व्हायरल झाला होता, ज्यामध्ये तेजस एमके१ मधून इंधनाची गळती होत असल्याचे दिसून येत होते, मात्र हा व्हीडीओ बनावट असल्याचे फॅक्ट चेकमधून समोर आले होते.

## ● चिमुकलीवर अत्याचार ● मालेगावात मोर्चेकरी आक्रमक

# कोर्टात शिरण्याचा प्रयत्न, पोलिसांसोबत धुमश्चक्री



राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे देखील मोर्चात सहभागी झाले होते. फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून आरोपीला फाशी द्या, अशी त्यांनी मागणी केली.

**नाशिक /प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यामधील मालेगाव येथे साडेतीन वर्षीय चिमुकलीवर बलात्कार करत तिची हत्या करण्यात आली. या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा दिली पाहिजे अशी मागणी करत मोर्चा निघाला होता. या मोर्चामध्ये शालेय शिक्षण मंत्री दादा भुसेही सहभागी झाले. यावेळी सर्व मोर्चेकरी आक्रमक झाले होते त्यांनी कोर्टामध्ये शिरण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी लाठीचार्ज करत मोर्चेकरांना पांगवलं, कोर्टाच्या आवारात मोर्चेकरांनी चिमुकलीला न्याय मिळावा आणि आरोपीला फाशी देण्याची मागणी केली. पोलिसांनी कोर्ट परिसरामधून मोर्चेकरांना बाहेर करण्याचा प्रयत्न केल्यावर ते आक्रमक झाले. काही मोर्चेकरी कोर्टाच्या दारापर्यंत पोहोचले होते आणि त्यांनी आत जाण्याचाही प्रयत्न केला, तेव्हा पोलिसांनी खबरदारीने दरवाजा बंद करून घेतला. त्यानंतर मोर्चेकरी आणि पोलिसांमध्ये धुमश्चक्री झाल्याचं पाहायला मिळालं. या मोर्चामध्ये महिला वर्गही मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. पोलिसांनी परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधी बळाचा वापर करत त्यांना पांगवलं. नाशिक जिल्ह्यातील डोंगराळे गावातील साडे तीन वर्षाच्या चिमुरडीवर अत्यातार करत तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. १६ नोव्हेंबर रोजी चिमुकली घराच्या अंगणात खेळत होती, त्यावेळी गावातील २४ वर्षीय विजय संजय खैरनार याने तिला चाकलेटचे आमिष दाखवले. नराधमाने तिला एका टावरजवळ नेले, तिच्यावर अत्याचार करत तिची हत्या केली. पोलिसांच्या शोधमोहिमेत आरोपीही होता, त्यावेळी तपास सुरू असताना गावातील एका माहिलेने नराधमासोबत चिमुकलीला टावरकडे जाताना पाहिले होते. त्यानंतर हे प्रकरण समोर आले आहे. सोशल मीडियावर तिचे फोटो व्हायरल झाल्यामुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे.

**मालेगाव अत्याचार प्रकरणी मनोज जरांगे यांचा सरकारला** ➪(पान २ वर)

## नगरसेवक पदासाठी 1 कोटी 3 लाखांची बोली!

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील राजगुरूनगर येथे नगरसेवक पदासाठी तब्बल १ कोटी ३ लाखांची, तर महिला नगरसेवक पदासाठी २२ लाखांची बोली लागल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. आज अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने काही जण बिनविरोध झाल्यास त्यांच्याकडे संशयाने पाहिले जाउ शकते, अशीही चर्चा रंगत आहे.

मुळातच अशा प्रकारची बोली लावण्याची प्रथा लोकशाहीसाठी घातक असल्याचे नागरिकांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोग याकडे किती गांभीर्याने लक्ष देणार, हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू असताना राजगुरूनगर नगरपरिषदेत कोट्यवधींची




बोली लावल्याची माहिती वा-यासारखी पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात पसरली आहे. मात्र, संबंधित प्रभाग कोणता याबाबत स्पष्ट माहिती अद्याप समोर आलेली नाही. बोलीतून आलेल्या रकमेतून शहराचा विकास करावा, असा एकमुखी निर्णय झाल्याचेही काहीजण बोलत आहेत. विरोधकही या विषयावर बोलण्यास टाळाटाळ करत असून, आपापसात साटलोट झाल्याची चर्चा फिरत आहे. परंतु नगरसेवक पदासाठी १ कोटी ३ लाखांची बोली लागते, हे निश्चितच लोकशाहीला धोकादायक आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने याबाबत तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. ही लोकशाहीची सरळसरळ थट्टा असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

## आता 1 वर्षानंतर मिळणार ग्रॅच्युइटी

केंद्र सरकारने कामगार कायद्यांमध्ये मोठा बदल करत 'फिक्स्ड टर्म एम्प्लाईज'साठी ग्रॅच्युइटी मिळवण्याची पात्रता कमी केली आहे. आता निश्चित मुदतीसाठी काम करणा-या कर्मचा-यांना ५ वर्षांऐवजी फक्त १ वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतरही ग्रॅच्युइटीचा लाभ घेता येणार आहे. सरकारने लागू केलेल्या नवीन कामगार संहिता सुधारणांचा हा एक भाग आहे. या निर्णयामुळे 'फिक्स्ड टर्म' करारावर काम करणा-या लाखो कर्मचा-यांसाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. आतापर्यंत, ग्रॅच्युइटीचा लाभ घेण्यासाठी कर्मचा-याला एकाच संस्थेत सलग ५ वर्षे सेवा पूर्ण करणे अनिवार्य होते. मात्र, नवीन नियमांनुसार, 'फिक्स्ड टर्म' कर्मचा-यांसाठी ही ५ वर्षांची कालमर्यादा पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.

# देशात चार नवीन कामगार संहिता लागू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**केंद्र सरकारने आज एक मोठा निर्णय घेतला आहे. देशात नवीन श्रम संहितालागू करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे देशभरातील कामगारांना मोठा फायदा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. गेल्या काही दिवसांपासून देशात नवीन कामगार संहिता अर्थात लेबर कोड लागू करण्याची प्रक्रिया सुरू होती.






त्यानंतर आज (२१ नोव्हेंबर) अखेर केंद्र सरकारने नवीन कामगार संहिता लागू करण्याची घोषणा केली आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाची माहिती केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्सवर (ट्विटर) दिली आहे. आता नवीन संहितेमुळे तब्बल ४० कोटी कामगारांना सुरक्षा कवच देण्यासह सर्व कामगारांना वेळेवर आणि किमान वेतनाची हमी देण्यात आली असल्याचं मंत्री मनसुख मांडविया यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. केंद्र सरकारने आजपासून लागू केलेल्या नवीन कामगार संहितांमध्ये वेतन संहिता (२०१९), औद्योगिक संबंध संहिता (२०२०), सामाजिक सुरक्षा संहिता (२०२०) आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि➪(पान २ वर)

# आता पीक विम्यात दोन प्रकारच्या नुकसानीचा समावेश-केंद्रीय कृषिमंत्री

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकरी अतिवृष्टीसह इतरही नुकसणीपासून त्रस्त आहेत. नुकतेच माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतक-यांचा मोठा मोर्चा कर्जमाफीसह इतर मागण्यांसाठी निघाला होता. त्यातच केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शेतक-यांच्या विम्याबाबत नवीन सुधारणा केल्याची माहिती दिली.



नागपुरात एग्रो व्हिजन कार्यक्रमासाठी शिवराज सिंह चौहान शुक्रवारी आले होते. त्यानिमित्त नागपूर विमानतळावर सिंह यांनी पत्रकारांशी संवाद साधला. शिवराज सिंह चौहान म्हणाले, पिक विम्यामध्ये जे नियम होते त्यात आणखी दोन प्रकारच्या नुकसानीचा समाविष्ट करण्यात आले आहे. शेतक-यांच्या मागण्या आणि देशातील परिस्थितीचा विचार करून केंद्र सरकारने हे दोन बदल केल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली.अतिवृष्टीमुळे शेतात साचलेल्या पाण्यामुळे झालेले नुकसान किंवा जंगली जनावरांमुळे शेतातील पिकांचे झालेले नुकसान-या दोन्ही बाबींमध्ये शेतक-यांना पिक विम्यातून नुकसानभरपाई मिळणार असल्याचे चौहान यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, बिहारमध्ये ज्या पद्धतीने महागठबंधनाला फटका बसला, त्यावरून सध्या तरी असे दिसत आहे की काँग्रेस ज्या- ज्या ठिकाणी स्थानिक पक्षांसोबत जाते, त्या त्या ठिकाणी त्या पक्षांचे अस्तित्व धोक्यात येते. अरविंद केजरीवाल यांच्यासोबत काँग्रेस गेली आणि त्यांचे नुकसान झाले. अखिलेश यादव यांच्यासोबत काँग्रेस गेली आणि त्यांनाही फटका बसला. म्हणूनच, ममता बॅनर्जी यांनी काँग्रेससोबत न जाणे योग्य ठरले असून त्यांचे अस्तित्व टिकून आहे, अशी प्रतिक्रिया शिवराज सिंह चौहान यांनी दिली. नवीन बदलामुळे वन्य प्राण्यांकडून होणा-या नुकसानीचा विमा कव्हर होणार आहे. भारतातील➪(पान २ वर)

## 20 वर्षांहून जुन्या वाहनांच्या फिटनेस टेस्ट शुल्कात 15 पट वाढ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने देशभरातील जुन्या आणि प्रदूषण करणा-या वाहनांना रस्त्यावरून हटवण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. २० वर्षांहून अधिक जुन्या व्यावसायिक आणि खासगी वाहनांसाठी आवश्यक असलेल्या फिटनेस चाचणी शुल्कात तब्बल १५ पट वाढ केली आहे. या नव्या शुल्क रचनेमुळे जुनी वाहने सांभाळणे अत्यंत महागडे होणार आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने जाहीर केलेल्या या सुधारित शुल्कामुळे, आता १० वर्षांपेक्षा जुन्या सर्व



प्रवासी आणि व्यावसायिक वाहनांवर अधिक शुल्क लागू होईल. ➪(पान २ वर)

## पेट्रोल, डिझेलच्या कारवर बंदी येण्याची चिन्हे!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाने सल्ला दिला की, पेट्रोल आणि डिझेलवर चालणा-या महागड्या लक्झरी गाड्यांवर टप्प्या टप्प्याने बंदी घालण्याचा विचार होणे गरजेचे आहे. देशात सध्या इलेक्ट्रानिक गाड्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र तरी देखील लोकं अजूनही मोठ्या सेग्मेंटमधील गाड्यांसाठी पारंपरिक पेट्रोल आणि डिझेलवर चालणा-या गाड्यांनाच पसंती देत आहेत. दरम्यान, सेंटर फार पब्लिक इंट्रेस्ट लिटिगेशनच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने पेट्रोल डिझेलवर चालणा-या महागड्या वाहनांवर बंदी घालण्याबाबत हा सल्ला दिला. या याचिकेत➪(पान २ वर)




## पाक अरबी समुद्रामध्ये 25 तेलविहीरी खोदणार

***इस्लामाबाद/वृत्तसंस्था-***पाकिस्तान अरबी समुद्रात पहिले कृत्रिम बेट बांधण्याची योजना आखत आहे. शाहबाज सरकारने अरबी समुद्रात या बेटाच्या बांधकामाला मान्यता दिली आहे. समुद्रात तेल शोधण्यासाठी कायमस्वरूपी व्यासपीठ म्हणून याचा वापर केला जाईल. हा प्रकल्प पाकिस्तान पेट्रोलियम लिमिटेड (पीपीएल) द्वारे चालवला जाईल. ट्रम्प यांचा पाठिंबा मिळाल्यानंतर पाकिस्तानने हा निर्णय घेतला. जुलैमध्ये ट्रम्प यांनी घोषणा केली की, अमेरिका आणि पाकिस्तान संयुक्तपणे पाकिस्तानच्या विशाल तेल साठ्यांचा विकास करतील. त्यांनी असेही म्हटले की, जर हे तेल सापडले तर भारत ते खरेदी करू शकेल. आता पाकिस्तान या कृत्रिम ➪(पान २ वर)



# अग्निशामक अधिकाऱ्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

## -राजेश मोहन आत्महत्या प्रकरण, -कुटुंबीयांचा इर्विन चौकात रास्ता रोको -आरोपींच्या अटकेची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-**

महापालिकेच्या अग्निशमन विभागात फायर फायटर म्हणून कार्यरत राजेश वासुदेव मोहन यांच्या आत्महत्या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी अग्निशमक अधीक्षक संतोष केंद्रे (वय ३२) , मुख्य अग्निशामक अधिकारी लक्ष्मण पावडे (वय ५०) व खाजगी सावकार रामकृष्ण शिंदे यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. मृतक राजेश मोहन यांची पत्नी शितल यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेश मोहन यांच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांनी आज शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी इर्विन चौकात रास्ता रोको आंदोलन करून प्रशासनाच्या विरोधात आक्रोश व्यक्त केला. दोषी अधिकाऱ्यांवर ॲक्ट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. दीड तासा पर्यंत हे रास्ता रोको आंदोलन सुरू होते. बडनेरा चे ठाणेदार सुनील चव्हाण यांच्या आश्वासनानंतर कुटुंबीयांचा आक्रोश शांत झाला. आंदोलनामुळे वाहतुकीवर परिणाम झाला होता.

माहितीनुसार मोहन कुटुंब एमआयडीसी फायर ब्रिगेड कार्यालय बडनेरा येथील सरकारी वसाहतीत राहत होते. मृतक राजेश मोहन यांची पत्नी शितल यांच्या तक्रारीनुसार तिन्ही आरोपी त्यांच्या पतीला शारीरिक व मानसिक त्रास देत होते. यामुळे त्यांना गुरुवारी विष प्राशन करून आत्महत्या करावी लागली. अग्निशमन अधीक्षक संतोष केंद्रे यांनी मोहन राहत असलेले क्वार्टर खाली करण्याचे आदेश बजावले होते. विभागातील सोसायटी बंद केली होती. राजेश मोहन यांचे पगाराचे बेसिक आकृतीबंध आराखडा या संदर्भात हायकोर्टात प्रकरण दाखल केले होते. त्यावरून त्यांना जातीवरून शिविगाळ करणे, विनाकारण त्यांना कामावरून सस्पेंड करण्यात आले होते. लक्ष्मण पावडे हा संतोष केंद्रे यांचे सूचनेनुसार काम करीत होता. राजेश मोहन यांना मानसिक त्रास देत होता. त्याच प्रमाणे रामकृष्ण शिंदे यांच्या कडून मोहन यांनी उसनवारीचे कर्ज घेतले होते. ते कर्ज परत करणेसाठी रामकृष्ण शिंदे हा सतत त्याना तगादा लावत होता. गुरुवारी राजेश मोहन सकाळी १० वाजता ड्युटीसाठी अग्निशामक विभाग बडनेरा येथे गेले होते. यावेळी तिन्ही आरोपींच्या त्रासाला कंटाळून त्यांनी कीटनाशक विष प्राशन केले. त्यांना गंभीर अवस्थेत जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.उपचारादरम्यान त्यांचा रात्री मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांनी आज जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात आक्रोश केला. आरोपींवर ॲक्ट्रॉसिटी नुसार गुन्हा दाखल करून त्यांना तत्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. पोलिसांच्या आश्वासनानंतर कुटुंबीयांचा आक्रोश शांत झाला. या प्रकरणात बनडेरा पोलीस पुढील तपास करीत आहे.

# अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्ष निवडणुकीत सात उमेदवार रिंगणात

**अचलपूर/प्रतिनिधीः-**

अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रीय व राज्यस्तरावरील विविध पक्षांकडून एकूण सात उमेदवार रिंगणात आहे . काल २१ नोव्हेंबर रोजी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम तारीख होती. यामध्ये एकूण सहा उमेदवारांनी नगराध्यक्ष पदाचे नामनिर्देशन पत्र मागे घेतलेले आहे. यामुळे अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्ष पदी कोण आरुढ होणार? याकडे समस्त जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

एकीकडे अचलपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रीय पक्षांना नगरसेवक पदाच्या निवडणुकीत बंडखोरीचा फटका बसण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. तर दुसरीकडे काँग्रेस पक्षाचा उमेदवार अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी रिंगणात असून त्यासोबत एमआयएम पक्षाकडून सुद्धा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार रिंगणात असल्याने काँग्रेस पक्षाच्या मताचे समीकरण यंदा बिघडणार ? ही शक्यता निर्माण झालेली आहे . अचलपूर नगर परिषद नगरसेवक पदाच्या निवडणुकीमध्ये सुद्धा युवा स्वाभिमान पक्षाचे इच्छुक उमेदवार रिंगणात असल्याने याचा फटका सुद्धा भाजपाला बसणार का ? असे



अनेक विविध समिकरण घडत असलेल्या घडामोडीमुळे निर्माण झालेले आहे . आता लवकरच प्रचाराचा बिगुल वाजणार आहे. आणि काही दिवसावरच अचलपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानाची तारीख आलेली आहे. यामुळे अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी व नगरसेवक पदासाठी विविध राष्ट्रीय व राज्य पातळीवरील पक्षांकडून रिंगणात असलेल्या उमेदवारांनी मोर्चे बांधणी , प्रचार ,भेट ,सोशल मीडियावर प्रचाराची रणधुमाळी सुरू केलेली आहे. यामध्ये नेमका कोण बाजी मारणार ? हे येत्या ३ डिसेंबर रोजी स्पष्ट होणार आहे . काल २१ नोव्हेंबर रोजी अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी एकूण सहा उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र मागे घेतलेले आहे .यामध्ये दिपाली कुंदन यादव,प्रतीक्षा राम ठाकरे, श्वेता चेतन शर्मा, विनिता धर्मा, सरबत अंजुम मोहम्मद साजिद, ममता राजेश सुंडेवाले यांचा समावेश आहे. तर आता अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पक्षाकडून रुपाली अभय माथने ,शिवसेना उ.बा.ठा गटाकडून राधिका अरुण घोटकर,प्रहार जनशक्ती पक्षाकडून सारिका अनिल पिंपळे, काँग्रेस पक्षाच्या वतीने नुरूस सबहा एहतेश्याम नबिल,एमआयएम कडून शबाना बानो गुल हुसैन, शिवसेना शिंदे गटाकडून रेखा जीयालाल गड्रेल व अपक्ष उमेदवार म्हणून पर्वणी सुनील बावणे रिंगणात आहे. त्यासोबत २१ नोव्हेंबर पर्यंत नगरसेवक पदासाठी एकूण २८ उमेदवारांनी विविध प्रभागातून नामनिर्देशन पत्र मागे घेतलेले आहे . अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातून २० प्रभागातून ४१ नगरसेवक व जनतेमधून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची निवड केली जाणार आहे . अचलपूर परतवाडा जुळ्या शहरात ११२ मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया पार होणार आहे. यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव,तहसीलदार संजय गरकल,अचलपूर नगरपरिषद प्रशासक धीरज कुमार गोहाड यांच्या मार्गदर्शनमध्ये सर्व निवडणूक तयारी अंतिम टप्प्यात आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### कोर्टात शिरण्याचा प्रयत्न,

**महाराष्ट्र बंदचा इशारा** पीडित मुलीचा सातव्या महिन्यात तिचा जन्म झाला होता, तिचे वजन ९०० ग्रॅम होते. त्यावेळी डाक्टर आणि कुटुंबांच्या प्रयत्नामुळे तिला वाचवण्यात आलं होतं. मात्र आता साडेतीन वर्षाची असताना नराधमाने तिला संपवलं. आरोपीला कोर्टात हजर करण्याच्या मार्गावर नागरिक जमले होते, त्यामुळे आरोपीला व्ह द्वारे हजर करण्यात आलं. आरोपीला २७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### देशात चार नवीन कामगार

कामाच्या परिस्थिती (OSHWC) संहिता (२०२०) या संहिता लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**नवीन कामगार संहितेतील महत्वाचे मुद्दे** -सर्व कामगारांना वेळेवर किमान वेतनाची हमी, तरु णांसाठी नियुक्ती पत्रांची हमी, महिलांना समान वेतन आणि आदराची हमी

-४० कोटी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा हमी

-कर्मचा-यांना एक वर्षानंतर ग्रॅच्युइटीची हमी

-४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांना वार्षिक मोफत आरोग्य तपासणीची हमी

-ओव्हरटाईमसाठी दुप्पट वेतनाची हमी

-धोकादायक क्षेत्रातील कामगारांसाठी १०० टक्के आरोग्य सुरक्षेची हमी

-आंतरराष्ट्रीय मानकांनुसार कामगारांसाठी सामाजिक न्यायाची हमी

दरम्यान, सरकारच्या या निर्णयाबाबत मंत्री मनसुख मांडविया यांनी म्हटलं की, ही सुधारणा केवळ एक बदल नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कामगारांच्या कल्याणासाठी घेतलेला एक ऐतिहासिक निर्णय आहे. या नवीन कामगार सुधारणा आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक महत्त्वाचं पाउल आहेत आणि विकसित भारत २०४७ च्या ध्येयाला नवीन चालना देतील.

***पंतप्रधान मोदींनी काय म्हटलं?***

माझ्या कामगार बंधू आणि भगिनींसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे. आज आमच्या सरकारने चार कामगार संहिता लागू केल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर कामगारांच्या हितासाठी हा सर्वात मोठा निर्णय आहे. यामुळे देशातील कामगारांना मोठ्या प्रमाणात सक्षमता मिळेल. तसेच यामुळेव्यवसाय सुलभतेला देखील चालना मिळेल. काम करणा-या बंधू आणि भगिनींसाठी सामाजिक सुरक्षा, वेळेवर वेतन आणि सुरक्षित कार्यस्थळ सुनिश्चित करण्यासाठी या संहिता महत्वाच्या ठरतील. माता, बहिणी आणि तरु णांना त्यांचा विशेषत? फायदा होईल. या सुधारणांमुळे एक मजबूत परिसंस्था निर्माण होईल जी भविष्यात आपल्या कामगारांच्या हक्कांचे रक्षण करेल आणि भारताच्या आर्थिक विकासाला नवीन चालना देईल. यामुळे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतीलच, त्याशिवाय उत्पादकताही वाढेल. विकसित भारताकडे आपला प्रवासही वेगवान होईल, असंही मोदींनी म्हटलं आहे.

### आता पीक विम्यात

ग्रामीण भागात हत्ती, रानडुक्कर, नीलगाय, हरीण आणि माकडे या वन्य प्राण्यांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. आतापर्यंत हे नुकसान विमा योजनेच्या कक्षेबाहेर होते. मात्र आता हे नुकसान स्थानिक आपत्ती या श्रेणीतील अतिरिक्त विमा कवचात समाविष्ट करण्यात आले आहे. यामुळे, जंगलालगतची गावे, डोंगराळ प्रदेश वनक्षेत्रांजवळील भाग या ठिकाणच्या शेतक-यांना मोठा फायदा मिळणार आहे.

### २० वर्षांहून जुन्या वाहनांच्या

**वाहन श्रेणीपूर्वीचे शुल्क** (१५ वर्षांहून अधिक) नवे शुल्क (२० वर्षांहून अधिक)वाढ (सुमारे)

**हलके मोटार वाहन (कार)** - ६०० ते रु पये १,००० नवे दर १५,००० १५ पट

**तीन-चाकी** -४०० ते ६०० रु पये ७,००० १२ पट

**जड माल/प्रवासी वाहन**-(बस/ट्रक) २,५०० चे २५,००० १० पट

**शुल्क वाढीची प्रमुख कारणे**

मंत्रालयाच्या माहितीनुसार, असुरक्षित आणि अधिक प्रदूषण करणा-या वाहनांना टप्प्याटप्प्याने स्क्रॅप करणे हा या शुल्क वाढीमागील मुख्य उद्देश आहे. वाहने जुनी झाल्यावर यांत्रिकरित्या कमकुवत होतात आणि पर्यावरणाचे प्रदूषणही वाढवतात.

**दुचाकींचे शुल्क तिप्पट**

या वाढीव शुल्काचा परिणाम केवळ फिटनेस चाचणी शुल्कावरच नव्हे, तर वाहन फेल झाल्यास पुनः तपासणी शुल्कावरही होणार आहे. त्यामुळे, जुन्या वाहनांचे मालक आता नवीन, कमी प्रदूषण करणारे म?डेल्स घेण्यास प्रेरित होतील, अशी सरकारची अपेक्षा आहे.

### पेट्रोल, डिझेलच्या कारवर

प्रशांत भूषण यांनी युक्तीवाद केला होता. याचिकेत सरकारने सध्याची ईव्ही धोरणं वास्तवात सक्तीने लागू करावीत यामुळं इलेक्ट्र?लिक गाड्यांच्या वापराला प्रोत्साहन मिळेल असे म्हटले होते. दरम्यान, जस्टिस सूर्यकांत आणि जस्टिस बागची यांच्या बेंचने म्हटले की, याची सुरू वात ही पेट्रोल, डिझेलवरील गाड्यांवरील बंदीवरू न होउ शकते. न्यायालयाच्या मते व्हीआयपी आणि मोठी क?र्पोरेट घराणी गाडी खरेदी करताना त्यात जे काही पाहतात त्या सर्व सुविधा आता मोठ्या इलेक्ट्रिकल गाड्यांमध्ये देखील येत आहेत. त्यामुळे आता महागड्या पेट्रोल डिझेलवरील गाड्या टप्प्या-टप्प्याने हटवल्या तर सामन्य जनता देखील प्रभावित होणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान अट?र्नी जनरल आर. व्यंकटरमणी यांनी ईव्ही वाहन धोरणावर केंद्र सरकारचे १३ मंत्रालय काम करत आहेत, असे म्हटले तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने केंद्राचे याबाबत सर्व धोरणे, नोटिफिकेशन आणि प्रगतीचा एक सविस्तर रिपोर्ट सादर करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने सध्याची ईव्ही प?लिसी ही ५ वर्षे जुनी आहे. आता त्याची पडताळणी करण्याची गरज आहे. याबाबत आता ४ आठवड्यांनी सुनावणी होणार आहे.

### पाक अरबी समुद्रामध्ये

बेटाच्या मदतीने अरबी समुद्रात २५ तेल विहिरी खोदण्याची योजना आखत आहे. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, हे कृत्रिम बेट सिंधच्या किना-यापासून सुमारे ३० किमी अंतरावर, सुजावल क्षेत्राजवळ बांधले जात आहे. सुजावल कराचीपासून अंदाजे १३० किमी अंतरावर आहे. समुद्राच्या उंच लाटांपासून बचाव करण्यासाठी बेट ६ फूट उंचावले जात आहे. अहवालानुसार, साठ्यांवरील संशोधन पूर्ण करण्यासाठी अंदाजे रु. ४२,००० कोटी खर्च येईल. त्यानंतर, समुद्राच्या खोलीतून तेल काढण्यासाठी ४-५ वर्षे लागू शकतात. जर संशोधन यशस्वी झाले, तर तेल आणि वायू काढण्यासाठी विहिरी खोदण्यासाठी आणि इतर पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आणखी पैशांची आवश्यकता भासू शकते.

### भव्य कृषी मेळावा आणि उत्कृष्ट

शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. शासन सक्षमपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. ३० जून २०२६ पूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अमरावती जिल्ह्याला ५१८ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. लवकरच पात्र शेतकऱ्यांना सर्व लाभ मिळवून देण्यात येतील. शेतकरी बांधवांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. शेतकऱ्यांनीही जास्तीत-जास्त शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी मंत्री श्री. भरणे यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्षिप्रा मानकर यांनी केले .यावेळी शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

### मनोज देशमुख यांचा समर्थकांसह

गावातील बरेचसे मंडळी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट मध्ये मनोज देशमुख सहकार नेते यांच्यासोबत हजारो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटमध्ये दत्तात्रय मामा भरणे कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. त्यामध्ये प्रामुख्याने मनोज देशमुख यांच्यासह मंगेश काळमेघ , अलका देशमुख, अक्षय भुयार, मुसाविर खा पठाण अल्पसंख्यांक नेते, संजय भुयार, संजू भोवाळू शिल्पा तुषार खवले, भावनाताई,काळमेघ, रोशन लोखंडे, शिवसेना नेते पंकज निंभोरकर, प्रवीण ,अनुप मस्के ,सुरज फरतोडे व सहकारी विश्वजीत देशमुख व सहकारी ईसोमोदीन ग्रामपंचायत सदस्य शिराळा, शहजाद पठाण माजी ग्रामपंचायत सदस्य, तुषार खवले, राजू केने, गौरव अलोने, ऋषिकेश , कीर्ती जवंजाळ, निलेश अशाप्रकारे हजारोच्या संख्येने पक्षप्रवेश करण्यात आला. त्यामध्ये मनोज देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. दत्तामामा भरणे कृषिमंत्री यांनी जनतेला संबोधित केले व विकासाचा पाया समजावून सांगितला. त्यानंतर आमदार सुलभा खोडके, आमदा संजय खोडके, संतोष महात्मे यांची सभेमध्ये भाषणे झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिप्रा मानकर यांनी तर आभार प्रदर्शन कैलास देशमुख यांनी केले.

### महापालिकेची प्रारूप मतदार यादी

उपलब्ध आहे. यावर काही आक्षेप असल्यास मनपा मध्ये २७ नोव्हेंबर पर्यंत अर्ज दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे महानगरपालिके ने घोषित केलेल्या यादीमध्ये प्रभाग, त्यांचे परिसीमन, प्रभागांमध्ये सहभागी क्षेत्रांचे नावांचाही उल्लेख आहे. या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या मतदारांचे नावे सुद्धा प्रारूप यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. नागरिकांना यादी पाहिल्यानंतरच योग्य माहिती मिळू शकते अशा रिते ही यादी तयार करण्यात आलेली आहे. आगामी निवडणुकीच्या दृष्टीने प्रशासन सज्ज झाले आहे.

### कृषी मंत्र्यांच्या ताफ्याला काँग्रेसने

दिले होते ते अजून पर्यंत पूर्ण नाही झाले. यामुळे कार्यकर्त्यांनी रोष व्यक्त केला. काळे झेंडे दाखवणा-यांमध्ये निलेश गुहे, नितीन काळे, वैभव देशमुख, अनिकेत डेंगरे, संकेत कुलट सह काँग्रेस कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

### नांदगाव नगरपंचायत निवडणूकः

नगरसेवक पदासाठी उमेदवारी दाखल केलेल्या दिपाली सतीश डकरे प्रभाग ७ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, प्रीतम अंकुश पकडे प्रभाग ४ अपक्ष, तिडके बेबी विजय प्रभाग ३ अपक्ष, सोनोने सोनाली उमेश प्रभाग १० अपक्ष, सुलताना बानो म. सलीम प्रभाग १० एनसीपी, या पाच उमेदवारांनी नगरसेवक पदाची उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे आता १७ प्रभागातून एकूण १७ जागेसाठी ७३ उमेदवार रिंगणात कायम आहे तर नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवार रिंगणात कायम असल्याची माहिती नगरपंचायत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिले. आता निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असल्याने राजकीय वातावरण तापायला लागले. २६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्ह देण्यात येणार असून २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे प्रचाराला उमेदवाराला फक्त चार दिवसच मिळणार आहे.

### लोकसभा, विधानसभेला मुभा,

घराजवळ कॉर्नर सभा होत आहे.त्याचेही घरटॅक्स भरने बंधनकारक असल्याचे निवडणुक विभागाने दिलेल्या समंती पत्राच्या अर्जात उल्लेख असून उमेदवाराने झेंडे,बॅनर,कॉर्नर सभा घेण्यासाठी प्रत्येक ठिकानी जर उमेदवाराला त्या घरमालकाचा टॅक्स भरावा लागला तर शहरात फक्त श्रीमंत व्यक्तीच आपले फलक,झेंडे लावू शकतात. त्यामुळे हा गोर गरीब उमेदवार व पक्षावर अन्याय असून लोकशाही संपवण्याचा आयोगाचा प्रयत्न असल्याचे एमआयएम चे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनीत डोंगरदिवे यांनी पत्रकार परीषदेत सांगुन आयोगाने ही जाचक अट एका दिवसात रद्द न केल्यास आयोगाविरोधात आंदोलन छेडण्याचा ईशाराही त्यांनी दिला.

यावेळी पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष सै.मुजीब सै.रफीक,सै.नाजीमोद्दीन, माजी नगरसेवकरहीम भाई,ॲड. मुजाहीद शेख,मो.नीसाख,विश्वास इंगळे,मो.जुबेर,मो.युनूस उपस्थित होते.

**निर्देशा प्रमाणे न.प. निवडणुकीचे कामकाज-** नगरपालिका निवडणूक संदर्भातील सर्व काम तसेच परवानगी पत्राचा नमुना हा निवडणुक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे तयार केलेला आहे. निवडणुक ही आयोगाच्या नियमाप्रमानेच होत असल्याचे सहा.निवडणुक निर्णय अधिकारी तथा अंजनगाव नगरपालिकेचे मुख्य अधिकारी विजय लोहकरे यांनी सांगीतले.

### लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर

विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार तिची गाडगे नगर परिसरात राहणाऱ्या आरोपी मंगेश खेडकर याच्याशी ओळख होती. खेडकर ने २०१९ मध्ये महिलेला लग्नाचे आमिष देऊन तिच्यासोबत शारीरिक संबंध स्थापित केले. गेल्या चार वर्षापासून अत्याचाराचे हे सत्र सुरू आहे. यादरम्यान आरोपीने तिचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ काढले. हे व्हिडिओ-फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन मंगेश खेडकर ने तिला ब्लॅकमेल केले आणि तिच्याकडून पैसे उकळले. आरोपी एवढ्यावरही नाही थांबला तर त्याने १५ नोव्हेंबर रोजी पिडितेला पिस्तुल दाखवली आणि फ्लॅट आपल्या नावावर करण्यास सांगितले अन्यथा तिला आणि तिच्या मुलीला ठार मारण्याची धमकी दिली. यामुळे घाबरलेल्या महिलेने गाडगे नगर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. पोलिसांनी कलम ६४(१),६४(२),(एम), ३०४,३३६(३),३४०(२),३५१(२) व आर्म ॲक्ट ३/५ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### धामणगाव रेल्वे नगर परिषद

चे माजी नगरसेवक विनोद तलवारे यांनी नगरसेवक पदाकरिता नामांकन दाखल केले होते तर प्रभाग क्रमांक ५ (ब) मधून प्रवीण इंगळे यांनी सुद्धा नगरसेवक पदाकरिता आपला अपक्ष उमेदवारी अर्ज केला दाखल होता.

गुरुवारी अर्ज माघारीच्या दुसऱ्या दिवशी सदरचे दोन्ही अर्ज उमेदवारांनी मागे घेतले आहेत.या नामांकनाच्या माघारीमुळे संबंधित प्रभागातील निवडणुक समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात असून उर्वरित उमेदवारांच्या प्रचाराला आता वेग आला आहे.आज शुक्रवार (ता.२१) उमेदवारी माघार घेण्याचा शेवटचा दिवस असून उबाठा गटाच्या ३ उमेदवारांनी अंतिम क्षणी माघार घेतली तर दुसरीकडे अंतिम उमेदवार यादी जाहीर होण्यापूर्वी आणखी काही घडामोडी घडण्याची शक्यता स्थानिक राजकीय वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

प्रभाग क्र.२ मधून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विनोद तलवारे मागील १० वर्षांपासून नगरसेवक होते.भाजपाच्या हेमकरण कांकरिया यांनी सुद्धा याच प्रभागातून उमेदवारी मिळवल्याने मित्रपक्षांची युती तुटल्याचे दिसून येत होते.मात्र विनोद तलवारे यांनी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते यांच्याशी चर्चा करून त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांसोबत चर्चा करून महायुतीचे पालन करावे असे सुचविले. त्यामुळे नामांकन अर्ज मागे घेण्यात आले. अर्ज माघार घेतल्याने या प्रभागातील मैत्रीपूर्वयुती कायम असल्याचे चित्र आहे.सोबतच विनोद तलवारे यांनीसुद्धा पक्षाचा युतीधर्म पाळण्याचा आदेश झाल्याने माघार घेल्याचे सांगितले आहे.

### वाईन शॉपच्या आड बारमध्ये

दारू, बॅच नंबरचा टीपी पास नाही, सरकारी वेबसाइटवर नोंद नाही, म्हणजे थेट गोरखधंदाच सुरु होता. व्यवहाराचा पत्ता नसल्याने सरकारचा वॅट, एक्साइज आणि इतर करांचा कोट्यवधी महसूल बुडतो.

**जनतेच्या आरोग्याशी भयंकर खेळ!**-नामांकित ब्रँडच्या नावावर बनावट आणि निकृष्ट माल विक्री होत असल्याने दारू पिणाऱ्यांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे. तरीसुध्दा एक्साइज विभागाला गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. उत्पादन शुल्क विभागाने काही बारमध्ये धाडी टाकल्या. तेथे इनव्हॉइस आणि बॅच नंबरमध्ये तफावत आढळून आले आहेत. पण माफियावर कारवाईचा एकही ठोस निर्णय नाही.

**चिरिमिरीचा संशय-** उत्पादन शुल्क विभागाने काही बारवर धाड टाकली. तपासात इनव्हॉइसवरील बॅच नंबर आणि बाटल्यांवरील नंबर वेगळे आढळले. बार मालकाने तक्रार दिल्यानंतर हा प्रकार प्रकाशात आला. तक्रार आणि धक्कादायक पुरावे समोर असूनही संबंधित विभागाने अद्याप मोठी कारवाई केलेली नाही. त्यामुळे शहरात चर्चा आहे की माफियाकडून 'चिरीमिरी' झाल्यामुळे प्रकरण दडपले जात आहे काय? यापूर्वीही तक्रारी दाबल्या गेल्या, एका बारमध्ये बनावट स्टॉक मिळाला, पण तक्रार नंतर मिटवण्यात आली. दुसऱ्या ठिकाणी २००-३०० क्वार्टर जप्त झाले, तरीही आरोपीने पैशांनी प्रकरण थांबवल्याची माहिती आहे. अमरावतीत बनावट दारूचा हा धंदा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. माफियाविरोधात कठोर कारवाई होणार का याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### दर्यापूर नगरपरिषद निवडणूक ः

क्र.१२ अ (युवा स्वाभिमानी पार्टी), मंदा बाबुलाल ढोके प्रभाग क्र.३ अ (अपक्ष), अष्टशिला इश्वर सावळे प्रभाग क्र.३ अ (अपक्ष) , पूजा राहुल कुऱ्हाडे प्रभाग क्र.१२ ब ( अपक्ष), तौफिक शाह ताहेर शाह प्रभाग क्र.४ ब ( अपक्ष ) या सर्व सात उमेदवारांनी निवडणुकीचे मैदान सोडले असून आता सात नगराध्यक्षांसह एकूण १२ प्रभागात आता १२० उमेदवार या नगरपरिषद निवडणुकीत कायम राहणार आहेत.

### औषध विक्रेत्याला ३०.४० लाखांनी

मिळवण्याचे आमिष देण्यात आले. यावरून रवींद्र शिंगाडे यांनी ३० लाख ४३ हजार ३७८ रुपयांची गुंतवणूक केली. पैसे गुंतवल्यानंतर ते विड्रॉल नाही झाले. यानंतर शिंगाडे यांनी त्या मोबाईल नंबर वर फोन लावला , तर तो नंबर ही बंद होता. त्यामुळे आपल्याला फसविण्यात आले असे त्यांना वाटले आणि त्यांनी तात्काळ सायबर पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### ६४ व्या हौशी मराठी राज्य नाटय

घर सोडून जातो आणि किन्नर समूहात सामील होतो. या पार्श्वभूमीवर आधारित कथानकात मग किन्नरांचा प्रवेश होतो. किन्नरांच्या जीवनाची दुर्दशा सुद्धा कथानकाचा भाग होत जाते आणि तो मुलगा/ मुलगी शेवटी अत्याचाराला बळी पडून रेल्वे खाली जीव देऊन आपले जीवन संपवते. अशा कथानकाचे नाटक प्रेक्षकांची पसंती घेऊन गेले.

शुक्रवार दि. २१ रोजी हिंद मल्टिपर्पज फाउंडेशन या संस्थेने गणेश वानखेडे लिखित आणि तुषार स्वर्गीवकर दिग्दर्शित द वल्चर अँड द लिटिल गर्ल हे नाटक सादर करण्यात आले.केविन कार्टर यांनी १९९३ मध्ये एक फोटो काढला होता . मरणासन्न अवस्थेत असलेली एक लहान मुलगी आणि तिच्या मरणाची वाट बघणारे गिधाड असा तो फोटो होता. हा फोटो दि न्यू यॉर्क टाइम्स मधे प्रसिद्ध झाला आणि त्यानंतर अनेकांनी त्या फोटोवर टीका करताना फोटोग्राफरने फोटो काढत बसण्या पेक्षा त्या मुलीला वाचवण्याचा प्रयत्न न केल्याबद्दल त्याला दोषी ठरवले. या टीकेचा केविन कार्टर याचे मनावर एव्हढा परिणाम झाला की त्याने आत्महत्या केली.

या पार्श्वभूमीवर आधारित कथानक असलेल्या या नाटकातून लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभावर भाष्य करून समाजाला सत्याचा आरसा दाखवण्याचा प्रयत्न केल्या गेला आहे. मानसिक रुग्ण असलेला कथानायक इतर काल्पनिक पत्रांशी संवाद साधतो आणि प्रेक्षकांना अंतर्मुख करून जातो. या नाट्यकृतीत संजय काळे आणि तुषार स्वर्गीवकर यांनी भूमिका केल्या आहेत. फक्त दोनच कलावंत असलेल्या या नाटकाचे नेपथ्य - अरविंद वानखेडे, पार्श्व संगीत - गणेश वानखडे, प्रकाशयोजना - सौरभ शेंडे, रंगभूषा - जुनेद खान आणि वेशभूषा - डॉ. आशिष इखार यांनी केली आहे.

रसिक प्रेक्षकांना या सुसज्ज नाट्यगृहात अतिशय सुंदर वातावरणात नाट्यानुभव घेता येत आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे. या स्पर्धेमध्ये दि . २२ रोजी पंचशील बहुउद्देशीय संस्था निर्मित उत्तरायण हे नाटक सादर होईल.

राज्यनाट्य स्पर्धेतील सर्व नाटकांना जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित राहावे आणि हौशी रंगकर्मींचा उत्साह वाढवावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केलेले आहे.

या स्पर्धेकरिता तिकिटांचा दर अतिशय अल्प असून रोज रू.१०/- आणि १५/- फक्त असणार आहे. अशी माहिती स्पर्धा समन्वयक विशाल फाटे यांनी दिली आहे.

### अचलपुरात रेल्वे स्टेशन परिसरात

साथीदार देवानंद विजयराव बारखडे (२५, रा. बालाजी नगर, परतवाडा) सोबत एका जुन्या पडक्या क्वार्टरकडे पाठविले. बनावट ग्राहकाच्या इशाऱ्यानंतर पोलिसांनी तात्काळ छापा टाकला. त्यावेळी महिलेने ग्राहकाकडून व्यवहाराचे पैसे घेतले व ग्राहकासोबत देहव्यापारासाठी मुलगी पाठवली. त्याचवेळी दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. क्वार्टरमध्ये पोलिसांनी बनावट ग्राहक आणि त्या मुलीसह पाहणी केली. चौकशीत मुलीनेही दोन्ही आरोपींनी देहव्यापारासाठी तिला बोलावल्याचे सांगितले. त्यांच्या ताब्यातून रोख, दोन मोबाईल आणि इतर साहित्य असा एकूण ३३,०३० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणात दोन्ही आरोपींवर अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ३, ४, ५ आणि ७ अंतर्गत अचलपुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकजकुमार कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलढाणा

■ शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# सरळसेवा भरती घोटाळा दडपण्यासाठी तिघांचे बळी?

## -प्रदेश प्रवक्ते ॲड. फैजान मिर्झा यांचा गंभीर आरोप
## -डॉ. भंडारी– डॉ. गाढवे यांच्यावर तात्काळ कारवाई करा

■ प्रतिनिधी | अकोला ■

***अकोला : आरोग्य विभागातील सरळसेवा भरती २०२४ मधील कथित घोटाळा जनतेच्या नजरेपासून लपवण्यासाठी आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कट रचला असून, निर्दोष तिघा अधिकाऱ्यांना निलंबनाच्या खाईत ढकलल्याचा सनसनाटी आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रदेश प्रवक्ते ॲड. फैजान मिर्झा यांनी केला आहे.***

ॲड. मिर्झा यांनी थेट तत्कालीन आरोग्य उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी आणि जिल्हा परिषद अकोल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गाढवे यांच्यावर आरोपांची मालिका झोडली. 'जनतेपर्यंत सरळसेवा भरती घोटाळा पोहोचू नये म्हणून या दोन्ही अधिकाऱ्यांनी सरकारला चुकीचा अहवाल देत तीन निष्पाप अधिकाऱ्यांचे बळी दिले,' असा ॲड. मिर्झा यांचा थेट आरोप आहे.

निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा महिला रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. जयंत पाटील आणि प्रशासकीय अधिकारी श्री. डांबरे यांचा समावेश आहे. जिल्हा महिला रुग्णालयातील निविदा प्रकरणातील अनियमिततेचा आधार घेत या तिघांना निलंबित करण्यात आले; मात्र 'ज्या निविदेला प्रशासकीय मान्यता होती, ज्यात सरकारने एकही रुपया दिला नाही आणि कोणतेही बिल पास झाले नाही, त्या निविदेत भ्रष्टाचार होऊच कसा शकतो?' असा प्रश्न ॲड. मिर्झा यांनी उपस्थित केला.

मिर्झा यांनी आरोप केला की डॉ. भंडारी, डॉ. गाढवे आणि संपूर्ण चौकशी समितीने सरकारला चुकीची दिशाभूल करणारा अहवाल सादर करत तिघांना बेकायदेशीररीत्या निलंबित केले. त्यांच्या मते, यामागील मूळ हेतू म्हणजे सरळसेवा भरती घोटाळा उघड होण्यापूर्वी डॉ. वारे यांना उपसंचालक पदावरील पदोन्नतीपासून रोखणे.

'डॉ. वारे यांच्या पदोन्नतीची फाइल सरकारकडे प्रलंबित होती. त्यांचे उपसंचालकपदावर आगमन म्हणजे अनेक कथित घोटाळ्यांचे थेट उघडकीस येणे होते. त्यामुळेच या दोन्ही अधिकाऱ्यांनी चौकशी अहवाल तयार करून त्यांना तसेच इतर दोन अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा कट रचला,' असा धडधडीत आरोप मिर्झा यांनी नोंदवला. तर या प्रकरणी आरोग्य उपसंचालक डॉ. भंडारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

**निविदा प्रकरणामागील सत्यता ! :** ज्या निविदा प्रकरणात अनियमितता झाल्याचा ठपका ठेवत डॉ. वारे, डॉ. जयंत पाटील आणि प्रशासकीय अधिकारी श्री. डांबरे यांना निलंबित करण्यात आले, त्या मागील सत्यता पडताळल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुरुवातील ज्या हेड मध्ये ग्रँड (निधी) नाही त्याची निविदा प्रक्रिया राबविणे उचित नसल्याचे सांगितले होते, मात्र याठिकाणी लहान शिशुंच्या उपचाराचा अत्यावश्यक असा विषय होता, तर निविदा अभावी कर्मचाऱ्यांनी कामबंद करू नये, वैद्यकीय सेवा निरंतर राहावी या सर्व बाबींची प्राथमिक गरज ओळखत या संपूर्ण प्रक्रियेला अतिशय तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, तर त्यासाठी एकाच दिवशी समितीची सभा घेत ही संपूर्ण निविदा प्रक्रिया जीएम पोर्टलवर राबविण्यात आली होती. तर याची संपूर्ण संचिका ही १४ जून २०२४ रोजी राबविण्यात आली होती मात्र प्रशासकीय यंत्रणेतील काही कर्मचाऱ्यांचा अकार्यक्षमतेमुळे त्याला प्रशासकीय मान्यता मिळण्यास विलंब झाला होता. असा हा संपूर्ण घटनाक्रम घडला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

**मुख्यमंत्र्यांकडे निवेदन – 'कारवाई करा!' :** या संपूर्ण प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन पाठवून संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच आरोग्य खात्याचे प्रधान सचिव यांनाही सर्व पुरावे पाठवून या प्रकरणातील 'सत्य बाहेर काढा' अशी मागणी मिर्झा यांनी केली आहे.

'निर्दोषांना शिक्षा, दोषींना संरक्षण – असा अन्याय सहन केला जाणार नाही' तर आरोग्य विभागातील ही घटना 'शासन यंत्रणेवरचा विश्वास डळमळीत करणारा काळा अध्याय' असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. तर सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार डॉ. भंडारी यांनी मंत्रालयातील काहींना हाताशी घेऊन आपली वर्णी पुन्हा अकोला आरोग्य उपसंचालक पदावर लावण्यासाठी फिल्डिंग लावली असून शासनाने त्यांना पुन्हा याठिकाणी नेमणूक केल्यास शासनाची प्रतिमा आणखीन मलिन होईल एवढे मात्र निश्चित !



**ॲड. फैजान मिर्झा,** प्रदेश प्रवक्ते, राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार गट

---

## शिरपूर जैनमध्ये ५ डिसेंबरला पार पडणार ऐतिहासिक आचार्यश्री पदवीदान सोहळा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील शिरपूर जैन येथील श्री अंतरीक्ष पार्श्वनाथ भगवंताच्या पवित्र पावन भूमीत शुक्रवार ५ डिसेंबर रोजी श्री अंतरीक्षजी तीर्थ अभ्युदय प्रेरक परम पूज्य पंन्यास प्रवर श्री विमलहंसविजयजी महाराज साहेब यांचा आचार्य पदवीदान सोहळा पार पडणार आहे.शिरपूर जैन नगरीत पहिल्यांदाच पार पडणारा हा सोहळा ऐतिहासिक ठरणार असून १ डिसेंबर ते ५ डिसेंबरपर्यंत भव्यदिव्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. वर्धमान तपोनिधि आचार्य भगवंत श्री विमलबोधीसूरीश्वरजी महाराज साहेब यांचे अन्य मुनिश्रींसह मुंबई येथून पायी विहार करत २७ नोव्हेंबर पर्यंत शिरपूर नगरीत आगमन करतील.त्यांच्या नेतृत्वात पाच दिवसीय आचार्य पदवीदान महोत्सवाला सुरवात होऊन ५ डिसेंबर रोजी आचार्य श्री विमलबोधीसुरीश्वरजी महाराज साहेब श्री विमल्हंसविजयजी महाराज आचार्य पदवी दान करतील.यावेळी अनेक श्वेतांबर जैन मुनिश्री तसेच महासती व साध्वींची उपस्थिती लाभणार आहे.

## वाशिम नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्षपदाचे ३ तर सदस्यपदाचे ५० उमेदवारांची माघार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**वाशिम नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस २१ नोव्हेंबर होता. या दिवशी १६ प्रभागांतील तब्बल ५० उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली. माघार घेणाऱ्यांमध्ये भाजप महामंत्री संगीता इंगोले, देवेंद्र बागरेचा, पत्रकार प्रदीप टाकळकर, रितेश देशमुख यांचा समावेश आहे.**




बहुसंख्य उमेदवार हे भाजपचे कार्यकर्ते असून त्यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले होते. पक्षाने चर्चेनंतर केलेल्या समजुतीनंतर या उमेदवारांनी माघार घेतल्याची माहिती आहे. त्यामुळे काही प्रभागातील निवडणूक समीकरणांत बदल झाला आहे.

नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवार माघारी – १४ उमेदवार रिंगणात नगराध्यक्ष पदासाठी दाखल झालेल्या १७ उमेदवारी अर्जांपैकी ३ उमेदवारांनी २१ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेतले. माघार घेणाऱ्यांमध्ये माजी नगरसेवक लक्ष्मणराव इंगोले, सलीम बेनीवाले आणि शिवसेनेचे माजी जिल्हा उपप्रमुख नागोराव ठेंगडे यांचा समावेश आहे.

यामुळे नगराध्यक्ष पदासाठी आता १४ उमेदवार रिंगणात आहेत. त्यामध्ये प्रमुख पक्षांचे उमेदवार पुढीलप्रमाणे भाजप इंजि. अनिल केंदळे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) : रेखा सुरेश मापारी, राष्ट्रवादी काँग्रेस संदीप दहात्रे, वंचित बहुजन आघाडी वैभव उलेमाले आप सागर कोकास,एमआयएम मोहम्मद काझीम २ डिसेंबरला होणाऱ्या मतदानाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानात प्रमाणित हरभरा बियाणे वितरण

**अकोला :** शेतकऱ्यांना दर्जेदार प्रमाणित बियाणे अनुदानित दरावर उपलब्ध व्हावे कडधान्य पिकांच्या नवीन वाणाचा प्रचार प्रसार व्हावा व शेतकऱ्यांना अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान कडधान्य व नवीन बियाणे अर्थसहाय्य सन २०२५-२६ अंतर्गत प्रमाणित बियाणे वितरण हरभरा (१० वर्षाआतील) बियाणे रु.५००० प्रति क्वि. (क्षेत्र ०.२० ते २.०० हे. ) मर्यादेत वितरित करण्यात येत आहे. हरभरा या पिकाच्या अनुदान तत्वावर बियाणे लाभ मिळण्याकरिता सातबारा व फार्मर आयडीसह प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्वावर जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन शंकर किरवे यांनी केले आहे.

## राहुल पार्क येथे सामुदायिक प्रार्थना



■ प्रतिनिधी | मानोरा ■

येथील स्थानिक राहुल पार्क येथील गजानन महाराजांच्या मंदिरामध्ये दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोज गुरुवारला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त गुरुदेव सेवा मंडळांची तथा गजानन महाराज महिला मंडळ व दुर्गा महिला मंडळांची बैठक घेऊन १३ नोव्हेंबर पासून सामुदायिक प्रार्थनेला सुरुवात करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. टिनूताई विनय ठाकरे व कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी यांचे हस्ते करण्यात आले.

नंतर प्रार्थना घेण्यात आली त्यानंतर राष्ट्रसंतांचे विचार व सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व यावर सविस्तर असे मार्गदर्शन सुनील दादा दशमुखे जिल्हा सेवाधिकारी वाशिम, रवी वार्डेकर प्रतिनिधी, गोपाल क्षीरसागर माणिकराव महाराज, अंधारे गुरुजी, अरुण पाटिल भालदान लोमेश चौधरी, विनय ठाकरे, सौ. हर्षाताई अंधारे सोनूताई म्हातारमारे मानोरा महिला सेवाअधिकारी यांनी मार्गर्शन केले.

---

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे तंबाखूजन्य पदार्थविरोधी मार्गदर्शन कार्यक्रम



■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम जिल्हा रुग्णालय ,वाशिम अंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिल कावरखे,अति.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सावरगाव बर्डे ता. वाशिम येथे तंबाखूजन्य अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमामध्ये तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा (कोटपा २००३), तंबाखू मुक्त शाळा संकल्पना, तसेच विद्यार्थ्यांना तंबाखूचे आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांनी तंबाखू मुक्ती साठी दिलेल्या टोल फ्री क्रमांकाची माहिती घेतली आणि तंबाखू मुक्तीची शपथ सामूहिकरित्या घेऊन तंबाखूविरोधी लढ्यात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून जिल्हा रुग्णालय वाशिम येथील तंबाखू नियंत्रण कक्षाचे डॉ. आदित्य पांढरकर (जिल्हा सल्लागार), सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे, तसेच मानसशास्त्रज्ञ राम सरकटे यांची उपस्थिती लाभली.

## बालहक्क जनजागृतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महिला व बाल विकास विभाग पुणे यांच्या निर्देशानुसार आणि जिल्हाधिकारी वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली 'बालविवाह मुक्त महाराष्ट्र – आपला संकल्प' अभियान तसेच बालहक्क जनजागृती सप्ताह मालेगाव व मंगरूळपीर तालुक्यात विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये उत्साहात राबविण्यात आला.ष्या उपक्रमांच्या अंमलबजावणीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे आणि परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा आणि तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांमध्ये बालहक्क, बालसुरक्षा आणि बालविवाह प्रतिबंध याबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली.

## वाशिमच्या दिव्यांग बाललेखक विराज शिंदेची इंस्पायर अवार्डसाठी निवड



■ प्रतिनिधी | वाशिम ■

बाललेखक व चाईल्डलाईन समुपदेशक म्हणून ओळख असलेल्या विराज शिंदेने वाशिमच्या सन्मानात आणखी एक भर टाकली आहे.

यवतमाळ येथे झालेल्या बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या तीन जिल्ह्यांतून शंभरावर जास्त संशोधने सादर झाली होती. या संशोधकांमधून विराज शिंदे ह्या दिव्यांग बाल वैज्ञानिकाची निवड राज्यस्तरावर झाली आहे.

तीनही जिल्ह्यातून ११ बाल वैज्ञानिक निवडण्यात आले आहेत व त्यात विराज शिंदे हा एकमेव दिव्यांग बाल वैज्ञानिक आहे. आता ते भंडारा जिल्ह्यातील शहापूर येथे स्टेट लेव्हल साठी जाणार आहेत. विराज हा मागील वर्षी सि.बी.एस.सी बोर्डाच्या शाळेत शिकत होता. त्यातून त्याच्या सिनॉपसिसची निवड झाली होती. सध्या तो वल्ड स्कूल वाशिम या शाळेत इयत्ता ७ वीत शिकत आहे. जजिंग पॅनॅल म्हणून आलेल्या दिल्लीच्या शास्त्रज्ञ शिवानी सिंग यांनी विराज बद्दल म्हटले की, विराज तू जिनियस आहेस,तुझी सर्वच क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी व कार्य पाहून आमची तुला जज करण्याची आमची क्षमता कमी भासते. तू दिव्यांग नाहीस,समाजाची मानसिकता दिव्यांग आहे. तुझे कौतुक करावे तितके थोडेच असे गौरवोद्गार त्यांनी काढलेयामुळे सर्वांना विराजचे खुप कौतुक वाटले.

## कारंजा नगरपरिषद निवडणुकीत तिरंगी लढत

■ १२ नगराध्यक्षा पदाकरीता , तर १६९ नगरसेवक पदाकरीता उमेदवार रिंगणात
■ कारंजा शहरात भाजपाला बंडखोरीचे ग्रहण

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा नगर परिषद निवडणुकीत तिरंगी लढतीचे स्पष्ट संकेत असून नगराध्यक्ष पदाकरीता १२ उमेदवारांचे अर्ज तर १६९ नगर सेवक पदाकरीता उमेदवारांचे आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी कायम राहीले आहेत . काही ठीकाणी राष्ट्रीय पक्षाच्या उमेदवारांनी बंडखोरी कायम ठेवत पक्षालाच रिंगणात उतरविन्याची चर्चा आहे .

राज्यात अनेक ठिकाणी बिनविरोध नगरपरिषद अध्यक्ष निवडून आणनाऱ्या भाजपाला कारंजा शहरात मात्र बंडखोरीचे ग्रहण लागले आहे. उमेदवारी मिळण्यावरून नगरपरिषदेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीत पक्षातील अंतर्गत नाराजी स्पष्ट झाली असून असंतोष उफाळून आला आहे. शहराध्यक्षा प्राजक्ता माहीतकर यांनी पक्षातर्फे उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी बंडाची भूमिका घेत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

'ते मागे घेतील असा कयास होता मात्र आज, २१ नोव्हेंबर हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असूनही माहीतकर यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज कायम ठेवत पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाला उघड आव्हान दिले आहे. याप्रमाणेच, भाजपा शहर उपाध्यक्षा शुभांगी कौडण्य, भाजप नेते अविनाश फुलउंबरकर यांच्या पत्नी अनिता फुलउंबरकर, व्यापारी आघाडी शहराध्यक्ष मोहन पंजवाणी, अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष अमर मेहरोलीया यांच्या पत्नी सुनिता मेहरोलीया तसेच आणखी तीन ते चार सक्रिय कार्यकर्त्यांनीही आपली अपक्ष उमेदवारी कायम ठेवली आहे. त्यामुळे शहर भाजपात तसेच स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे. अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांकडून मिळालेल्या या विरोधी भूमिकेमुळे पक्षात अंतर्गत संवादाचा अभाव आणि नाराजी शिगेला पोहोचल्याचे जाणवत आहे. या नाराजीनाटयाला पक्ष कसा सामोरे जातो हे याचे जनमानसात कुतूहल असून, यामुळे भाजपाचे किती राजकीय नुकसान होणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

तसेच पक्षातर्फे या बंडखोरांवर कोणती कार्यवाही केली जाणार, याची उत्सुकता शहरात चांगलीच वाढली आहे.

---

## मालेगाव नगरपंचायत निवडणूक : नगराध्यक्ष पदाचे तीन उमेदवार माघारी

### नगरसेवक पदावर ४ जणांनी घेतली माघार; अंतिम यादी जाहीर




■ प्रतिनिधी | मालेगाव ■

नगरपंचायत निवडणुकीत आज मोठी राजकीय हालचाल पाहायला मिळाली. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दिलेल्या अंतिम मुदतीत नगराध्यक्ष पदाचे तब्बल तीन उमेदवार माघारी सरसावले, तर नगरसेवक पदाच्या चार उमेदवारांनी देखील स्पर्धेतून माघार घेतली आहे. यामुळे निवडणुकीची सरशी अधिक चुरशीची होणार हे निश्चित झाले आहे.

**नगराध्यक्ष पदावरून माघार घेतलेल्या उमेदवारांची नावे** १. अरुण विश्वनाथ बळी २.जहीर शाह अहमद शाह ३.शाह हारून शाह इब्राहिम यामुळे आता नगराध्यक्ष पदासाठी फक्त ५ उमेदवार रिंगणात उरले आहेत.

**नगरसेवक पदासाठी माघार घेतलेल्या उमेदवारांची नावे :** इलियास खान पठाण – प्रभाग क्रमांक ५ पठाण इरफान खान शेर खान – प्रभाग क्रमांक ५ शिंदे अनिल गुलाबराव – प्रभाग क्रमांक ९ कुटे नंदिनी गणेश – प्रभाग क्रमांक १४ या माघारीनंतर नगरसेवक पदासाठी एकूण ७१ उमेदवार अंतिम यादीत उरले आहेत.

**निवडणूक अधिक चुरशीची होण्याची शक्यता :** माघारीनंतर झालेल्या आकड्यातील बदलांमुळे अनेक प्रभागांत सरळसोट मुकाबला होण्याची शक्यता वाढली आहे.

काही प्रभागांमध्ये लढती अधिक रोमहर्षक होतील तर काही ठिकाणी समीकरणे पूर्णपणे बदलणार आहेत.

## निवडणूक कामकाजासाठी यंत्रणांनी सज्ज व्हावे

✦ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे निर्देश
✦ नोडल अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष तयारीचा आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

निवडणूक ही व्यापक आणि संवेदनशील प्रशासकीय प्रक्रिया असून प्रत्येक टप्प्यात काटेकोर नियोजन, अंमलबजावणी आणि विभागांमधील अचूक समन्वय अनिवार्य आहे. सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दिलेल्या वेळेच्या चौकटीत काम पूर्ण करून निवडणूक व्यवस्थापनात कोणतीही पोकळी राहू नये, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.



नगर परिषद/नगरपंचायत तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी निवडणूकपूर्व प्रत्यक्ष तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, नगरपालिका प्रशासनाचे सहआयुक्त बाबुराव बिक्कड यांची प्रमुख उपस्थिती होती. निवडणूक काहीच दिवसांवर येऊन ठेपली असून मतदान दिनांक २ डिसेंबर रोजी पार पडणार आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागांनी वेळेच्या चौकटीत नियोजन पूर्ण करून प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी सज्ज राहावे, असे जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी स्पष्ट केले. या अनुषंगाने आतापर्यंत झालेल्या कामकाजावर सविस्तर चर्चा झाली.बैठकीत मनुष्यबळ व्यवस्थापन आणि रॅन्डमायजेशन, मतपत्रिका व पोस्टल बॅलेट छपाई, मतमोजणी प्रशिक्षण, तसेच एसएसटी (Static Surveillance Team), एफएसटी (Flying Squad Team) व व्हीएसटी (Video Surveillance Team) यांच्या कार्यप्रणालीचा आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर निवडणूक साहित्याची साठवण, वाहतूक आणि वितरण व्यवस्था तसेच मतदार जनजागृती उपक्रमांवरही विशेष भर देण्यात आला.जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर म्हणाले, निवडणूक प्रक्रियेत मनुष्यबळ व्यवस्थापन, साहित्य वितरण, वाहतूक नियोजन आणि ईव्हीएम व्यवस्थापन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक विभागाने नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या वेळेत, अचूक व समन्वयातून पार पाडणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडावी यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी सज्ज राहण्याचे निर्देश त्यांनी दिले. बैठकीत उपस्थित नोडल अधिकाऱ्यांनी आपल्या विभागांतील प्रगतीचा आढावा सादर केला.


जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३५३ ■ शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# बनावट नोटांचे साखळी प्रकरण: मध्यप्रदेशापर्यंत पसरले वर्ध्याचे गडद विश्व

**पोलिसांनी जबलपूर, कटनी येथे छापे टाकले**

-लाखोंच्या बनावट नोटा वर्धा, नागपूर, यवतमाळसह इतर जिल्ह्यांमध्ये वापरल्या जात होत्या
-बनावट नोटांवरील पोलिस कारवाईत नाशिकमधील साथीदारांची लवकरच चौकशी होणार





**वर्धा जनमाध्यम :** शहरातील गोंडप्लॉट परिसरात एका किरायाच्या घरात नकली नोट छापण्याच्या धक्कादायक रॅकेटचा पोलिसांनी भिंगावडा केला आहे. मुख्य आरोपी नागपूरचा ईश्वर लालसिंह यादव (३२ वर्षीय), जो छत्तीसगडातील राजनांदगावचा रहिवासी असून गेली एक वर्षे वर्ध्यातील केजाजी चौकात किरायाने राहून हा मोठा बनावट नोटांचा व्याप चालवत होता, त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

**प्रकरणाचा आश्चर्यकारक उलगडा**

पोलिसांच्या तपासात हे समोर आले की, ईश्वर यादवने कालबाह्य ५ लाख ४३ हजार रुपयांच्या बनावट नोटा तयार केल्या होत्या. तो आणि त्याचे सहकारी धनराज धोतें व राहुल आंबटकर, हे साप्ताहिक बाजारपेठांमध्ये नकली नोटा फिरवत होते. पोलिसांनी याच घरावर छापा टाकला, तेव्हा प्रिंटरसह लाकडी आणि काच्यांच्या फ्रेममध्ये विशेष प्रकारे तयार केलेल्या ५०० रुपयांच्या नोटांच्या ५९६ तुकड्या, ११० एक बाजूने छापलेल्या नोटा, ११० दुसऱ्या बाजूने छापलेल्या नोटा, तसेच १७० अर्धवट छापलेल्या नोटा, प्रिंटर, लॅपटॉप व मोबाईल फोन जप्त केले.

**मध्यप्रदेशात मोठ्या प्रमाणावर कारवाई-** तपासात समजले की, एक मोठी साखळी मध्यप्रदेशातील जबलपूर जिल्ह्यापर्यंत पसरली आहे. पोलिसांनी कटनी येथील भाड्याने घेतलेल्या खोलीत देखील छापा टाकून नकली नोट छापण्याचे साहित्य जप्त केले असून, प्रारंभिक माहिती नुसार तो भाग प्रकरणाशी संबंधित आहे.

**बाजारपेठेतील चलनात नकली नोटांचा वाढता वापर-** या साखळीचे गांभीर्य याच्यात आहे की त्यांचा नोटा वर्धा, नागपूर, यवतमाळसह इतर जिल्ह्यांतील मोठ्या बाजारपेठांमध्ये सतत वापर होत होता. मुख्य आरोपीनं पोलिसांना कबुल केले की, त्याने लाखो रुपयांच्या नकली नोटा छापल्या आहेत, ज्यामुळे स्थानिक व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसू शकतो.

**पोलिस कारवाई आणि तपास प्रक्रिया-** वर्धा पोलिसांनी आरोपी ईश्वर यादव सह त्याच्या सोबतच्यां दोन साथीदारांना नाशिकमधील मालेगाव येथून अटक केली आहे आणि त्यांना लवकरच वर्धा पोलिस चौकशीसाठी आणले जाणार आहे. सध्या आरोपीना पोलिस कोठडीत ठेवून पोलिस तपास करत असून, या बनावट नोट प्रकरणामागील पूर्ण साखळी उघड करण्याचा प्रयत्न होतो आहे.

हे प्रकरण केवळ वर्धा किंवा मध्यप्रदेशापुरता मर्यादित नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी ही एक मोठी धोकादायक साखळी असून याविरोधात पोलिस प्रशासनाने उच्च स्तरावरील योजना आखून कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. बनावट नोटांचे हे कारखाने उध्वस्त करून समाजात आर्थिक पकड मजबूत करण्यासाठी आक्रमक पावले उचलली पाहिजेत.

# विकासाच्या मुद्द्यावर भाजप जोरदार विजय मिळवेल

## -चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

**वर्धा जनमाध्यम :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये विकास हेच मुख्य मुद्दा ठरून भाजपला जोरदार विजय मिळणार असल्याचा दावा महसूल मंत्री आणि भाजपचे निवडणूक प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. बावनकुळे यांनी ठाकरे गट आणि महाविकास आघाडीवर, विशेषत: शिवसेनेवर तीव्र टीका करून महाराष्ट्राच्या जनतेने फडणवीस सरकारवर ५१ टक्के विश्वास व्यक्त करून डबल इंजिन सरकारला केंद्रस्थानी आणले असल्याचे सांगितले. विकासाशिवाय कुठलाही राजकारण चालणार नाही. भाजप आणि महायुतीची यंत्रणा लोकांच्या विकासाच्या आकांक्षांना पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे, असे बावनकुळे म्हणाले. त्यांनी शिवसेनेकडे आता कोणताही वैचारिक आधार उरलेला नाही, त्यामुळे त्यांनी काँग्रेसच्या विचारधारेला स्वीकारले आहे आणि हिंदुत्वाचा आधार सोडल्यामुळे काँग्रेससोबत राहण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय नाही, असा कटाक्षही व्यक्त केला.बावनकुळे यांनी सांगितले की, सरकारच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आणि विकासाच्या प्रवाहात आणणे हाच या निवडणुका लढण्याचा मुख्य उद्देश आहे. नरेंद्र मोदी आणि महायुती सरकारच्या विकास योजना स्थानिक पातळीवर पोहोचवण्यासाठी महापालिका निवडणुका निर्णायक आहेत. त्यांनी यावेळी निवडणुकीतील बंडखोरांना एकजूट होण्याचा सल्ला दिला, तसेच पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी कार्यकर्त्यांना आपसी मतभेद विसरून पक्षासाठी सर्वस्व देण्याचे आवाहन केले. चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस आणि महाविकास आघाडीला उजवा हात झोडून हळूहळू कमजोर व्हायचे असल्याचा स्वप्न दाखवले आणि सांगितले की, भाजपमध्ये येणारे नेते फक्त पदासाठी नाहीत तर विकसित महाराष्ट्र या संकल्पासाठी जोडले जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा विकास संकल्प यशस्वी होणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.शहरातील हेरिटेज सभागृहात झालेल्या विजय संकल्प सभेत बावनकुळे यासोबत बऱ्याच पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावून कार्यकर्त्यांना निवडणूक रणभूमीमध्ये प्रचंड प्रयत्न करण्याची प्रेरणा दिली. या वेळी बावनकुळे यांनी मतदारांना फक?त विकास पाहिजे, अशी म्हणत निवडणूक प्रचारासाठी धडाकेबाज संदेश दिला.आणखी एका महत्त्वाच्या विधानात, बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांची विषारी तुलना अजगराशी केली आणि मुंबईसुद्धा त्याने निगल्याचा कटाक्ष करत भाजप आणि महायुतीची सत्ता कायम राहणार असल्याचा पुन्हा पुन्हा ठाम इशारा दिला. या रणनीतीतून भाजपाने स्थानिक पातळीवर आपली अकाट्य पकड मजबूत करण्याचे धोरण आखले आहे. बावनकुळे म्हणाले विकासावर आधारित नागरी संस्था निवडणूक आणि महापौरपदासाठी भाजप पूर्णपणे सज्ज आहे; विरोधी पार्टीची मते विभागण्यात आली आहेत ज्यामुळे भाजपसाठी संधी खुले झाली आहे. या निवडणुकीत भाजपचे विजयाचे निश्चय करत हा प्रदेश पुन्हा 'विकास'च्या मार्गावर निघेल, असा दावा त्यांचा आहे.



# चारचाकी वाहनांसह १२.९० लाखांचा दारूसाठा जप्त

## -दोघांना ठोकल्या बेड्या : वर्धा पोलिसांची कारवाई



**वर्धा जनमाध्यम :** महागड्या चारचाकी वाहनामधून देशी-विदेशी दारूची अवैध तस्करी करणाऱ्या दोन दारू विक्रेतांना वर्धा शहर पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. अवैध दारूचे वापर व विक्री मोठ्या प्रमाणात होण्याच्या पार्श्वभूमीवर चालवलेल्या पोलिस तपासणीतील हा यशस्वी धक्कादायक खुलासाच.वर्धा शहर पोलिस निरीक्षक विशाल सवाई यांच्या नेतृत्वाखालील पथकाने २० नोव्हेंबरच्या रात्री बोरगाव मेघे परिसरात नाकेबंदी करून महागडी कार तपासली असता, त्यात सुमारे २.७० लाख रुपयांमूल्याच्या दारूसाठ्यासह दिनेश अशोक येंडले (वय ३५, नालवाडी) व सुशांत राजू खोब्रागडे (वय २४, विक्रमशिला नगर) यांना ताब्यात घेत १२.९० लाखांचा मुद्देमाल जप्त झाला.पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी दारूवरील कडक बंदोबस्ताचे निर्देश दिले असून, या प्रकारातून वाढत्या तस्करीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न जोरदार सुरु आहे. गुन्ह्यात वापरलेली कार आणि मोबाइल फोन्ससह आरोपींना अटक करण्यात आली आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनामध्ये, पुलिस निरीक्षक संतोष ताले यांच्या देखरेखीखाली उपनिरीक्षक विशाल सवाई व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. यामध्ये सीनूकुमार बनोत, विजय पंचटिके, शैलेश चाफलेकर, महेंद्र पाटील, नितीन ईटकरे, पवन लव्हाळे, शिवदास डोइफोडे, नंदकिशोर धुर्वे, रणजीत भुरसे यांनी केली आहे,

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणात फरार आरोपी जेरबंद

## - सर्व सात जण कोठडीत

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील तळेगाव परिसरात घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील सामूहिक अत्याचार प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणातील दोघे फरार आरोपी अखेर मध्यप्रदेशातून जेरबंद झाले असून सर्व सातही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.१८ नोव्हेंबर रोजी पाच आरोपींना अटक करण्यात आली होती, तर एका विधिसंघर्षित बालकाला बालसुधारगृहात पाठविण्यात आले होते. मात्र, विजय मदन पाचेकर आणि गौरव ओमकार काकडे हे दोघे फरार राहिले होते. विशेष पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार हे दोघे मध्यप्रदेशातील वारी गावातील माँ पंढरी मंदिर परिसरात लपून बसले होते. तळेगाव पोलिसांनी २० तारखेच्या मध्यरात्री सापळा रचून या दोघांना जेरबंद केले.न्यायालयाने दोघांनाही २४ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. पीडित मुलीची प्रकृती चिंताजनक असून वैद्यकीय तपासणीत ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे तपास आणखी गंभीर पातळीवर सुरू आहे.गावात या गुन्ह्यात आणखी काहींचा सहभाग असल्याच्या चर्चा असून काही आरोपींना राजकीय पाठबळ असल्याचे आरोप ग्रामस्थांकडून होत आहेत. तपास जलदगतीने होण्यासाठी पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक कार्यरत आहे. एपीआय मंगेश भोयर हे पुढील तपास करीत आहेत.

# ऑनलाइन नूतनीकरणाचा गोंधळ; बांधकाम कामगारांच्या हक्कांवर गदा

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांसाठी सुरू असलेल्या ऑनलाइन नूतनीकरण प्रक्रियेमुळे अनेक कामगार त्रस्त झाले आहेत. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाद्वारे सुरू केलेल्या या डिजिटल योजनेत अनेक त्रुटी आणि अडचणी आल्याने कामगारांना त्यांचे मूलभूत लाभ मिळू शकत नाहीत अशी तक्रार कामगार संघटनांनी केली आहे.

**ऑनलाइन नूतनीकरण प्रक्रिया परवानगीथील विलंब**

नूतनीकरण करण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर पडताळणीची तारीख अनेक ठिकाणी मे २०२६ पर्यंत दाखवली जात असल्याने सुमारे ५ ते ८ महिने नूतनीकरण प्रक्रियेमध्ये विलंब निर्माण झाला आहे. यामुळे कामगारांना वैद्यकीय सहाय्य, प्रसूती अनुदान, अपघात नुकसानभरपाई, मृत्यू अनुदान, तसेच शिक्षण सहाय्य यांसारखे महत्त्वाचे लाभ थांबले आहेत. अनेक कामगारांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून त्यांचा त्याग फसल्याचा भास होतो आहे.

**तंत्रज्ञानातील त्रुटी आणि व्यवस्थापनाचा अभाव**

कामगार संघटनांच्या तपासणीत असे आढळले की ऑनलाईन पोर्टल कायमस्वरूपी बंद पडत असून, स्लॉट्सची संख्या अत्यंत मर्यादित आहे. जिल्हावारी पडताळणीसाठी कोणतेही वेळापत्रक उपलब्ध नाही आणि तक्रारींसाठी प्रत्यक्षात कोणताही उपाययोजना नाही. शासनाने फक्त ऑनलाइन सेवा उपलब्ध करून दिल्याने प्रत्यक्षात कामगारांना सुविधा मिळवण्यास फारच त्रास होत आहे.

**कामगार संघटनांचा इशारा**

राज्यातील विविध कामगार संघटनांनी शासनाला तातडीने खालील मागण्या केल्या आहेत:ऑनलाइन स्लॉट्स आणि सेवा २४ तास उपलब्ध करावी.नूतनीकरण प्रक्रिया ३० दिवसांत पूर्ण करावी.प्रलंबित अर्ज तात्काळ मंजूर करावेत.जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास कामगार संघटना राज्यव्यापी आंदोलनाच्या मार्गावर जाण्याचा इशारा दिला आहे.

**कामगारांची भावना**

कामगारांचा संताप आहे की, ऑनलाइन पद्धत चांगली आहे, पण ती सुरळीत चालली पाहिजे. आता आम्हाला वेळ, पैसा आणि हक्क दोन्ही गमवावे लागत आहे, असे ते म्हणतात.

**प्रशासनासाठी आव्हान**

या समस्यांमुळे प्रशासनाची जबाबदारी अधिक मोठी आणि गंभीर ठरते आहे. तंत्रज्ञानातील दोष दुरुस्त करा, प्रलंबित अर्ज त्वरित निकाली काढा आणि लाभ वितरण प्रक्रिया सुकर करा, असा कामगारांचा आणि संघटनांचा सुद्धा प्रश्न आहे. अन्यथा, कामगारांवर उत्पन्न होणाऱ्या आर्थिक आणि सामाजिक संकटांनी शासनाला विरोधात उभे राहण्यासाठी स्वाभीमान बांधकाम संघटनेचे अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी आव्हान केले आहे.

# पालिका निवडणुकीत भाजपाचे बंडखोर उमेदवार मागे -आ.कुणावार व ना.भोयर यांची शिष्टाई यशस्वी



**हिंगणघाट जनमाध्यम :** स्थानिक पालिका निवडणुकीत भाजपाच्या अधिकाऱ्यांमधील गटबाजी आणि बंडखोर उमेदवारांवर आ. कुणावार आणि ना. पंकज भोयर यांच्या यशस्वी शिष्टाईने गाजावाजा झाला आहे. राष्ट्रवादीच्या डॉ. नयना तुळसकर यांचा नगराध्यक्षपदी मार्ग मोकळा झाला असताना भाजपाच्या जया प्रेम बसंतानी व छाया सातपुते यांनी नगराध्यक्ष पदासाठी दिलेली उमेदवारी मागे घेण्यात आली आहे. नगराध्यक्ष पद महिलांसाठी राखीव असून भाजपाच्या छाया सातपुते आणि जया बसंतानी यांनी ह्या पदासाठी अर्ज केले होते, मात्र, पक्षाच्या एका गटाच्या दबावाखाली त्यानंतर उमेदवारी मागे घेण्याची घडामोड झाली.

तसेच प्रभाग क्र. १४ मधील भाजपाच्या शारदा पटेल यालाही उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडण्यात आले, त्यामुळे या जागेवर जया बसंतानी भाजपा समर्थीत उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहेत.या घडामोडींमुळे भाजप-रिपाई युतीच्या तुळसकर यांचा विजय निश्चित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिष्टाई व पक्षाच्या उच्चपातळीवरील निर्णयामुळे भाजपच्या गटातील बंडखोरांना सुनावटीचा संदेश देण्यात आला आहे. यामुळे पक्षातील एकात्मता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.यापुढील निवडणूक निकाल व या घटना स्थानिक राजकारणावर मोठा परिणाम करू शकतात, अशी मत व्यक्त केली जात आहे.

# पाच महिन्यांनंतर 'बन्नी'ला सापडले आपल्या मायेचे घर

## -रेल्वे स्थानकावर सापडलेल्या तेलुगू बालकाचा शेवटी कुटुंबाशी पुनर्मिलाप; तीन जिल्ह्यांच्या समित्यांचा कौतुकास्पद समन्वय

**वर्धा जनमाध्यम :** पालकांचा ठावठिकाणा नसलेल्या छोट्या 'बन्नी'ची कथा आज सुखद शेवटावर पोहोचली आहे. वर्धा रेल्वे स्थानकावर २८ मे २०२५ रोजी आढळलेला हा आठ वर्षांचा तेलुगू भाषिक बालक तब्बल पाच महिन्यांनी अखेर आपल्या वडिलांच्या मिठीत पोहोचला. जिल्हा महिला व बालकल्याण विभागाच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले असून या घटनेने समाजमन हलवले आहे. रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी स्टेशनवर हरवलेल्या या बालकाला ताब्यात घेत चाईल्ड हेल्पलाइन च्या माध्यमातून जिल्हा बाल कल्याण समितीच्या स्वाधीन केले. प्राथमिक चौकशी दरम्यान बालकाने चुकीची माहिती दिल्याने शोधमोहीम गुंतागुंतीची झाली होती. मात्र बालगृहातील वास्तव्यादरम्यान त्याने हिंदी आणि मराठी शिकत आत्मविश्वासाने संवाद साधण्यास सुरुवात केली. त्याच वेळी 'निर्मल' या शब्दाच्या आधारावर शोधाला नवी दिशा मिळाली.वर्धा, निर्मल आणि कामारेड्डी या तीन जिल्ह्यांतील बाल कल्याण समित्या तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांनी संयुक्तरीत्या तपास पुढे नेला. सततच्या प्रयत्नांनंतर 'बन्नी' हा कामारेड्डी जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर १९ नोव्हेंबर रोजी वर्धा येथील चमूने बालकाला कामारेड्डी येथील बालकल्याण समितीकडे सादर केले. समितीमार्फत त्याची ओळख पटताच त्याला त्याच्या वडिलांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.या यशामागे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मनीषा कुरसंगे, बाल संरक्षण अधिकारी महेश कामडी, संरक्षण अधिकारी वैशाली मिस्कीन, संस्था अधीक्षिका सुजाता देशमुख, समुपदेशक अमोल राठोड, चाईल्ड हेल्पलाइनचे सुरज वानखेडे, पोलिस विभागाचे प्रवीण मुन आणि यश गायकवाड यांच्या संयुक्त मेहनतीचा मोलाचा वाटा आहे.'बन्नी'च्या पुनर्मिलापाने मानवतेचा धडा देणारा हा प्रसंग वर्धा जिल्ह्यासाठी संवेदनशील स्फूर्तीदायक उदाहरण ठरला आहे.

# उमेदवारांना सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करणे आवश्यक

## -स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक-माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती स्थापन

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील ६ नगरपरिषदसाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या निवडणुकीत सर्व उमेदवारांना प्रचाराच्या सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या माध्यमातून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. प्रमाणिकरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या दि.९ ऑक्टोबर २०२५ च्या राजपत्रान्वये सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित, प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पुर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दुरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू-ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, संकेतस्थळे, सोशल मीडिया आदींचा समावेश होतो.

जिल्ह्यात वर्धा, हिंगणघाट, आर्वी, देवळी, पुलगाव, सिंदी रेल्वे या नगरपरिषदेसाठी सार्वत्रिक निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. दि.२ डिसेंबरला मतदान होणार असून दि.३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठी प्रस्तावित जाहिरातींचे पुर्वप्रमाणन, पेडन्यूज संदर्भातील तक्रारी, प्रकरणांची चौकशी, त्यांचे निराकरण, देखरेख आदी कामे समिती करेल.

जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीमध्ये जिल्हा पोलिस अधीक्षक अनुराग जैन, उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच सदस्य सचिव म्हणून जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड यांचा समावेश आहे.

प्रस्तावित जाहिरात प्रसारित, प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी समितीकडे जिल्हा माहिती कार्यालय, प्रशासकीय इमारत, दुसरा माळा येथे पुर्व प्रमाणनासाठी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत, राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडणे आवश्यक आहे, असे समितीचे सदस्य सचिव मंगेश वरकड यांनी कळविले आहे.

# वर्धा जिल्ह्यात नागरिकांचा रंगतदार संघर्ष : ५० उमेदवारांनी उमेदवारी मागे घेऊन निवडणूक गडद

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील सहा नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा प्रचाराचा धुमाकूळ अबाधित असून, अचानक ५० उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतल्याने राजकीय रणभूमीत मोठा फेरफार झाला आहे. अध्यक्षपदासाठी ८ तर सदस्यपदासाठी ४२ उमेदवारांनी माघार घेतल्याच्या माहितीनंतर निवडणुकीची परिस्थिती आणखी स्पष्ट झाली आहे.

वर्धा नगरपालिकेच्या अध्यक्षपदासाठी गुरूवार २० नोव्हेंबरपर्यंत १२ उमेदवारांनी आपले अर्ज सादर केले होते, पण शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस, अपक्ष आणि बहुजन वंचित आघाडीचे प्रमुख ४ उमेदवारांनी विजयी होण्याच्या लढतीतून माघार घेतली. परिणामी, नगराध्यक्ष पदासाठी ८ उमेदवार उरले असून, सदस्यपदासाठी १६ उमेदवारांनी माघार घेऊन १९१ उमेदवार निवडणूक रिंगणात टिकले आहेत. हिंगणघाट नगरपालिकेतील अध्यक्षपदासाठी दोन अपक्ष उमेदवारांनी मागे हटल्यामुळे उरलेले १० उमेदवार सत्तेसाठी धडपडत आहेत. नगरसेवकपदासाठीदेखील दहा उमेदवारांनी माघार घेतल्याने ४० पदांसाठी २१२ उमेदवार लढत आहेत. आर्वी पालिकेत अध्यक्षपदासाठी कोणत्याही उमेदवाराने अर्ज मागे घेतला नसला तरी सदस्यपदासाठी आठ उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली आहे.

पुलगाव नगरपालिकेतील नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी मागे घेणाऱ्यांचा आकडा अजूनही शून्य आहे, मात्र सदस्यपदांसाठी सात उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. देवळी पालिकेत अपक्ष उमेदवार नरेंद्र मदनकर यांनी उमेदवारी मागे घेतली आहे. तर सिंदी पालिकेतील दोन उमेदवारांनी अर्ज मागे घेऊन निवडणूक थोडी गोलंदाज वळणावर नेली आहे.या निवडणुकीत सहा नगरपालिकांमध्ये एकूण ८६५ उमेदवार लढणार आहेत, ज्यात विविध पक्षांचे व अपक्ष उमेदवारांचे संघर्ष रंगणार आहे. राजकीय पक्षांमधील जोरदार स्पर्धा आणि उमेदवारांच्या माघारमुळे निवडणूक रिंगण अधिक स्वच्छ आणि संघर्षमय बनले आहे. निवडणूक २ डिसेंबर रोजी संपन्न होणार असून, मतमोजणी ३ डिसेंबरला होऊन, नवीन इतिहास घडवणार आहे. जिल्हा राजकारणात या निवडणुकींना मोठ्या महत्त्वाचे स्थान असून, स्थानिक प्रशासनाच्या भवितव्याची दिशा ठरवणारी म्हणून बघितली जात आहे.

## थोडक्यात

### ऋषभ पंतवर कर्णधाराची धुरा

**गुवाहाटी :** दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणा-या दुस-या कसोटी सामन्यापूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. भारताचा कसोटी कर्णधार शुभमन गिल याला



गुवाहाटी कसोटीतून विश्रांती देण्यात आली आहे. संघ व्यवस्थापन आणि वेद्यकीय टीमशी सल्लामसलत करून डाक्टरांचा सल्ला घेण्यासाठी तो मुंबईला रवाना झाला आहे. गिलच्या अनुपस्थितीत अनुभवी यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत हा संघाचे नेतृत्व करणार आहे. तो सध्या संघाचा उपकर्णधार आहे. २२ नोव्हेंबरपासून सुरू होणा-या दुस-या कसोटीपूर्वी गिलने शुक्रवारी (२१ नोव्हेंबर) संघ सोडला आणि तो मुंबईला रवाना झाला. गिल १९ तारखेला संघासोबत गुवाहाटीला पोहोचला होता, पण २० तारखेच्या सरावात त्याने सहभाग घेतला नाही. गिल पुढील दोन-तीन दिवस मुंबईत विश्रांती घेणार आहे आणि त्यानंतर तो डा. दिनश पारडीवाला यांच्याकडे उपचार घेईल, अशी माहिती मिळाली आहे. त्याच्या फिटनेसबाबत अधिक स्पष्टता लवकरच येण्याची अपेक्षा आहे. सध्या तरी त्याला राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये जाण्याची गरज नसल्याचे सांगितले जात आहे. पहिल्या कसोटीत भारताचा मानहानिकारक पराभव झाल्यानंतर, गुवाहाटीतील हा सामना मालिका वाचवण्यासाठी निर्णायक ठरणार आहे. गिल संघात नसल्याने, ऋषभ पंतकडे नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

### पंतप्रधान जी-20 शिखर परिषदेकरिता दक्षिण आफ्रिकेला रवाना

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** पंतप्रधान नरेंद्र मोदी जी-२० शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी दक्षिण आफ्रिकेला रवाना झाले आहेत. समावेशक विकास, आपत्ती जोखीम कमीकरण आणि सर्वांसाठी न्याय्य भविष्य अशा विषयांवर ते तीन



महत्त्वपूर्ण सत्रांना संबोधित करणार आहेत. याशिवाय, ते इंडिया-ब्राझील-दक्षिण आफ्रिका (आयबीएसए) नेत्यांच्या बैठकीतही सहभागी होतील आणि जी-२० शिखर परिषदेत भारताचा दृष्टिकोन मांडतील. पंतप्रधान मोदी यांनी आज, शुक्रवारी दक्षिण आफ्रिकेच्या जोहान्सबर्ग शहरासाठी प्रस्थान असून २१ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर दरम्यान आयोजित २०व्या जी-२० शिखर परिषदेत ते सहभाग घेणार आहेत.विशेष म्हणजे, विकासशील देशांमध्ये आयोजित होणारी ही सलग चौथी जी-२० शिखर परिषद आहे. पंतप्रधान मोदींसह जगातील अनेक राष्ट्रप्रमुख या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत मोदी भारताचा व्यापक दृष्टिकोन प्रस्थापित करतील.मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान तीन मुख्य सत्रांना संबोधित करू शकतात. पहिल्या सत्राचा विषय आहे समावेशक आणि शाश्वत आर्थिक विकास - ज्यात कोणीही वंचित राहू नये. दुसरे सत्र गतिमान विश्व जी२० चे योगदान यावर आधारित असून त्यामध्ये आपत्ती जोखीम कमीकरण, हवामान बदल यांसारख्या जागतिक आव्हानांवर चर्चा होणार आहे. तिस-या सत्राचा विषय आहे सर्वांसाठी न्याय्य आणि समतोल भविष्य. या तिन्ही सत्रांत मोदी मार्गदर्शन करतील अशी शक्यता आहे. दक्षिण आफ्रिका दौ-यापूर्वी पंतप्रधान मोदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी सांगितले की, मी सिरिल रामफोसा यांच्या निमंत्रणावर दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षतेखाली जोहान्सबर्गमध्ये होणा-या वीसाव्या जी-२० लीडर्स समिटमध्ये सहभागी होत आहे. मोदी म्हणाले की, ही परिषद विशेष ठरणार आहे कारण आफ्रिका खंडात होणारी ही पहिली जी-२० शिखर परिषद आहे. २०२३ मध्ये भारताच्या अध्यक्षतेदरम्यान अफ्रिकन युनियनला जी-२० चे सदस्यत्व देण्यात आले होते.ताज्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षतेखाली आयोजित इंडिया-ब्राझील-दक्षिण आफ्रिका (आयबीएसए) नेत्यांच्या बैठकीतही सहभागी होतील.

### अनिल अंबानी यांची आणखी मालमत्ता जप्त

**तब्बल १४०० कोटींच्या मालमत्तेवर टाच**

**नवी दिल्ली :** अनिल अंबानी यांच्या रिलायन्स ग्रुपवर ईडीकडून कारवाई करण्यात येत असून, आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ईडीने रिलायन्स ग्रुपशी संबंधित १४०० कोटी रुपयांची संपत्ती जप्त केली. आतापर्यंत ईडीने अनिल अंबानी यांची एकूण ९ हजार कोटी रुपयांची संपत्ती जप्त केली आहे. ईडीने यापूर्वी ७५०० कोटी रुपयांची संपत्ती जप्त केली होती. अनिल अंबानी यांच्या नव्याने



जप्त करण्यात आलेल्या मालमत्ता नवी मुंबई, चेन्नई, पुणे आणि भुवनेश्वर येथील आहेत. ३१ ऑक्टोबर २०२५ ला जारी करण्यात आलेल्या ५ (१) च्या आदेशानुसार रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड, रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेडकडून जमा केलेल्या सार्वजनिक पैशांचा कथित दुरुपयोग केल्या प्रकरणी यापूर्वी रिलायन्स ग्रुपच्या ४० हून अधिक संपत्ती अस्थायी रुपयात जप्त करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मुंबईतील वांद्रे पश्चिम, पाली हिल येथील एका घराचा समावेश होता. कंपनीने काही दिवसांपूर्वी स्टाक एक्सचेंज फायलिंगमध्ये दिलेल्या माहितीनुसार ईडीने जप्त केलेली संपत्ती रिलायन्स कम्युनिकेशन्सची आहे. ही कंपनी ६ वर्षानंतर सीआयआरपीतून जात आहे. रिलायन्स पावर आणि रिलायन्स इन्फ्राच्या भविष्यावर कोणता परिणाम होणार नाही, असे म्हटले होते.

### 2 सख्ख्या जावांचा गळा आवळून खून

**नांदेड जिल्ह्यातील धक्कादायक घटना**

**माहूर :** नांदेड जिल्ह्यातील माहूर तालुक्यात गुरुवार, दि. २० नोव्हेंबर रोजी



सायंकाळी शेतात कापूस वेचण्यासाठी गेलेल्या २ सख्ख्या जावांची गळा आवळून हत्या करण्यात आली. शिवाय हत्येनंतर त्या दोघींच्या अंगावरचे दागिनेही काढण्यात आले आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. अंतकलाबाई अशोक आढागळे (५५) आणि अनुसयाबाई साहेबराव आढागळे (४५) अशी मृत महिलांची नावे आहेत. या दुहेरी हत्याकांडामुळे माहूर तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाचोंदा शिवार हा डोंगराळ भाग असून माहूर शहरापासून ३५ किलो मीटर दूर आहे. अंतकलाबाई आढागळे आणि अनुसयाबाई आढागळे या याच गावातील रहिवासी आहेत. नात्याने या दोघी सख्ख्या जावा आहेत. नेहमी प्रमाणे दोघी कापूस वेचण्यासाठी आजही शेताकडे गेल्या होत्या. स्वतःच्या शेतात कापूस वेचणीचे काम करत असताना अज्ञाताने दोघींची गळा आवळून हत्या केली.

### पश्चिम बंगाल आणि झारखंडमध्ये ईडीची छापेमारी

**कोळसा उत्खनन प्रकरणी मोठी कारवाई**

**कोलकाता :** अवैध कोळसा वाहतूक आणि साठवणुकीच्या विरोधात अंमलबजावणी संचनालयाने (ईडी) कारवाईचा बडगा उगारला आहे. यातंगर्गत ईडीने आज, शुक्रवारी पश्चिम बंगाल आणि झारखंडमध्ये ४० हून अधिक ठिकाणी धाडी टाकल्या आहेत. कोळसा माफियांच्या विरोधात ही मोहिम हाती घेण्यात आलीय. यासंदर्भातील अधिकृत माहितीनुसार, ईडीने पश्चिम बंगालातील दुर्गापूर, पुरुलिया, हावडा आणि कोलकाता येथील २४ ठिकाणी अवैध कोळसा खाण, बेकायदेशीर वाहतूक आणि साठवणूक याच्याशी संबंधित तपासणी सुरू केली आहे. सुरुवातीच्या माहितीनुसार, नरेंद्र खरका, अनिल गोयल, युधिष्ठिर घोष, कृष्ण मुरारी कयाल आणि इतरांच्या ठिकाणी शुक्रवारी सकाळपासून ईडीची छापेमारी सुरू आहे. झारखंडमध्येही ईडीचे अधिकारी १८ ठिकाणी शोधमोहीम राबवत आहेत.

# नागपूरमध्ये मनोरुग्णालयातील रुग्णांना मधमाश्यांचा चावा; एकाचा मृत्यू; ३८ जखमी

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरातील प्रादेशिक मनोरुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांवर गुरुवारी दुपारी अचानक मधमाश्यांना हल्ला चढवला. त्यात ३८ रुग्ण जखमी झाले असून त्यापैके एकाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे. मानकापूर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात गुरुवारी दुपारी जेवणासाठी वार्ड क्र. ४ आणि ५ मधील रुग्ण बाहेर व्हरांड्यात बसले असतानाच अचानक प्रचंड मोठ्या मधमाश्यांच्या झुंडीने रुग्णांवर हल्ला चढवला. मनोरुग्णांचे स्वतःच्या हालचालीवर नियंत्रण नसल्याने त्यांना स्वतःचा बचाव करता आला नाही. अवघ्या १५-२० मिनिटांच्या या हल्ल्यात ३८ रुग्ण आणि दोन कर्मचारी जखमी झाले. यात ६० वर्षीय रुग्ण किसन विलास यांचा धक्कादायक मृत्यू झाला. येथे रुग्णांच्या जेवणाची वेळ दुपारी १ वाजताची असते. त्यानुसार जेवणाची बेल वाजताच सर्व मनोरुग्ण वन्हाड्यांत आले. वार्ड क्र. ४ व ५ मधील रुग्णही शांततेत वन्हाड्यांत येउन बसले.




त्यांना ताट वाढून देण्यात आले. जेवण करीत असतानाच दुपारी १.३० च्या सुमारास अचानक मधमाश्या झुंडी रुग्णांवर तुटून पडल्या. रुग्णालयातील कर्मचारी सुरक्षेची उपाययोजना करण्यापूर्वीच मधमाश्यांनी अनेक रुग्णांच्या डोक्या, तोंड, हात-पायांना डंख केले. काहींच्या चेह-यावर तीव्र सूज आली. वेदनेमुळे रुग्ण किंचाळत होते. बाजूच्या वार्डातील डाक्टर, परिचारिका व कर्मचारी धावून आले. परंतु, कोणालाच उपाययोजना करता आले नाही. हल्ल्यानंतर वार्डाचा परिसरात मधमाश्यांचा खच पडला होता. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या ९ रुग्णांना सुरुवातीला प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या आकस्मिक विभागात प्राथमिक उपचार करून त्यांना मेडिकलमध्ये दाखल करण्यात आले. तर २९ रुग्णांवर मनोरुग्णालयाच्या आकस्मिक विभागात रात्री उशिरापर्यंत उपचार सुरू होते. मनोरुग्णालयाचा ४० एकर परिसर दाट झाडे आणि झुडपांनी व्यापलेला आहे. हल्ला झालेला भाग जिल्हा रुग्णालयाच्या भिंतीलगत आहे. तिथूनच मधमाश्या आल्या असाव्यात, अशी प्राथमिक माहिती आहे. रुग्णालयाच्या परिसरात कुठेही मधमाश्यांचे पोळे नसल्याचेही अधिका-यांच्या निदर्शनात आले. मधमाश्यांच्या अचानक झालेल्या हल्ल्याने संपूर्ण रुग्णालयात दिवसभर भीतीचे वातावरण होते. प्रशासनाने खबरदारी म्हणून उर्वरित रुग्णांना वार्डमध्येच ठेवण्यात आले. महापालिका प्रशासनाला मधमाश्यांच्या हल्ल्याची माहिती देण्यात आली. मनोरुग्णालयात मधमाश्यांचा हल्ल्यामुळे ३८ रुग्ण जखमी झाले. यातील २९ रुग्णांवर मनोरुग्णालयाच्या आकस्मिक विभागात उपचार सुरू असून सर्वांची प्रकृती स्थिर आहे. मेडिकलमध्ये एक रुग्ण दगावला असून उर्वरित आठ रुग्णांची प्रकृती ठीक आहे, अशी माहिती पटादेशिक मनोरुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डा. सतीश हुमने यांनी दिली.

### बांगलादेशमध्ये 5.5 तीव्रतेचा भूकंप

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :बांग्लादेशात भूकंप झाल्यानंतर पश्चिम बंगालमध्येही शुक्रवारी सकाळी जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता ५.५ अशी नोंदवली गेली आहे. भूकंपाचे केंद्र बांग्लादेशातील टुंगी येथे होते, पण त्याचे धक्के कोलकात्यापर्यंत जाणवले. सकाळी १० वाजून १० मिनिटांनी धक्के बसले आणि घाबरलेले लोक घराबाहेर पडले. सध्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची माहिती नाही, पण तीव्रता जास्त असल्याने लोक घाबरून गेले. युरोपियन-मेडिटेरेनियन सिस्मोलाजी सेंटरच्या माहितीनुसार, भूकंपाचे एपिसेंटर बांग्लादेशातील टुंगीपासून सुमारे २७ किलोमीटर पूर्वेला होते. त्याची खोली अंदाजे १० किलोमीटर होती. कोलकात्यासह आसपासच्या जिल्ह्यांमध्ये आणि उत्तर बंगालमध्येही धक्के जाणवले. कूचबिहार आणि दिनाजपूरमध्येही भूकंपाचे जोरदार धक्के नोंदवले गेले.

## एआयद्वारे आता नैसर्गिक आपत्तीची पूर्वकल्पना!

**पुणे/प्रतिनिधी :** भूकंप, भूस्खलन, चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीची पूर्वकल्पना तात्काळ मिळावी आणि जलसंकट, जलसंपत्तीचा धोका टाळता यावा, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) माध्यमातून शैक्षणिक संशोधन विकसित करण्यात येणार आहे. त्यामुळे आगामी काळात आता नैसर्गिक आपत्तीची पूर्वकल्पना मिळणे शक्य होणार आहे. यासाठी केंद्रीय जल आणि उर्जा संशोधन केंद्र (सीडब्ल्यूपीआरएस) आणि डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नालाजी (डीआयएटी) यांच्यात करार झाला आहे. सीडब्ल्यूपीआरएसचे संचालक डा. प्रभात चंद्रा आणि डीआयएटीचे कुलगुरू डा. बी. एच. व्ही. एस. नारायण मूर्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. दोन्ही संस्थांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. डीआयएटीच्या वरिष्ठ अधिका-



यांनी सीडब्ल्यूपीआरएसमधील विविध प्रयोगशाळा आणि भौतिक प्रारूप सुविधांची पाहणी केली. हायड्रालिक माडेलिंग किनारी प्रक्रियेचे अध्ययन, उपकरणीकरण आणि सांख्यिकीय सिम्युलेनश या क्षेत्रामधील सीडब्ल्यूपीआरएसच्या विशेष कौशल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नैसर्गिक तसेच नागरी आपत्ती संदर्भात पूर्वसूचना कळण्यासाठी याचा फायदा होणार आहे. हा दोन राष्ट्रीय संघटनांमधील देशातील पहिलाच करार आहे. या संशोधनाच्या माध्यमातून जीवित हानी टळण्यास मदत होईल. त्याचबरोबर मालमत्तेचे होणारे नुकसानही टाळता येणार आहे. पावसाळ्यात डोंगराळ भागात होणारे भूस्खलन, पूर येण्यापूर्वी प्रभावीत क्षेत्राचा अचूक अंदाज, पूर्वानुमान लावणे शक्य होणार आहे. धरणाची सुरक्षितता जलसंपत्तीच्या व्यवस्थापनाबाबत अचूक वेळेत नियोजन या अत्याधुनिक प्रणालीच्या माध्यमातून साध्य करण्यात येणार आहे. त्यानुसार पुढील २ वर्षांत या संशोधनाची पहिली प्रायोगिक प्रणाली कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

## नवीन भाडे करार 2025 : ॲडव्हान्स म्हणून घेता येईल फक्त2 महिन्यांचे भाडे

*घरमालक वाढवू शकणार नाही मनमानी पद्धतीने भाडे*

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :केंद्र सरकारने देशभरात 'नवीन भाडे करार २०२५' चे नवे नियम लागू केले असून या नियमांमुळे घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील वाद कमी होतील. याशिवाय भाड्यानं राहणं सोपं होईल आणि मालमत्ता भाड्यानं देण्याची प्रक्रिया अधिक विश्वासार्ह बनेल. मिळालेल्या माहितीनुसार, आता प्रत्येक भाडे करार २ महिन्यांच्या आत नोंदणीकृत करणे बंधनकारक आहे. ही नोंदणी राज्य सरकारच्या ऑनलाइन प्रापर्टी रजिस्ट्रेशन संकेतस्थळावर किंवा रजिस्ट्रार कार्यालयात करता येईल. मुदतीत नोंदणी न केल्यास ५ हजार रुपयांचा दंड भरावा लागेल. बंगळुरू सारख्या शहरांमध्ये आधी एक वर्षाचे भाडे ॲडव्हान्स घेतले जात असे. त्यामुळे वाद होत होता.

**भाडेकरूंना मोठा दिलासा कसा?**

सिक्युरिटी डिपाझिटः राहत्या घरासाठी फक्त २ महिन्यांचे भाडे सिक्युरिटी डिपाझिट म्हणून घेता येईल.

**भाडेवाढः** भाडे वाढवण्यापूर्वी घरमालकानं



भाडेकरूला आधीच नोटीस देणे बंधनकारक आहे. त्यामुळे मनमानी भाडेवाढ होणार नाही.

**घर रिकामं करणंः** योग्य नोटीस आणि कायदेशीर प्रक्रिया न पाळता कोणत्याही भाडेकरूला घरातून काढता येणार नाही.

**घरमालकांनाही दिलासा कसा?**

भाडं थकल्यास : एखाद्या भाडेकरूनं सलग ३ महिने वा त्याहून अधिक काळ भाडं भरलं नाही, तर घरमालक प्रकरण ट्रिब्युनलकडे नेउ शकतो.

**वाद निवारण :** वाद लवकर सोडवण्यासाठी विशेष ट्रिब्युनल स्थापन करण्यात आली आहेत. हे वाद ६० दिवसांत निकाली निघणार.

**कर सवलत :** भाड्यावर टीडीएस कपातीची मर्यादा वाढवून ६ लाख रुपये आहे. त्यामुळे लोकांच्या हातात अधिक पैसे राहतील.

**भाडे करार कसा नोंदवावा** -तुमच्या राज्याच्या मालमत्ता नोंदणी पोर्टलला भेट द्या. घरमालक आणि भाडेकरू दोघांची ओळखपत्रं (आयडी प्रूफ) अपलोड करा. भाड्याचे तपशील (भाड्याची रक्कम, कालावधी वगैरे) भरा. नंतर ई-साइन करून करार सबमिट करा. यानंतर तुमच्या भाडेकराराची नोंद पूर्ण होईल.

## एकाच कुटुंबातील चौघा जणांचा मृत्यू

**गांधीनगर/वृत्तसंस्था :** घरात लागलेल्या आगीमुळे झालेल्या विषारी धुराने गुदमरुन एकाच कुटुंबातील चौघा जणांचा मृत्यू झाला. गुजरातमधील गोध्रा येथे हा दुर्दैवी प्रकार घडल्याचे समोर आले आहे. हा संपूर्ण परिवार एका मोठ्या आनंदाच्या क्षणाची तयारी करत होता. दुस-या दिवशी मोठ्या मुलाचा साखरपुडा होणार होता, मात्र दुर्दैवाने ही दुर्घटनेत चौघांनाही प्राण गमवावे लागले. गुरुवारी रात्री उशिरा घराच्या तळमजल्यावर ठेवलेल्या सोफ्याला शार्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. काचेने चारही बाजूंनी बंद असल्याने विषारी धूर बाहेर पडू शकला नाही आणि घरातच कोंडला. यामुळे कुटुंबातील सदस्यांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. मृतांमध्ये कमलभाई दोशी (५०), त्यांची पत्नी देवलबेन (४५), मोठा मुलगा देव (२४) आणि लहान मुलगा राज (२२) यांचा समावेश आहे. सकाळी शेजा-यांनी घरातून धूर येताना पाहिल्यानंतर अग्निशमन दलाला पाचारण केले. मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता आणि घरातील सर्व सदस्यांचा मृत्यू झाला होता. २४ वर्षीय देव दोशीचा दुस-या दिवशी साखरपुडा होणार



होता. दोशी कुटुंब त्यासाठी सकाळीच वापीला जाण्यासाठी निघणार होते, मात्र आदल्या रात्रीच हा प्रकार घडला. दोशी कुटुंब गोध्र्यामध्ये वर्धमान ज्वेलर्समुळे चांगलेच परिचित होते. ज्या घरातून देव दोशीला साखरपुड्यासाठी निघायचे होते, त्याच घरातून आज चारही सदस्यांची अंत्ययात्रा निघाली. ही अत्यंत हृदयद्रावक घटना असल्याचे शेजा-यांनी म्हटले आहे. इतक्या आनंदाच्या प्रसंगी घडलेल्या या दुर्घटनेने संपूर्ण शहराला हादरवून सोडले आहे. या पार्श्वभूमीवर विषारी धुरामुळे मृत्यू कसा होतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. आग लागल्यावर निघणारा धूर थेट श्वासावाटे फुफ्फुसात जातो. या धुरामध्ये कार्बन मोनोऑक्साइडसारखे वायू असतात, जे रक्तातील ऑक्सिजनची जागा घेतात. यामुळे शरीराला आवश्यक असलेला ऑक्सिजन मिळत नाही. काही मिनिटांतच चक्कर येउ लागते, श्वास घेण्यास त्रास होतो आणि व्यक्ती बेशुद्ध पडते. जर व्यक्ती दीर्घकाळ विषारी धुराच्या संपर्कात राहिली, तर ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे आणि विषारी वायूंच्या प्रभावामुळे मृत्यू ओढवू शकतो.

*'ऑपरेशन सिंदूर'वरील अमेरिकचा नवा अहवाल समोर*

## भारताचे 3, पाकिस्तानचे 5 जेट पाडल्याचा दावा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात यावर्षी ७ ते १० मे दरम्यान झालेला चार दिवसांचा लष्करी संघर्ष जरी संपला असला, तरी त्या काळात झालेले नुकसान आणि ऑपरेशन सिंदूर याबाबतच्या चर्चा अद्याप सुरू आहेत. अमेरिकन काँग्रेसच्या नव्या अहवालाने हा मुद्दा पुन्हा एकदा पुढे आणला आहे असून अनेक मोठे दावे केले आहेत. अहवालानुसार, भारताच्या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानने आपल्या ५ लष्करी विमानांना गमावले. भारताने देखील तीन जेट गमावले, मात्र अहवालानुसार ती सर्व राफेल नव्हती. ही माहिती अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या जुन्या दाव्यांशीही जुळते, ज्यात त्यांनी म्हटले होते की संघर्षात एकूण ८ जेट पाडले गेले होते. पाकिस्तानच्या काही माजी लष्करी अधिका-यांनीही माध्यमांमध्ये आपली विमानं हरवल्याचे मान्य केले होते.

ट्रम्प यांनी अनेकदा दावा केला आहे की मेच्या सुरुवातीला झालेल्या या संघर्षात एकूण ८ विमाने खाली पाडली गेली. अमेरिकन अहवालाशी तुलना करता स्पष्ट होते की पाकिस्तानने एकट्यानेच ५ युद्धविमान गमावली, ज्यामुळे त्यांच्या विजयाच्या दाव्यांची पोल उघड होते आणि भारताचे दावे अधिक बळकट होतात.अमेरिकन अहवालात असेही म्हटले आहे की संघर्षानंतर चीनने भारताच्या राफेल विमानांबाबत चुकीची माहिती पसरवली. असा आरोप आहे की चीन हे सर्व आपली जे-१० फायटर जेट्स आणि पीएल-१५ क्षेपणास्त्रे विकण्यासाठी करत होते, ज्यांचा वापर भारताची विमाने पाडण्यासाठी करण्यात आला, असे सांगितले जात होते.

## दिल्ली स्फोट प्रकरणी मोठा खुलासा!

# 'घरघंटी'च्या मदतीने बनवले होते बॉम्ब; साहित्य जप्त केले

**नवी दिल्ली** - राजधानी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या कार स्फोटाबाबत तपास यंत्रणांना मोठा



पुरावा सापडला आहे. अटकेत असलेला दहशतवादी मुझम्मिल शकील गनईने स्फोटक तयार करण्यासाठी पिठाची गिरणी आणि इलेक्ट्रिक मशीनचा वापर केला होता. तपासात पोलिसांना हरियाणाच्या फरीदाबाद येथे एका टॅक्सी ड्रायव्हरच्या घरी ही गिरणी आणि मशीन सापडली आहे.

**फरीदाबाद येथे भाड्याच्या खोलीत बनवली जात होती स्फोटके-** जम्मू काश्मीरच्या पुलवामा येथील रहिवासी मुझम्मिल शकीलने फरीदाबाद येथे भाड्याने खोली घेउन राहत होता. त्याने खोलीत घरघंटीच्या मदतीने यूरिया बारीक करायचा. त्यानंतर इलेक्ट्रिक मशीनमधून त्याला रिफाइन करून त्यातून केमिकल तयार करत होता. ९ नोव्हेंबरला पोलिसांना याच जागी ३६० किलो अमोनियम नाइट्रेट आणि अन्य स्फोटके सापडली होती. आता इतक्या दिवसांच्या चौकशीनंतर मुझम्मिल शकीलने तो अमोनियम नाइट्रेट यूरियातून वेगळे करून स्फोटके कशी तयार करत होता त्याचा खुलासा केला आहे. तो फरीदाबाद येथील अल फलाह यूनिवर्सिटीत डाक्टर होता.

**टॅक्सी ड्रायव्हरही ताब्यात, NIA ची चौकशी सुरू** -एनआयएच्या टीमने फरीदाबाद येथील त्या टॅक्सी ड्रायव्हरला ताब्यात घेतले आहे ज्याच्या घरातून हे साहित्य सापडले. जवळपास ४ वर्षापूर्वी टॅक्सी ड्रायव्हरची आणि मुझम्मिल शकीलची ओळख झाली होती. टॅक्सी ड्रायव्हरच्या मुलाची तब्येत खराब होती त्याच्या उपचारासाठी तो अल फलाह मेडिकल कालेजला गेला होता. दरम्यान, लाल किल्ल्याजवळ आय २० कारमध्ये आत्मघाती हल्ला झाला. त्यात १५ लोकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात दहशतवादी हल्लेखोर उमर नबी मारला गेला. तो काश्मीरचा राहणारा होता. तोदेखील अल फलाह यूनिवर्सिटीशी जोडलेला होता. स्फोटाच्या काही तास आधी जम्मू काश्मीर पोलिसांनी पाकिस्तानातील जैश ए मोहम्मद आणि अल कायदाशी निगडित एका व्हाइट कालर दहशतवादी माड्यूलचा पर्दाफाश केला होता. ज्यात २९०० किलो स्फोटके सापडली होती. यात अमोनियम नाइट्रेटचा समावेश होता. दिल्ली स्फोटात त्याचा वापर केल्याचे बोलले जाते.

*डाक्टर शाहीन निघाली दहशतवादी फंडिंगची मास्टरमाईंड; बिटकाइन आणि हवालातून कोट्यवधींचा व्यवहार*

**फरीदाबाद**-सहारनपुर माड्यूलमध्ये सुरक्षा यंत्रणांनी केलेल्या तपासात एक अत्यंत धक्कादायक खुलासा झाला आहे. या



माड्यूलमध्ये पकडलेल्या डाक्टर शाहीन हिचे थेट जैश-ए-मोहम्मद आणि अल-कायदाच्या हँडलर्सशी संबंध असल्याचे समोर आले आहे. दहशतवादी कारवायांसाठी या डाक्टरला बिटकाइन आणि हवालामार्फत लाखो रुपयांचा निधी मिळाल्याचे सबळ पुरावे तपास यंत्रणांच्या हाती लागले आहेत.

**डाक्टर शाहीनच दहशतवादी फंडिंगची प्रमुख सूत्रधार**-अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या मोबाईल फोनची तपासणी आणि कसून चौकशी केल्यानंतर डाक्टर शाहीन हिची भूमिका दहशतवादी कारवायांसाठी पैसा गोळा करणारी म्हणजेच मुख्य फंडर म्हणून स्पष्ट झाली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, जैश-ए-मोहम्मद आणि अल-कायदाच्या हँडलर्सकडून डाक्टर शाहीनला बिटकाइनच्या माध्यमातून तब्बल ९ लाखांहून अधिक रक्कम पाठवण्यात आली होती. 'पी२पी' पद्धतीने शाहीन ही रक्कम १० हून अधिक बँक खात्यांमध्ये काढली गेली होती. याशिवाय, सौदी अरेबिया, तुर्कि आणि सीरियामधूनही डाक्टर शाहीनला हवालामार्फत ६ लाखांहून अधिक रुपये मिळाल्याचे समोर आले आहे. चौकशीमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण बाब उघड झाली आहे. डाक्टर शाहीन केवळ बाहेरून निधी स्वीकारत नव्हती, तर ती स्वतःही या माड्यूलसाठी वर्गणी गोळा करत होती. लोकांना ती सांगायची की हा पैसा मुसलमानांसाठी स्वस्त दरात उपचार देणारे रुग्णालय बांधण्यासाठी गोळा केला जात आहे. या निधीशिवाय, डाक्टर शाहीनने तिच्या स्वताच्या कमाईतूनही ४ लाख रुपये या माड्यूलच्या दहशतवादी कारवायांमध्ये गुंतवले होते, अशी माहिती तपास यंत्रणांनी दिली आहे.

**१० दिवसांच्या चौकशीतून भूमिका निश्चित**-१० नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या १० दिवसांच्या कसून चौकशीतून या माड्यूलमध्ये सहभागी असलेल्या सर्व आरोपींची भूमिका निश्चित करण्यात आली आहे. डाक्टर शाहीनची भूमिका ही पैसे गोळा करणे आणि हँडलर्सकडून आलेला निधी वेगवेगळ्या

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## पुन्हा नितीश कुमार!

बिहारचे ३५वे मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांनी पदाची शपथ घेतली, तेव्हा त्यांनी भारतात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पदी राहिलेल्या आतापर्यंतच्या पहिल्या दहा मुख्यमंत्र्यांत आपले स्थान नक्की केले. या यादीत सिक्कीमच्या पवनकुमार चामलिंग, ओडिशाच्या नवीन पटनाईक, पश्चिम बंगालच्या दिवंगत ज्योती बसू, अरुणाचल प्रदेशच्या गेगाँग अपांग, मिझोरामच्या लाल ठाणवाला, हिमाचल प्रदेशच्या वीरभद्र सिंग आणि त्रिपुराच्या माणिक सरकारनंतर त्यांचा नंबर लागला असला, तरी त्यांची ही कारकीर्द किती मोठी ठरते, यावर ते या यादीत किती पायऱ्या वर चढणार, ते ठरेल. गंमत म्हणजे, ज्या लालूप्रसाद यादव यांच्याबरोबर त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली, काही काळ त्यांच्याबरोबर सत्तेतही राहिले, वैचारिक सहप्रवासी म्हणून सरकार बनवताना एकत्र निर्णय घेतले, त्या लालूप्रसादांच्या राष्ट्रीय जनता दलाला पराभूत करूनच नितीश कुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. १९८९ ची लोकसभा आणि १९९० ची विधानसभा निवडणूक लालूप्रसाद आणि नितीश कुमार यांच्या एकत्रित नेतृत्वाखाली लढवली गेली होती. पण, मुख्यमंत्री झाल्यानंतर लालूंचे रंग बदलू लागले. त्या वादातून १९९४ मध्ये जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली 'समता पार्टी'ची स्थापना झाली. लालूंचा सामाजिक न्यायाचा अजेंडा तेव्हा एवढा जोरात होता, की समता पार्टीला यश मिळणं शक्यच नव्हतं. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज आणि नितीश यांनी त्यामुळे १९९८ मध्ये एकत्र येऊन (मुख्यतः बिहारला डोळ्यासमोर ठेवून) राष्ट्रीय स्तरावर 'राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन'ची स्थापना केली. या आघाडीने नितीशना खरी चाल दिली. चारा घोटाळ्यात लालूंची प्रतिमा धुळीला मिळाली असताना तुरुंगात जाण्यापूर्वी त्यांनी राजकारणात पूर्ण अननुभवी असलेल्या पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्रीपदी बसवल्याने त्यांची होती नव्हती तीही मान्यता संपली. परिणामी सन २००० पर्यंत लालूंचा जनाधार घटत गेला आणि नितीश कुमार यांचा वाढत गेला!सन २००० मध्येच नितीश कुमार यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. पण, ते सरकार प्रत्यक्षात आलंच नाही. त्याची नुकसानभरपाई म्हणून नितीश कुमार यांची वर्णी थेट अटलजींच्या मंत्रिमंडळात, केंद्रात लागली. तिथे त्यांनी आपल्या प्रशासन कुशलतेचा चांगला ठसा उमटवला. देशभर त्यांची प्रतिमा तयार झाली. लालूंवर भ्रष्टाचाराची एकामागोमाग एक प्रकरण शेकत असताना, त्यातून सावरण्यासाठी त्यांनी घेतलेल्या 'अतिरेकी सामाजिक न्याया'च्या धोरणाने गांवागांवात वेगळ्या चर्चा सुरू झाल्या. लालू आणि नितीश यांच्यातील त्यावेळच्या तुलनेतच नितीश पुढे निघून गेले. लालू वेगवेगळ्या आरोपात अडकत गेले. लालू आणि नितीश यांचे राजकीय-सामाजिक विचार एक असले, तरी राजकीय मूल्यकल्पना कशा वेगळ्या होत्या, याचा एक किस्सा बिहारमध्ये चांगलाच प्रसिद्ध आहे. २००५ मध्ये विधानसभा निवडणुकीत 'राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन'ला बहुमत मिळाले. पण, ते स्पष्ट बहुमत नव्हते. काही आमदार कमी पडत होते. त्यावर तोडगा काढण्यासाठी समता पार्टीचे अध्यक्ष म्हणून जॉर्ज यांच्या निवासस्थानी एक बैठक बसली. बैठकीला नितीश कुमार, शरद यादव, दिग्विजयसिंह असे चार-पाच महत्त्वाचे नेते होते. बरीच आकडेमोड करूनही गणित जुळत नव्हते. शेवटी आपल्यातल्याच काही आमदारांशी बोलून निधीची व्यवस्था करावी आणि त्यातून सरकार स्थापनेच्या प्रक्रियेला गती द्यावी, अशी सूचना पुढे आली. ती सूचना ऐकून नितीश कुमार यांनी जागच्या जागी त्या सूचनेला तीव्र विरोध केला. 'अशा प्रकारे मुख्यमंत्रीपद मिळणार असेल, तर ते मला नको' असे त्यांनी त्या बैठकीत बजावले आणि बैठक मोडली. राजकीय पेच कायम राहिला. त्यामुळे, पुन्हा निवडणूक घ्यावी लागली. ऑक्टोबर २००५ मध्ये झालेल्या त्या निवडणुकीत जनता दलाला (संयुक्त) ८८ जागा मिळाल्या! विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष म्हणून बिहारी जनतेने नितीश कुमार यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले. नितीश कुमार त्यावेळी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. पुढे त्यांनी आपला सिलसिला चालूच ठेवला. त्याचाच पुढचा अध्याय कालपासून सुरू झाला. गेल्या १९ वर्षांच्या प्रवासात नितीश कुमार यांनी कधी लालूप्रसादांच्या राष्ट्रीय जनता दलाची साथ घेतली, तर कधी भारतीय जनता पक्षाची. त्यावरून त्यांचा 'पलटूराम' असा उपहासही झाला. पण, आपल्या राजकीय अस्तित्वासाठी आणि राजकीय अजेंड्यासाठी केलेल्या अशा तडजोडींतही त्यांची 'सुशासनबाबू' ही प्रतिमा कायम राहिली. ज्या राज्याचा उल्लेख देशात केवळ 'अतिमागास', 'जंगली', 'मध्ययुगीन मानसिकतेचे राज्य' असा केला जात होता, त्याच राज्याला त्यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. बिहारच्या आमूलाग्र परिवर्तनाला हात घातला. २०२४-२५ची ताजी आकडेवारी पाहिली, तर बिहारची अर्थव्यवस्था ८.६४ टक्के दराने वाढते; खरे तर धावते आहे!सलग १९ वर्षे मुख्यमंत्रीपदी असलेल्याच्या विरोधात आपोआपच जनमत तयार होते. सत्तेच्या विरोधातला रोष एकवटतो, असे म्हटले जाते. नितीश कुमार यांच्याविषयी ते घडले नाही. उलट, त्यांचा पाठिंबा वाढतच राहिला. याचे कारण, सामाजिक बदलासाठी निर्णय करण्याचा आग्रह आणि स्वतःची मतपेढी तयार करण्याची दूरदृष्टी. समाजातील सर्वात मोठ्या घटकाला, महिलांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी सातत्याने योजना आखल्या आणि त्याची गावपातळीपर्यंत नीट अंमलबजावणी होईल, याची दक्षताही घेतली. लालूप्रसाद यांच्याप्रमाणे न वागता त्यांनी आपल्या कुटुंबाला, नातेवाइकांना राजकीय पटलापासून कटाक्षाने दूर ठेवले. नाही. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर लगेच मुख्यमंत्रीपद न घेता त्यांनी सामाजिक समीकरण आणि आपली प्रतिमा या दोन्हींचा विचार करून खुबीने जितनराम मांझी यांना मुख्यमंत्री केले. राजकारणात वेगापेक्षा असा हिशोबी संयमच बहुतेकदा हुकमी यश देत असतो. निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री महिला रोजगार योजने' वर चहूबाजूंनी टीका झाली. 'पोल्समॅप' या संस्थेने घेतलेल्या मतदानोत्तर चाचणीत ज्यांना या योजनेचा लाभ झाला, त्यापैकी ६९ टक्के महिलांनी 'अशाप्रकारे निवडणुकीआधी थेट लाभाच्या योजना अयोग्य असल्या'चे मत नोंदवले. पण, हे पैसे आपल्या खात्यात कशासाठी आले, तेही त्यांना नीट माहीत होते. त्यांनी त्यानुसार मतदानही केले! महिलांना दिलेल्या अशा थेट लाभाच्या योजनांनी महाराष्ट्रासह इतर राज्यातही 'जादू' केली, हे जगजाहीर आहे. त्याचा लाभ नितीश कुमार यांना झालाच. पण, त्याआधी गेली काही वर्षे ते 'महिला' हाच आपला जनाधार, असे ठरवून काम करत होते. शाळेत जाणाऱ्या मुलींना मोफत सायकलपासून बचत गटांना दिलेल्या विविध प्रोत्साहन योजना, ग्रामीण जीवनोन्नती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी त्यांना हात देऊन गेली. जात आणि जातीभेदाने ग्रासलेल्या बिहारला, बिहारच्या राजकारणाला नितीश कुमार यांनी यानिमित्ताने अलगद भौतिक कार्यक्रमांवर आणले, हे त्यांचे यश इतिहासात कायमचे नोंदवले जाईल. भविष्यात त्यांच्याकडून म्हणूनच अधिक अपेक्षा आहेत.

# बिहारचा धक्का, कर्नाटकात बदल पक्का?



**नव्या पंखांना योग्यवेळी बळ न देणे हे काँग्रेसचे जुने दुखणे आहे. राष्ट्रीय राजकारणात ते होतेच; राज्यांच्या राजकारणातही युवा नेत्यांच्या आकांक्षांना धुमारे फुटत असताना ज्येष्ठ नेत्यांच्याच हाती सत्ता राहू देण्याचे धोरण काँग्रेस अजूनही अवलंबते. तेच काँग्रेसला मारक ठरतेय का? किमान कर्नाटकात तरी तसे दिसते आहे. आता बिहार निकालानंतर कर्नाटकात तरी बदल अपेक्षित आहेत.**

काँग्रेसचे गोव्याचे आमदार निवडणुकीनंतर भाजपवासी का झाले? मध्य प्रदेशमधील कमलनाथ सरकार ज्योतिरादित्य शिंदे यांना का पाडावेसे वाटले? राजस्थानध्ये अशोक गेहलोत यांना सचिन पायलट यांचा पुरेसा पाठिंबा का मिळाला नाही? या प्रश्नांची उत्तरे काँग्रेसने शोधली नाहीत किंवा शोधावीशी वाटली नाहीत. मात्र गेल्या आठवड्यात बिहारी जनतेने काँग्रेसला नाकारले. त्याची तरी कारणमीमांसा काँग्रेसला करावीच लागेल. कारण मतचोरीसारखा लोकशाहीच्या पायालाच हात घालणारा मुद्दा दोन महिने आधी बाहेर आणूनही काँग्रेसला त्याचा लाभ झालेला दिसत नाही.

नव्या पंखांना योग्यवेळी बळ न देणे हे काँग्रेसचे जुने दुखणे आहे. राष्ट्रीय राजकारणात ते होतेच; राज्यांच्या राजकारणातही युवा नेत्यांच्या आकांक्षांना धुमारे फुटत असताना ज्येष्ठ नेत्यांच्याच हाती सत्ता राहू देण्याचे धोरण काँग्रेस अजूनही अवलंबते आहे. तेच काँग्रेसला मारक ठरतेय का? किमान कर्नाटकात तरी तसे दिसते आहे. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवून भाजपला सत्तेवरून हटवणाऱ्या काँग्रेसने मुख्यमंत्रिपद देताना सिद्धरामय्या या ज्येष्ठ नेत्याचीच पुन्हा निवड केली. अडीच वर्षांनंतर मुख्यमंत्रिपद सध्याचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांना द्यावे, असा सत्तावाटपाचा फॉर्म्युला त्याचवेळी ठरल्याचे मानले जाते. त्याला दोन कारणे होती. पहिले म्हणजे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून शिवकुमार यांनी २०१९ ते २०२३ या भाजपच्या सत्ताकाळात पक्षाची केलेली बांधणी आणि दुसरे म्हणजे युवा आमदारांचा त्यांना असलेला पाठिंबा.

सिद्धरामय्या ज्येष्ठ नेते असले तरी ते देवेगौडांच्या निधर्मी जनता दलातून आलेले नेते. त्यामुळे त्यांचा काँग्रेसच्या कार्यकर्तास्तराशी थेट संपर्क नाही. तो शिवकुमारांचा आहे. जिल्हा पंचायत सदस्यपदापासून राजकीय कारकीर्द सुरू करणाऱ्या शिवकुमारांनी त्याच संपर्कातून युवा वर्गाची एकजूट साधली आणि सत्तापालट घडवून आणला. त्यामुळे त्याची बक्षिसी म्हणून आणि सर्वांत पात्र नेता म्हणूनही शिवकुमारांकडे मुख्यमंत्रिपद जाणे अपेक्षित होते. पण शिवकुमारांचेच समवयस्क असलेले डॉ. जी. परमेश्वर, सतीश जारकीहोळी यांसारख्या नेत्यांच्या विरोधामुळे सिद्धरामय्यांना मुख्यमंत्रिपदाची दुसऱ्यांदा संधी मिळाली. १३६ पैकी सुमारे ६५ आमदारांचा पाठिंबा असूनही शिवकुमारांनी उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानले ते केवळ काँग्रेसच्या निष्ठेसाठी आणि सोनिया, राहुल गांधी यांच्या शब्दाखातर. तथापि, त्यांच्या मनातील खदखद आणि सत्तेची आकांक्षा कुठल्या ना कुठल्या माध्यमातून उफाळून येतेच. काही लोकांना फक्त सत्ता हवी असते आणि काही लोक फक्त कामच करत राहतात, असे विधान शिवकुमार यांनी बुधवारी इंदिरा गांधी जयंती कार्यक्रमात केले. त्यावेळी खुद्द मुख्यमंत्रीही बाजूला होते. त्यांच्या या विधानाचा थेट अर्थ अडीच वर्षांपूर्वी हुकलेल्या मुख्यमंत्रिपदाशी आहेच; शिवाय आता होऊ घातलेल्या बदलांशी, पण त्यातही येणाऱ्या अडथळ्यांशी आहे. कारण सिद्धरामय्या सहजासहजी मुख्यमंत्रिपद सोडतील, ही शक्यता धूसरच. त्यातच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सत्ताबदलाबाबत लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनानंतरच काय तो निर्णय होईल, असे सांगून पुन्हा 'वेट अँड वॉच'चा संदेश शिवकुमारांना दिलाय. त्यामुळेच की काय, प्रदेशाध्यक्षपदही सोडण्याची तयारी शिवकुमारांनी दर्शवली आहे. हा खरे तर हाय कमांडला थेट संकेत आहे. पण तो उमजून घेऊन हाय कमांड कृती करणार का, हा प्रश्न आहे.

न्यूसन्स व्हॅल्यू ज्याची जास्त, त्याला आधी शांत करा, हा व्यवस्थापन शास्त्राचा नियम काँग्रेस नेहमी वापरत आलेय. भाजप सातत्याने नव्या चेहऱ्यांना, युवा नेतृत्वाला संधी देत लोकांना आणि स्वपक्षीय नेत्यांनाही धक्का देतो. अशा काळात जुनाट परंपराच बरी, असे म्हणत काँग्रेस वाटचाल करत आहे. त्याचा धक्का त्यांना बिहारमध्ये बसल्याचे मानले जाते. त्यातूनच कर्नाटकात बदल पक्का असल्याचे नव्याने आमदार बनलेल्या शिवकुमारांच्या समर्थकांना वाटू लागलेय. फक्त हा बदल काँग्रेस हाय कमांड ज्येष्ठ नेत्यांच्या गळी कसा उतरवणार, हा प्रश्न आहे. दीर्घकालीन यशासाठी अल्पकालीन नाराजी काँग्रेसने पचवली तरच शिवकुमारांसारखा संघटक नेता कुशल मुख्यमंत्री म्हणून पुढे येईल. अन्यथा ज्योतिरादित्यप्रमाणे शिवकुमार बंडखोरी करणार नसले तरी पक्ष संघटनेपासून त्यांचे दूर जाणे काँग्रेसची वाटचाल खडतर करेल.

### स्वतंत्र उत्तर कर्नाटक

महाराष्ट्रात जसा स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा अधूनमधून उचल खातो, तसाच स्वतंत्र उत्तर कर्नाटकचा मुद्दा कर्नाटकातील राजकारणात कधी कधी जोर पकडतो. दरवर्षी एक नोव्हेंबरला कर्नाटक स्थापनादिनी स्वतंत्र राज्य बनवण्याची मागणी होऊन उत्तर कर्नाटकातील बिदर-गुलबर्ग्यात वेगळा ध्वज फडकवला जातो. यंदाही ते झाले. मात्र यंदा बेळगाव जिल्ह्यातील काँग्रेस आमदार राजू कागे यांनी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून स्वतंत्र उत्तर कर्नाटक स्थापनेची मागणी केली. तसेच बेळगावातील विधान भवनासमोर याच मागणीसाठी गेल्या आठवड्यात आंदोलन झाले. भौगोलिक, सांस्कृतिकदृष्ट्या उत्तर कर्नाटक दक्षिण कर्नाटकपेक्षा वेगळा आहेच. उत्तर कर्नाटकची संस्कृती महाराष्ट्राशी मेळ खाणारी. ती अगदी चालीरीती आणि नामकरणापासून दिसते. एच. डी. देवेगौडा, बी. एस. येडियुराप्पा, डी. के. शिवकुमार हे दक्षिण कर्नाटकी नेते. मल्लिकार्जुन खर्गे, सतीश जारकीहोळी हे उत्तर कर्नाटकी नेते. या नावांमधील फरक म्हणजे उत्तर कर्नाटकात 'नाव, आडनाव' किंवा 'नाव, वडिलांचे नाव, आडनाव' असे नामाभिधान असते. दक्षिण कर्नाटकात ते 'गावचे नाव, वडिलांचे नाव, व्यक्तीचे नाव' असे असते. हा फरक भाषेसह विकासातही आहे. आजपर्यंतचे बहुतांशी मुख्यमंत्री दक्षिण कर्नाटकातून आलेले. साहजिकच दक्षिण कर्नाटकचा विकास झपाट्याने झाला, उत्तर कर्नाटक मागास राहिला. आधीच दुष्काळी, त्यात उद्योग नाहीत, हे उत्तर कर्नाटकचे दुखणे. साखर कारखाने सोडले तर उत्तर कर्नाटकात एकही मोठा उद्योग नाही. हा अनुशेष भरून निघणार नाही, असे ही मागणी करणाऱ्या नेत्यांचे म्हणणे आहे. म्हणूनच देशात पहिला कृषी अर्थसंकल्प मांडण्याचे श्रेय ज्यांना जाते, ते भाजप नेते उमेश कत्ती यांनी ही मागणी सातत्याने लावून धरली होती. बेळगावसह १४ जिल्ह्यांचे कन्नड आणि मराठी असे वेगळे द्विभाषिक राज्य बनवण्याची मागणी ते करत होते. अर्थात द्विभाषिक किंवा कसे, हा पुढचा प्रश्न असेल. पण आता सत्ताधारी काँग्रेसच्याच आमदाराने ही मागणी नव्याने केल्याने कर्नाटक विधिमंडळाच्या येत्या हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याची शक्यता आहे.

**गोपाळ गावडा**



# धोका सिम जॅकिंगचा

**आपल्या हातातील मोबाईलमध्ये असणारे सिमकार्ड हे सध्याच्या डिजिटल युगातील एक अतिमहत्त्वाचा घटक ठरले आहे. कारण याच सिमकार्ड क्रमांकाचा वापर तुमच्या सर्व आर्थिक व्यवहारांसाठी, ओटीपीसाठी केला जात असतो. त्यामुळेच सायबर विश्वातील गुन्हेगारांची नजर या सिमकार्डवर असते. त्यातून सिम हॅकिंग नावाची नवी गुन्हेगारी विकसित झाली असून ती दिवसागणिक वाढत चालली आहे.**

डिजिटल युगात आपल्या दैनंदिन जीवनाचा प्रत्येक भाग आता मोबाईल आणि इंटरनेटशी जोडला गेला आहे. ऑनलाईन व्यवहार, सोशल मीडिया वापर, ई-मेल्स, ऑफिस कामे, अगदी सरकारी सेवासुद्धा आपल्या हातातील स्मार्टफोनवर सहज उपलब्ध झाल्या आहेत, पण या सोयीसुविधांच्या वाढीसोबत एक नवा धोका वेगाने वाढू लागला आहे, तो म्हणजे सिम जॅकिंगचा. या एका तंत्राने देशभरातील अनेक लोकांचे बँक अकाऊंटस् काही मिनिटांत रिकामे झाले आहेत. म्हणूनच या सायबर गुन्ह्याची पद्धत आणि त्यापासून संरक्षणाच्या उपायांची माहिती प्रत्येक मोबाईल वापरकर्त्याने ठेवणे अत्यावश्यक आहे.

अमेरिकेत २०१९ मध्ये ट्विटरचे सीईओ जॅक डोर्सी यांच्या ट्विटर खात्याचा सिम स्वॅपद्वारे ताबा घेतला गेला होता. गुन्हेगारांनी काही मिनिटांतच त्यांच्या नावाने अश्लील ट्विट्स पोस्ट केले. ब्रिटनमध्ये एका गुन्हेगारी टोळीने सिम स्वॅपिंगद्वारे सुमारे २ दशलक्ष पौंडांची फसवणूक केली. भारतामध्येही अनेक प्रकरणांत सरकारी अधिकाऱ्यांचे, पोलिसांचे आणि बँक अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक सिम स्वॅपद्वारे हॅक करून आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. मुंबई सायबर सेलने २०२२ मध्ये एका टोळीला अटक केली होती, ज्यांनी बनावट ओळखपत्रांच्या आधारे नवीन सिम घेतल्या आणि बँक खात्यांमधून पैसे काढले. या सर्व घटनांमुळे सिम जॅकिंग ही केवळ वैयक्तिक समस्या न राहता राष्ट्रीय सुरक्षा विषय ठरली आहे.

सिम जॅकिंग झाल्याचे काही ठळक संकेत दिसतात. उदाहरणार्थ, अचानक तुमच्या फोनवर नेटवर्क नाहीसे होणे किंवा नो सर्व्हिस असा संदेश दिसणे, फोनमध्ये कॉल किंवा मेसेज येणे थांबणे किंवा अनोळखी ओटीपी आणि लॉगिन अलर्ट येणे. अशा लक्षणांचा अनुभव येत असेल तर समजावे की, तुमचे सिम कदाचित हॅक झाले आहे. या परिस्थितीत विलंब न करता तुमच्या मोबाईल ऑपरेटरशी संपर्क साधून सिम त्वरित ब्लॉक करून घ्यावे. त्याच वेळी बँक,ई-मेल आणि सोशल अकाऊंटचे पासवर्ड बदलणे आवश्यक असते.

सिम जॅकिंगमुळे होणारे नुकसान केवळ आर्थिक नसते. हॅकर्स तुमच्या फोनमधील वैयक्तिक माहिती, फोटो, व्हिडीओ आणि संभाषणांपर्यंत पोहोचतात. काही वेळा ते या खासगी माहितीचा वापर ब्लॅकमेलसाठी करतात. अनेकदा ते तुमच्या नावाने नवीन खाते उघडून आर्थिक फसवणूकही करतात. त्यामुळे सिम जॅकिंगचा धोका केवळ पैशांपुरता मर्यादित न राहता तुमच्या वैयक्तिक सुरक्षिततेलाही मोठा धोका निर्माण करतो.सिम जॅकिंग हा गुन्हा नवीन नसला तरी गेल्या काही वर्षांत त्याचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. भारतात डिजिटल पेमेंट्स वाढल्याने आणि ओटीपी आधारित प्रमाणीकरण सार्वत्रिक झाल्याने गुन्हेगारांना यामध्ये नवे संधीक्षेत्र मिळाले आहे. सायबर सुरक्षा संस्थांच्या अहवालानुसार, गेल्या तीन वर्षांत सिम स्वॅपिंग फसवणुकींच्या तक्रारींमध्ये ५०० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. मुंबई, पुणे, दिल्ली, बंगळुरू, हैदराबाद यांसारख्या महानगरांमध्ये बँक खात्यांशी संबंधित फसवणुकीत ही पद्धत सर्वाधिक वापरली जाते.

या सायबर गुन्ह्यापासून बचाव करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे सतत जागरूक आणि सावध राहणे. अनोळखी नंबरवरून आलेले मेसेज, लिंक किंवा ई-मेल उघडू नयेत. फ्री गिफ्ट, लॉटरी, केवायसी अपडेट किंवा बँक खाते बंद होईल, असे आकर्षक मेसेज बहुधा सायबर फसवणुकीचे हत्यार असतात. कोणत्याही कारणाने अनोळखी व्यक्तीला ओटीपी, आधार क्रमांक, पॅन किंवा पासवर्ड सांगू नये. एखादे ॲप डाऊनलोड करताना ते अनावश्यक परवानगी मागत असेल, तर ते ॲप इन्स्टॉल करू नये.मोबाईल फोन सुरक्षित ठेवण्यासाठी काही तांत्रिक उपाय करणेही आवश्यक आहे. सर्वप्रथम सिमकार्ड पिन कोडने लॉक करावे. यामुळे सिम काढल्यास किंवा बदलल्यास तो कोड टाकल्याशिवाय सिम वापरता येणार नाही. तसेच फोनच्या सुरक्षा सेटिंगमध्ये जाऊन कोणते ॲप्स असामान्य फाइल एस्टेंशन्स वापरत आहेत का हे तपासावे आणि गरज नसलेले ॲप्स त्वरित अनइन्स्टॉल करावेत. मोबाईल ऑपरेटरकडे पोर्टिंग लॉक सेवा सुरू करून ठेवावी. यामुळे तुमच्या परवानगीशिवाय कोणालाही तुमचा नंबर पोर्ट करता येणार नाही.

जर कधी सिम जॅकिंग झाल्याचा संशय वाटला तर सर्वात पहिले पाऊल म्हणजे आपल्या मोबाईल सर्व्हिस प्रदात्याला फोन करून सिम ब्लॉक करण्याची विनंती करणे. दुसरे पाऊल म्हणजे बँक, ई-मेल आणि सोशल मीडिया अकाऊंटचे पासवर्ड बदलणे. त्यानंतर सायबर गुन्ह्याची माहिती त्वरित सरकारच्या अधिकृत पोर्टलवर द्यावी. भारतात यासाठी १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर कॉल करता येतो किंवा वेबसाईटवर ऑनलाईन तक्रार नोंदवता येते. ही प्रक्रिया जितकी लवकर केली जाईल तितके नुकसान कमी होते.सायबर सुरक्षा तज्ज्ञांच्या मते, सिम जॅकिंग हा असा सायबर गुन्हा आहे, ज्यात कुठल्याही मोबाईल कंपनीचा फोन पूर्णपणे सुरक्षित नसतो.

'डिजिटल इंडिया' मोहिमेमुळे नागरिकांची ओळख, आरोग्य माहिती, वित्तीय व्यवहार आणि सरकारी सेवांचा वापर हे सर्व डिजिटल प्लॅटफॉर्मवर आले आहेत. या पार्श्वभूमीवर सिम जॅकिंग हा केवळ वैयक्तिक फसवणुकीचा विषय नसून डिजिटल ओळख व्यवस्थापनाच्या सुरक्षेसाठी धोक्याची घंटा आहे.आधार आधारित प्रमाणीकरण, मोबाईल-लिंक्ड ओटीपी आणि डिजिलॉकर प्रणाली या सर्व यंत्रणा सिमच्या सुरक्षिततेवरच अवलंबून आहेत. त्यामुळे सिमवर हल्ला म्हणजे प्रत्यक्षात नागरिकाच्या संपूर्ण डिजिटल ओळखीवर हल्ला होय.

**शहाजी शिंदे**

## निरोगी व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रकर्म!

जीवन वाचवणारा, जीवन जगण्याची आशा देणारा आणि मानवतेची सेवा करणारा सर्वोच्च असा व्यवसाय करणाऱ्यांना देवमाणूस असे म्हटले जाते. व्यक्ती मरणासन्न स्थितीत असताना त्याच्यावर योग्य उपचार करून रुग्णाला जीवनदान देणारे डॉक्टर देवमाणूसच आहेत.नुकताच गुजरात येथे झालेला एक गंभीर गैरप्रकार उघडकीस आला आहे. येथील 'जेसीसी हार्ट इन्स्टिट्यूट'ने चक्क ८०० निरोगी व्यक्तींच्या हृदयाची शस्त्रकर्मे करून त्यांच्या हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत स्टेंट म्हणजे नळी घातली आहे. हे कशासाठी केले, तर 'प्रधानमंत्री जनआरोग्य योजने'तून मिळणारे पैसे कमावण्यासाठी म्हणजेच स्वतःचे खिसे भरण्यासाठी. २-३ नव्हे, तर शेकडो व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रकर्म करण्यात आले.या प्रकरणामुळे चाचणी करणारे, अहवाल देणारे, तसेच संपूर्ण वैद्यकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आतापर्यंत डॉक्टरांनी अनावश्यक चाचण्या करण्यास सांगितल्या, महागडी औषधे दिली, अतिरिक्त शुल्क आकारले आणि कमी अधिक प्रमाणात अनावश्यक शस्त्रकर्म करण्यास सांगितले, अशा घटना घडत होत्या. मात्र गुजरातमधील घटनेने वैद्यकीय क्षेत्राला काळिमा फासला आहे.अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तेथील व्यवस्था आणि चाचण्यांची कागदपत्रे तपासणे अत्यावश्यक आहे.

**प्रिया बागडदेव**

## मार्गशीर्ष महिन्याचे महत्त्व

मार्गशीर्ष महिना सुरू होत आहे. मार्गशीर्ष हा मास (महिना) सर्वश्रेष्ठ आहे; कारण तो प्रत्यक्ष भगवंताची विभूती आहे. गीतेत प्रत्यक्ष भगवंतानेच हा मास म्हणजे माझीच विभूती आहे, असे वचन दिले आहे. भगवंताला भक्तीचे पूर्ण फळ या एकाच मासात भक्ताला द्यावेच लागते. हा रहस्याचा भाग गोकुळातील गोपींना ठाऊक असल्यामुळे याच मासात पूर्वी गोपकन्यांनी स्नान, पूजा आदी कर्मे करून श्रीकृष्णभक्तीचा लाभ करून घेतला आहे. या एकाच मासाच्या सेवेने भगवान श्रीकृष्ण संतुष्ट झाले. त्यांनी गोपींना भोग, मोक्षफल दिले, असे प्रत्यक्ष श्रीकृष्णाचे कथन आहे. सर्व पुण्यकर्मांचा उदय याच मासात (महिन्यात) करून घेता येतो. याच मासात तुळशीचे हार घातलेल्या विष्णुमूर्तीचे नुसते दर्शन घेतले, तरी ब्रह्महत्येपासून मुक्ती मिळते.

**आदिती देखणे**

# विद्यार्थी, पालक त्रस्त ; नागरिकांचा प्रशासनाविरोधात तीव्र संताप

## पुलावरील रस्ता जीर्ण, खड्ड्यांमुळे वाढले अपघात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : गत दोन वर्षांपासून यवतमाळ-नायगाव-मदनी-कोटंबा मार्गावरील तथागत विद्यालयाजवळ असलेला पूल अत्यंत जीर्ण झाला असून, त्यावर मोठमोठ्या खड्डे पडले आहे. यामुळे विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून अपघातांच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

या मार्गावरून रोज शेकडो विद्यार्थी, पालक आणि शिक्षक ये-जा करतात. मात्र, पुलावरील खोल खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून अपघातांच्या घटना वाढत आहे. अंधारात आणि पावसाळ्यात हे खड्डे ओळखता येत नाहीत. यामुळे अनोळखी दुचाकीस्वारांच्या गाड्या घसरून पडण्याचे प्रकार नित्याचे झाले आहेत. अनेक जण किरकोळ जखमी झाले आहेत. भविष्यात मोठी जीवितहानी होण्याची भीती स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. २० नोव्हेंबर रोजी सकाळीच एका दुचाकीस्वाराचे वाहन खड्ड्यांतून उसाळल्याने नियंत्रण सुटून अपघात झाला. सुदैवाने यात कोणतीही मोठी दुखापत झाली नाही. स्थानिक नागरिकांनी अनेकवेळा तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप दुरुस्तीचे कोणतेही काम सुरू केलेले नाही. दोन वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या या पुलाची तातडीने पाहणी करून दुरुस्तीचे काम हाती घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे. आम्ही आमच्या मुलांचा जीव धोक्यात घालून रोज या पुलावरून प्रवास करतो. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष दिले पाहिजे. पूल दुरुस्त न झाल्यास मोठी दुर्घटना घडेल. प्रशासन तात्काळ लक्ष देऊन दुरुस्तीचे काम सुरू करणार नाही, तोपर्यंत नागरिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# वाहतूक पोलिसांचा दुचाकीस्वारांवर कारवाईचा बडगा



**जनमाध्यम प्रतिनिधी**

कळंब : शहरातील विविध भागात वाहतूक पोलिसांनी ठाणेदार राजेश राठोड यांच्या आदेशानुसार शहरात दुचाकी धुमस्टाइलन चालविणारे, विना परवाना दुचाकी चालविणारे अल्पवयीन दुचाकीस्वारांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

शहर वाहतूक पोलिसांनी वाहतुकीच्या नियमाचे पालन न करणाऱ्यांवर कारवाईची मोहीम राबविण्यास प्रारंभ केला आहे.

शहरातील या मोहिमेमुळे अनेक रोडरोमिओ व शाळा कॉलेजसमोर दुचाकी धूम करणारे सैरावैरा झाले होते. शहरातील खासगी शिकवणी, वर्ग शाळा, कॉलेज अशा ठिकाणी दुचाकीस्वारांची धुम असल्याने या ठिकाणी पोलिसांनी गुरुवारी सदर मोहीम राबविली.

या कारवाईत नियमाचे पालन न करणाऱ्या दुचाकीचालकांवर दंडात्मक कारवाई करून चौकशीअंती त्यांना सोडून देण्यात आले.

अशा मोहीम रोज राबविल्यास धूमस्टाइल रोडरोमिओंना लगाम लागेल व चिडीमारी बंद होईल. यामुळे ही दुचाकी रोमिओंची मोहीम राबविण्यात यावी अशी मागणी केली जाते आहे.

# पुसद नगराध्यक्षपदासाठी पाच उमेदवारांमध्ये थेट पंचरंगी लढत



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : आगामी पुसद नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी पार पाडली जाणार असून ३ डिसेंबरला निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत एकूण १५ प्रभागांत ३१ नगरसेवक पदांसाठी १८२ अर्ज वैध ठरले आहेत. मात्र नगराध्यक्ष पदाच्या लढतीत अखेरच्या दिवशी अनेक अपक्षांनी माघार घेतल्याने प्रमुख राजकीय पक्षांचे पाच उमेदवार रिंगणात राहिले असून थेट पंचरंगी लढत होणार आहे.

नगराध्यक्षपदासाठी वैध ठरलेल्या १४ अर्जांमधून भारतीय जनता पक्षाचे निखिल चिद्दरवार, शिवसेना (शिंदे गट) चे ॲड. अनिल ठाकूर, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या मोहिनी इंद्रनील नाईक, महाविकास आघाडीचे डॉ. मोहम्मद नदीम आणि अपक्ष बंडखोर उमेदवार राजू दुधे ही पाच बलाढ्य नावे आता अंतिम स्पर्धेत आहेत. भाजपचे निखिल चिद्दरवार हे २०१६ मध्ये नगरसेवक व गटनेते राहून अनुभवी आहेत. मात्र भाजपमधील गटातटाचे वातावरण त्यांच्या गणितात बदल घडवू शकते. दरम्यान, शिवसेना (शिंदे गट) चे ॲड. अनिल ठाकूर यांनी अखेरच्या दिवशी अधिकृत प्रवेश घेत अर्ज दाखल केला.

माजी नगरसेवक म्हणून त्यांच्या कामांची छाप आजही कायम असून शहरातील शिंदे गटातील वाढती ताकद त्यांना बळ देत आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. मोहम्मद नदीम हे अनुभवी, लोकप्रिय आणि दांडगा जनसंपर्क असलेले नेते आहेत. अनेकवेळा नगरसेवक व उपाध्यक्ष पद भूषविल्यामुळे प्रशासनाचा मोठा अनुभव त्यांच्याकडे आहे. आघाडीतील सर्व पक्ष त्यांच्या मागे ठामपणे उभे असल्याने तेही मजबूत दावेदार म्हणून पुढे येत आहेत. अपक्ष बंडखोर उमेदवार राजू दुधे हे पाणीपुरवठा सभापतीपदाचा अनुभव असलेले ज्येष्ठ नगरसेवक आहेत.

पक्षांतर्गत नाराजीमुळे त्यांनी स्वबळावर लढत दिली असून सामाजिक संस्थांचा व मित्रपरिवाराचा त्यांना व्यापक पाठिंबा आहे. राष्ट्रवादी (अप) पक्षाच्या मोहिनी नाईक या नवख्या उमेदवार असल्या तरी कुटुंबाची नगरपरिषदेत दीर्घकाळापासूनची सत्ता, पती राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचा प्रभाव आणि मतदारांवरील पकड यामुळे त्यांच्याकडेही विजयाची मजबूत शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, पुसद नगराध्यक्षपदासाठीची निवडणूक पाच उमेदवारांमधील चुरशीची ठरत असून शहरवासीयांचे लक्ष या पंचरंगी लढतीच्या निकालाकडे लागले आहे.

# नेर येथे सापडले तब्बल ५.८० लाख रुपये

## पोलिसांची तत्परता व लोकसहभागामुळे टळली शेतकऱ्याची आर्थिक हानी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - नेर येथे आज दि. 21 नोव्हेंबर 2025 रोजी घडलेल्या घटनेने नेर परिसरात काही काळ खळबळ माजली. कृषी उत्पन्न बाजार समिती, नेर येथील व्यापारी मनोज विश्वनाथ वासनिक (रा. अशोक नगर) यांनी यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक येथून शेतकऱ्यांना देण्यासाठी 5,80,000 (पाच लाख ऐंशी हजार रुपये) रक्कम विड्रॉल केली होती.

बँकेतून रक्कम घेऊन दुचाकीवरून जात असताना, नवीन फटाका मार्केट, नेर परिसरात त्यांच्या दुचाकीच्या हॅण्डलवर ठेवलेली पैशांची बॅग अचानक रस्त्यावर पडली. ही बॅग पडल्याचे त्यांना तात्काळ लक्षात आले नाही. काही वेळातच रस्त्यावर मोठ्या रकमेची बॅग पडल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी ती उचलण्यासाठी गर्दी केली.दरम्यान, गस्तीदरम्यान त्या ठिकाणी पोलीस पथक सरकारी वाहनातून दाखल झाले. त्यांनी बॅगेत असलेल्या रकमेबाबत चौकशी केली असता, उपस्थित कोणालाही पैशांबाबत समाधानकारक माहिती देता आली नाही. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ सदर रक्कम ताब्यात घेऊन आवश्यक पंचनामा प्रक्रिया सुरू केली.थोड्याच वेळात व्यापारी मनोज वासनिक हे पुन्हा त्या ठिकाणी परत आले आणि त्यांनी हरवलेल्या पैशांबाबत माहिती देत रक्कम त्यांच्या असल्याचे पुरावे पोलिसांसमोर सादर केले. त्यानंतर मनोज वासनिक व पोलीस पथक मिळून पोलीस स्टेशन, नेर येथे गेले. त्यांनी दिलेल्या माहितीसाठी बँकेमध्ये पडताळणी करण्यात आली. यासाठी यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे मॅनेजर पवन नारायणराव कहारे यांची विचारपूस करण्यात आली. बँक रेकॉर्डची तपासणी केल्यानंतर वासनिक यांनी केलेल्या विड्रॉलची आणि रकमेची सत्यता निश्चित झाली. पुरावा व पडताळणीनंतर पोलीसांनी ताब्यात असलेली संपूर्ण 5,80,000 रक्कम मनोज वासनिक यांना परत दिली. या संपूर्ण प्रकरणात पोलीस विभागाने दाखविलेली तत्परता, प्रामाणिकता आणि सजगता यांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. पोलिसांच्या वेळेवर हस्तक्षेपामुळे मोठी आर्थिक हानी टळली असून हरवलेली रक्कम योग्य मालकापर्यंत सुखरूप पोहोचली.

# दोन शेतमजूर महिलांची निर्घृण हत्या

## पाचोंदा हादरले, दागिन्यांसाठी आवळला गळा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : माहूर तालुक्यातील पाचोंदा गावात शेतात काम करण्यास गेलेल्या दोन महिलांची अज्ञात आरोपींनी गळा आवळून निघृण हत्या केली. अंगावरील दागिने लुटल्यामुळे चोरीच्या उद्देशानेच हे भयानक कृत्य घडविण्यात आले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. गुरुवारी सायंकाळी ही धक्कादायक घटना उघडकीस आल्यानंतर संपूर्ण परिसरात भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अंतकला अशोक आढागळे (५५) आणि अनसूया साहेबराव आढागळे (५०) अशी मृत महिलांची नावे आहेत. दोन्ही महिला नेहमीप्रमाणे दुपारी शेतात कामासाठी गेल्या होत्या. मात्र संध्याकाळपर्यंत घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शेतात शोध घेतला असता त्या रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत आढळून आल्या. घटनास्थळी दिसलेल्या परिस्थितीनुसार दुपारी दोन ते तीन वाजतादरम्यान अज्ञातांनी गळा आवळून त्यांची हत्या केली. त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लंपास केले आहेत. घटनेची माहिती मिळताच माहूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देवीदास चोपडे यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पंचनामा करून परिसराचा सखोल तपास सुरू केला. दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविले आहेत. या दुहेरी हत्याकांडामुळे पाचोंद्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून अज्ञात आरोपींच्या शोधासाठी पोलीस यंत्रणेने युद्धपातळीवर तपास सुरू केला आहे. गुन्हा उघडकीस आणण्यासाठी गुन्हे शाखा, श्वानपथक आणि फिंगरप्रिंट एक्स्पर्ट यांनाही पाचारण करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक चोपडे यांनी दिली.

# वेचक

## गोधणी मार्गावर जनावरांचा वावर

यवतमाळ : शहरातील गोधणी मार्गावर मोकाट जनावरांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. रस्त्याच्या मधोमध जनावरे उभे राहत असल्याने वाहतुकीस खोळंबा निर्माण होत आहे. सदर रस्ता वर्दळीचा असून सकाळपासूनच या मार्गावर विद्यार्थी, कामगार आपआपल्या कामानिमित्त जात असतात. अशा घाईच्या वेळी रस्त्यावर वाहनासमोर अचानक जनावरे येत असल्याने अपघात होत असल्याच्या घटना घडत आहे. मोकाट जनावर रस्त्याच्या मधोमध ठिय्या करून उभे राहतात. बाजूला वाहन नेले असता एखादे जनावर अंगावर आल्यास अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन जनावरांचा बंदोबस्त करण्याची मागणी वाहनधारकांतून होत आहे.

## जागतिक मूळव्याध दिनानिमित्त मोफत तपासणी शिबिर आजपासून

यवतमाळ : जागतिक मूळव्याधदिनानिमित्त शहरातील गवार्ले हॉस्पिटल, अंजनेय सोसायटी येथे २२ व २३ नोव्हेंबर सकाळी ११ ते ०२ वाजतादरम्यान मूळव्याध, भगंदर, फिशर शरीरावरील गाठी, छातीच्या गाठी, स्त्रियांच्या समस्या या सर्व आजाराच्या महिला, पुरुषांसाठी मोफत रोगनिदान तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता पूर्व नोंदणी आवश्यक आहे. गवार्ले पाइल्स हॉस्पिटल येथे या शिबिरांतर्गत आलेल्या रुग्णांची प्रॅक्टोस्कोपी, वजन, बीपी, शुगर ही तपासणी मोफत करण्यात येईल. तसेच कोलोनोस्कोपी किंवा सिग्माइडोस्कोपी या तपासण्यांची गरज भासल्यास सवलतीच्या दरात करण्यात येतील, शिबिरात आलेल्या रुग्णांची शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्यास त्यांना लेझर शस्त्रक्रिया, क्षारसूत्र चिकित्सा, इंजेक्शन ट्रिटमेंट आदी सर्व शस्त्रक्रिया, आवश्यकतेप्रमाणे सवलतीच्या रूपात करून देण्यात येणार आहे. शरीरावरील गाठी, छातीच्या गाठी याही शस्त्रक्रिया तसेच दुभंगलेले कान, चेहरा व शरीरावरील मस, मोल आदी शस्त्रक्रिया सवलतीच्या रूपाने करून देण्यात येणार आहे. या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन गवार्ले हॉस्पिटलच्या संचालिका मूळव्याध भगंदर तज्ज्ञ डॉ. अंजली गवार्ले यांनी केले आहे.

## रोहीच्या धडकेत जखमी युवकाचा मृत्यू

कळंब : तालुक्यातील तिरझडा येथील एक युवक रोहीच्या धडकेत गंभीर जखमी झाला होता. या अपघातात त्याचा सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचारादरम्यान गुरुवार, २० नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास मृत्यू झाला. आशिष दिलीप आगलावे (२७) रा. तिरझडा असे गंभीर जमखी युवकाचे नाव आहे. आशिष हा ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी आपल्या शेतातून दुचाकीने घराकडे जात होता. पाथ्रड फाट्याजवळ त्याच्या दुचाकीला अचानक एका रोहीने धडक दिली. या भीषण धडकेमुळे आशिष दुचाकीवरून खाली पडला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. घटनेनंतर त्याला तातडीने यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृती अधिक गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू होते, परंतु उपचाराला प्रतिसाद न मिळाल्याने आज दुपारी त्यांचा मृत्यू झाला. आशिषच्या अकस्मिक निधनाने गावावर शोककळा पसरली आहे.

## नवोदयमध्ये माजी विद्यार्थी मेळावा

घाटंजी : तालुक्यातील बेलोरा येथील जवाहर नवोदय विद्यालयात ७ डिसेंबर ला माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ७ डिसेंबरलव सकाळी १० ते दुपारी ५ या वेळेत हा मेळावा पारपडणार आहे. विद्यालयातून आतापर्यंत उतिर्ण झालेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकत्र येऊन जुन्या आठवनिंना उजाळा देण्यासाठी व नाते अधिक दृढ करण्यासाठी हा मेळावा घेतला जाणार आहे. सकाळी १० वाजता नवोदय प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच विविध क्रीडा स्पर्धा व मनोरंजनात्मक कार्यक्रम, स्नहभोजन, माजी विद्यार्थ्यांचे अनुभव कथन व सामूहिक संवाद आयोजित करण्यात आला आहे.

## श्री वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात रक्तदान शिबीर

यवतमाळ : श्री वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयातील रक्तसाठ्याचा तीव्र तुटवडा लक्षात घेता जिथे दररोज ४० ते ४५ रक्त पिशव्यांची गरज भासते निस्वार्थ सेवा फाउंडेशन आणि संकल्प फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ येथे २० नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

# चार वर्षाच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचारासंदर्भात सुवर्णकार समाजातर्फे उपविभागीय अधिका-यास निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड : नाशिक जिल्ह्यातील डोंगराळेगावात सुवर्णकार समाजातील चार वर्षाच्या चिमुकलीवर त्याच गावातील विजय खैरनार नावाच्या राक्षसी वृत्तीच्या तरुणाने अत्याचार केला वअत्यंत अमानुषपणे दगडाने ठेचून तिची निर्घृण हत्या केलीया या विकृत मनोवृत्तीच्या गुन्हेगारास कठोरात कठोर शासन करणे बाबत उमरखेड सुवर्णकार समाजातर्फे मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना उपविभागीय अधिकारीउमरखेड यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

एका चिमुरडी सोबत असे निच कृत्य करणाऱ्या विकृतव पाशवी मनोवृत्तीच्या व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या नराधमाचाउमरखेड येथील समस्त सुवर्णकार समाजाच्या वतीने जाहीर व तीव्र निषेधकरण्यात आला. या निंदनीय, पाशवी व अमानवीय घटने संदर्भात समस्त सोनार समाजात चिड व संतापाची भावना असुन गुन्हेगारावर शिघ्र कार्यवाही न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रात भावनांचा तीव्र उद्रेक होऊ शकतो.

या बाबीची प्रशासनाने यांची गंभीर दखल घ्यावी अशी विनंती समाजातर्फे निवेदनात करण्यात आलेली आहे त्यासोबत १) घडलेल्या घटनेच्यातपासात कुठलीही त्रुटी न ठेवता योग्य व शिघ्रगतीने तपास होऊन आरोपपत्र त्वरित न्यायालयात दाखल व्हावे व हा खटला शिघ्रगती विशेष न्यायालयात चालवावा. २) मुख्य गुन्हेगार तसेच आरोपीस सहकार्य करणाऱ्यावर देखील सह आरोपी करुन कार्यवाही करावी. ३) चिमुरडीच्याकुटुंबालाशासनातर्फे संरक्षण आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

याप्रसंगी सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष श्री सुनील टाक सराफ असोसिएशन अध्यक्ष सतीश श्रीरामजवार समाजाचे उपाध्यक्ष सुनील उदावंत, सचिव राम बोकन,कोषाध्यक्ष कैलास उदावंत संचालक दिलीप शहाणे,अनिल नाशिककर, अतुल उदावंत, देविदास शहाणे,योगेश बोकण, अतुल पत्तेवार अतुल मैड,शंकरराव काळे व सुवर्णकार समाजातील सर्व समाज बंधू उपस्थित होते.

# तृतीयपंथीय व्यक्तींनी पोर्टलवर नोंदणी करून ओळखपत्र मिळवावे

## सहायक समाजकल्याण आयुक्तांचे आवाहन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : तृतीयपंथीय व्यक्ती नियमानुसार विहित हक्क व सेवांपासून वंचित राहू नये यासाठी त्यांच्याकडे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने संबंधित पोर्टलवर नोंदणी करून तत्काळ ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त मंगला मून यांनी आज येथे केले.

अत्याचार व हिंसेमुळे मृत्यू झालेल्या तृतीयपंथीय व्यक्तींच्या स्मरणार्थ 20 नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय ट्रान्सजेंडर स्मरणदिन पाळला जातो. त्यानिमीत्त समाजकल्याण कार्यालयात कार्यक्रम झाला. ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टचे पदाधिकारी, आयुष्यमान भारत जिल्हा समन्वयक, तसेच 27 तृतीयपंथीय व्यक्ती व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. श्रीमती मून म्हणाल्या की, तृतीयपंथी व्यक्तींनी https://transgender.dosje.gov.in या पोर्टलवर नोंदणी करुन तात्काळ ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे. त्यामुळे शासनाकडील माहिती अद्ययावत होऊन मतदानपत्र व इतर दाखले आदी बाबींची प्रक्रिया करता येईल. आपल्या कुठल्याही समस्या असल्यास सोमवार किंवा शुक्रवार समाजकल्याण कार्यालयात प्रत्यक्ष भेटता येईल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन व दीप प्रज्वलन करण्यात आले. स्मिता महल्ले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विशाल टावरी यांनी स्माईल योजना, आरोग्य योजनांबद्दल माहिती दिली. अंजूश्री डेरे यांनी स्वागत केले. तृतीयपंथीय व्यक्तींना भारतीय संविधानाच्या प्रास्तविकाची प्रत देऊन गौरविण्यात आले. गौरव गावंडे यांनी आभार मानले.

# बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची सायबर सिक्युरिटीच्या अद्यावत माहितीसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बिजे यांची भेट

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुसद शहर पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस अधिकारी आयपीएस हर्षवर्धन बिजे यांना भेट देऊन ऑनलाईन फसवणुक व त्या अनुषंगाने विविध विषयाची माहिती १७ नोव्हेंबर २०२५ सोमवार रोजी घेतली.बाबासाहेब नाईक इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.अविनाश वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात नवनवीन उपक्रम राबवले जात आहेत आर्टिफिशल इंटेलिजेंन्स अँड डेटा सायन्स या शाखेचे विभाग प्रमुख डॉ.अभय गायकवाड आणि प्रा.गोपाल आडे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.या प्रकल्पाचा एक भाग म्हणून बाबासाहेब नाईक कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कॉलेजचे आर्टिफिशल इंटेलिजंन्स अँड डेटा सायन्स विभागाच्या विद्यार्थी मनस्वी खांडेकर, तन्मय जाधव, वेदिका जामगे, श्रीपाद कुबडे, तनुश्री पाचखंडे यांनी त्यांच्या प्रकल्पाचा भाग म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी आपीएस हर्षवर्धन बिजे यांची भेट घेतली.

या भेटीचा मुख्य उद्देश सायबर गुन्हे, डिजिटल सुरक्षा आणि तपास प्रक्रिया यांचे प्रत्यक्ष ज्ञान घेणे हा होता. सायबर कायदे आणि इंटरनेट सुरक्षित वापराण्याचे महत्व या माहितीमुल्य भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाला व्यावहारिक आणि विश्वसनीय माहितीची जोड मिळाली.

सदर भेटीतील झालेल्या चर्चेमध्ये विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नाची उकल झाली व सायबर सेक्युरिटीची अद्यावत माहिती मिळाली त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपीएस अधिकारी हर्षवर्धन बिजे यांचे यावेळी धन्यवाद व्यक्त केले.

सायबर फ्रॉडचे प्रमाण दिवसेन दिवस मोठ्या झपाट्याने वाढत आहे. आणि त्या बद्दलची माहिती प्रत्येकाला असायलाच पाहिजे तुम्ही याबद्दलची माहिती प्रोजेक्टच्या माध्यमातून लहान विद्यार्थ्यांना देत आहात पण प्रत्येक लहान विद्यार्थ्यान जवळ मोबाईल किंवा लॅपटॉप उपलब्ध असेलच असं नाही आहे.आणि त्यामुळे त्यांच्यापर्यंत योग्य माहिती पोहोचवणार नाही. त्यामुळे महत्त्वाचे हे आहे की या लहान विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातच सायबर सिक्युरिटी बद्दल माहिती उपलब्ध करायला पाहिजे त्यांना अभ्यासक्रमात सायबर सेक्युरिटीचा एक विषय असणे आजच्या काळाची गरज आहे.

**उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद (आयपीएस) हर्षवर्धन बिजे**

# इंडियन बँक ग्राहकांना देणार गोल्ड लोन सुविधा योजनेचा शुभारंभ

**जनमाध्यम प्रतिनिधी**



बाभुळगाव - तालुक्यातील इंडियन बँकेच्या बाभूळगाव शाखेने शेतकरी व सामान्य ग्राहकांसाठी विशेष गोल्ड लोन (सोन्याचे तारण कर्ज) योजनेचा शुभारंभ सोमवारी ( दि. 19) केला. बसस्टॉपजवळील बँकेच्या शाखेत आयोजित विशेष कार्यक्रमात या योजनेचे उद्घाटन करण्यात आले.

या योजनेअंतर्गत ग्राहकांना केवळ ८.८५ टक्के वार्षिक व्याजदराने गोल्ड लोन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही योजना विशेषतः शेतकरी बांधवांसाठी असून, शेतीच्या खर्चासाठी, बी-बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आदी गरजांसाठी त्वरित व कमी व्याजदरात कर्ज मिळणार आहे. त्याचबरोबर व्यवसाय, शिक्षण, वैद्यकीय खर्च किंवा इतर वैयक्तिक गरजांसाठीही ही सुविधा घेता येणार आहे. कार्यक्रमाला शाखा व्यवस्थापक योगेश उमरेडकर, सहाय्यक व्यवस्थापक तथा इतर कर्मचारी आणि ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

“सध्याच्या काळात शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे फार महत्त्वाचे आहे. इंडियन बँकेची ही योजना अत्यंत माफक व्याजदराची असून, कागदपत्रे कमी आणि प्रक्रिया जलद आहे. सोन्याचे मूल्यांकन त्वरित केले जाईल आणि कर्ज लगेच वितरित केले जाईल. **– शाखा व्यवस्थापक – योगेश उमरेडकर.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### तातडीच्या आरआरसी सभा घेण्याच्या निर्णयाने

# संशोधक विद्यार्थी आणि मार्गदर्शक प्राध्यापकांना दिलासा

## शैक्षिक महासंघाच्या मागणीची दखल

**अमरावती/का.प्र,**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आचार्य पदवी प्रबंध मूल्यांकन प्रक्रियेमध्ये निर्माण झालेल्या विलंबाच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने केलेल्या ठोस पाठपुराव्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने अत्यंत महत्वाचा व दूरदर्शी निर्णय जाहीर केला आहे.या निर्णयामुळे सहा ते नऊ महिने विलंबित होत असलेल्या प्रबंध मूल्यांकन प्रक्रियेला आता गती मिळणार असून शेकडो संशोधक विद्यार्थ्यांना तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



महासंघाने १ नोव्हेंबर २०२५ रोजी मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना निवेदन देत प्रबंध मूल्यांकन प्रक्रियेतील गंभीर विलंब, आचार्य कक्षातील अनियमितता आणि संशोधकांच्या भविष्यावर होणारा परिणाम याची सविस्तर माहिती दिली होती. विशेषतः 'फक्त परीक्षक नेमणुकीसाठी पॅनेल देण्यासाठी तातडीने ऑनलाईन आरआरसी बैठका आयोजित करण्यात याव्या' ही मागणी महासंघाने प्राधान्याने मांडली होती.

विद्यापीठ प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेत तातडीने ऑनलाइन आरआरसी बैठका आयोजित करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मानव्यविद्या शाखेच्या २१ व २३ तर दिनांक २८ आणि ३० नोव्हेबर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या आरआसी सभा नियोजित आहेत. या निर्णयामुळे परीक्षक नेमणुकीची प्रक्रिया अत्यंत वेगाने पूर्ण होणार असून प्रबंध मूल्यांकन पुढील टप्प्यात जलद प्रवेश करणार आहे.या तातडीच्या आणि विद्यार्थीहितैषी निर्णयाबद्दल अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाद्वारा कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते,प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, मा. परीक्षा संचालक डॉ. नितीन कोळी आणि आचार्य कक्ष उपकुलसचिव डॉ. मीनल मालधुरे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

■ विद्यापीठाच्या प्रशासकीय संवेदनशीलतेमुळे संशोधक विद्यार्थ्यांना दीर्घकाळ भेडसावत असलेली मूल्यांकन प्रक्रियेतील अडचण दूर होण्यास मदत झाली आहे. हा निर्णय संशोधकांच्या शैक्षणिक कारकिर्दीतील अनावश्यक विलंब रोखण्यास महत्त्वपूर्ण ठरेल.

**-प्राचार्य डॉ. मीनल भोंडे,**
विभागीय अध्यक्ष,
शैक्षिक महासंघ

■ अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि विद्यापीठाच्या तत्परतेमुळे निर्माण झालेल्या या सकारात्मक वातावरणात आचार्य कक्षाने ऑनलाइन आरआरसी बैठका पार पडल्यानंतर परीक्षक पॅनेलला तत्काळ मंजुरी घ्यावी. नियमानुसार प्रबंध मूल्यांकनाची गती राखावी. कुठल्याही परिस्थितीत संशोधक विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम करून सादर केलेले प्रबंध मुल्यांकन प्रक्रियेत खितपत पडू नये. यामुळे विद्यार्थी तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांच्या करियर विकासासाठी विद्यापीठाने केलेले कार्य नक्कीच मोलाचे ठरणार आहे.

**- डॉ. मंगेश अडगोकर,**
विभागीय महामंत्री, शैक्षिक महासंघ

## संक्षिप्त

### बालरोग विभागात बालदिन साजरा



**अमरावती-**श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील बालरोग विभागात १४ नोव्हेंबर २०२५ रोजी अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या मार्गदर्शनात बालदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. रुग्णालयातील उपचार घेत असलेल्या लहानग्यांमध्ये आनंद निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन बालरोग विभागात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन बालरोग विभाग प्रमुख डॉ. प्रतिभा काळे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी विभागाचे डॉ. क्रिष्णा विल्हेकर, डॉ. सतिश तिवारी, डॉ. राजेंद्र निस्ताने, डॉ. पंकज बारबद्दे, डॉ. नरेश तायडे, डॉ. संकेत पांडे तसेच इतर शिक्षकवृंद, रेसिडेंट डॉक्टर, वैद्यकीय विद्यार्थी आणि नर्सिंग स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित सर्व डॉक्टर्स, विद्यार्थी आणि नर्सिंग स्टाफ यांनी बालकांसोबत वेळ घालवत बालदिन संस्मरणीय केला.

### अनिल चिखलकर यांची नियुक्ती



**तिवसा-**गुरुकुंज मोझरी येथील निष्ठावान शिवसैनिक अनिल चिखलकर यांची शिवसेना (शिंदे गट) तिवसा तालुका उपतालुका प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.येथील समर्थ सोटागिर महाराज देवस्थान येथे आयोजित बैठकीत तिवसा तालुक्याची जम्बो कार्यकारिणी गठीत करण्यात आली. यावेळी प्रामुख्याने शिवसेना (शिंदे गटा)च्या जिल्हा नेत्या प्रीती बंड,जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे, विधानसभा संघटक राहुल लांजेवार,तालुका अध्यक्ष शैलेश डहाके,तालुका समन्वयक शिवहरी बोकडे,गणेश डोळस,शहरप्रमुख अजय आमले,तेजस्विनी वानखडे तसेच तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सेवानिवृत्त दिलीप पिढेकर यांचा सत्कार



**अमरावती-**अचलपूर तालुक्यातील कांडली येथील रहिवासी दिलीप पिढेकर हे शिपाई या पदावरुन नुकतेच सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा शाल,सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे सत्कार करण्यात आला.यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा उपध्यक्ष मनोहर कोथळकर,अचलपूर तालुका अध्यक्ष राम लहाळके, तालुका उपाध्यक्ष जय घोरे,युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष उमेश गायकवाड,मंगेश गायकवाड,किरण पिढेकर,प्रियंका पिढेकर,नलिनी पिढेकर,ग्रा.प.सदस्या सोनाली जामठे,पुष्पा जामठे आदिसह परिसरातील समाजबांधव उपस्थित होते.

### सक्षमचे जिल्हा दिव्यांग अधिवेशन रविवारी

**अमरावती-**अमरावती जिल्ह्याचे दिव्यांग अधिवेशन २०२५ रविवार, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते ५.३० पर्यंत स्थानिक एस.व्ही. देशमुख मेमोरियल सभागृह, जिल्हा न्यायालयच्या बाजुला, कॅम्प, अमरावती येथे संपन्न होत आहे.सदर अधिवेशनाचे प्रमुख उद्घाटक प्रसिद्ध उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते चंद्रकुमार उर्फ लप्पीसेठ जाजोदिया असून प्रमुख वक्ते म्हणून लातूर येथील सक्षमचे राष्ट्रीय सहसचिव सुरेश दादा पाटील राहतील तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख राहतील. सदर अधिवेशनाला उपस्थित राहण्याची विनंती अमरावती जिल्हा अध्यक्ष रामप्रकाश गिल्डा, सचिव प्रसाद डोळके, अधिवेशन संयोजक सचिन पालसोकर, सुभाष गावपांडे, संमेलन सह-समन्वयक सुचिता जोशी , गायत्री फडणीस व संपूर्ण जिल्हा कार्यकारिणी यांनी केली आहे.

## महावितरणच्या क्रीडा स्पर्धेतून मिळाली कर्मचाऱ्यांना नवी ऊर्जा

### अमरावती परिमंडळाचे यशस्वी आयोजन

**अमरावती/का.प्र.**

खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक आरोग्यही चांगले राहते. नेतृत्वगुण, टीमवर्क आणि कामकाजातील चैतन्य वृद्धिंगत करण्याची क्षमता खेळात असते. याच उद्देशाने महावितरण दरवर्षी आयोजित करीत असलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा यावर्षी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ,अमरावती येथे मोठ्या उत्साहात पार पडल्या आणि या स्पर्धेतून खेळाडू कर्मचाऱ्यांना नवचैतन्य लाभले.

यावर्षीचे यजमानपद अमरावती परिमंडळास देण्यात आले. प्रादेशिक संचालक परेश भागवत यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्य अभियंता अशोक साळुंके याच्या नेतृत्वात आयोजन समिती स्थापन झाली. अधीक्षक अभियंते दिपक देवहाते,प्रविण दरोली ,दीपाली माडेलवार यांच्या पुढाकाराने सूत्रसंचालन, स्वागत, पथसंचलन, वैद्यकीय-प्रथमोपचार, निवास, भोजन, क्रीडांगण, सुरक्षा, स्वच्छता, प्रसिद्धी यांसह विविध समित्या तयार करण्यात आल्या. स्पर्धेचे उद्घाटन संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आले. राज्यातील १६ परिमंडलांच्या ८ संयुक्त पथकांमधील सुमारे ११६० खेळाडूंनी संचलन करत पाहुण्यांना सलामी दिली. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडांगणावर हा भव्य सोहळा पार पडला.अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता अशोक साळुंके होते. कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे,कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे,पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारेसह मुख्येअभियंते व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी पोलिस बँडच्या निनादात सहभागी झालेल्या ११६० खेळाडूंनी दिलेल्या मानवंदनेमुळे परिसर रंगून गेले होते. टेबल टेनिस, टेनिक्वाईट, कॅरम, कबड्डी, व्हॉलीबॉल, कुस्ती, बुद्धिबळ, खो-खो, ॲथलेटिक्स, क्रिकेट, बॅडमिंटन आणि ब्रिज अशा विविध क्रीडाप्रकारांचा समावेश होता. स्पर्धेचा समारोप संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार आणि संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

### राज्यभरातील ४ लाख ७५ हजार ६६९ विद्यार्थी देणार

## उद्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२५चे आयोजन २३ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील ३७ जिल्ह्यातील १ हजार ४२३ जिल्हा मुख्यालयाच्या केंद्रावर करण्यात आले आहे. या परीक्षेच्या आयोजनाच्या कार्यवाही संदर्भात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे.

पेपर एकसाठी २ लाख ३ हजार ३३४ उमेदवार व पेपर दोनसाठी २ लाख ७२ हजार ३३५ उमेदवार असे एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवार महाटिईटी परीक्षेला प्रविष्ठ होणाऱ्या परिक्षार्थीची संख्या आहे. पेपर एक साठी ५७१ परीक्षा केंद्र आणि पेपर दोनसाठी ८५२ केंद्र अधिग्रहीत असून संपूर्ण वर्गखोल्या व परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सुरक्षा तपासणीसाठी मेटर डिटेक्टरच्या सहाय्याने फ्रिसकिंग केले जाणार आहे. तसेच परिक्षार्थीच्या आवेदनपत्राच्या मूळ डाटाबेसशी साधर्म्य तपासण्यासाठी बायोमेट्रीक व फेस रिक्गनीशन तपासणी करण्यात येणार आहे.

सर्व परीक्षा दालनामध्ये, परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावर व केंद्र संचालकाच्या कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून त्याव्दारे लाईव्ह कास्टींगच्या माध्यमातून सर्व परीक्षा दालनांवर जिल्हा व राज्यस्तरावरून अत्यंत काटेकोरपणे सनियंत्रण ठेवले जाणार आहे. कनेक्ट व्हिूव प्रणालीच्या माध्यमातून प्रत्येक परीक्षा केंद्रसंचालक, परीक्षा संनियंत्रण कक्ष व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद कक्ष यांचेकडे हॉटलाईनचे फोन उपलब्ध असतील सदर सुविधेमार्फत आवश्यकतेनुसार संबंधितांशी संपर्क साधला जाईल व या फोनच्या माध्यमातून दिवसभर नियमितपणे केंद्रसंचालकासाठी विविध सूचना एकाचवेळी निर्गमित करता येतील. दिलेल्या सूचनांचे (Broadcast) संपूर्ण रेकॉर्ड उपलब्ध असणार आहे. जेणेकरून महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेमधील पारदर्शकता व विश्वासार्हता कायम राहून परीक्षा शिस्तबध्द पद्धतीने घेण्यात येईल.

परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थी/उमेदवारांनी परीक्षेसंबंधी युट्युब चॅनेल्स, सोशल मिडिया प्लॅटफॉर्मद्वारे व प्रसार माध्यमाद्वारे दिल्या जाणाऱ्या चुकीच्या बातम्या अफवांवर विश्वास न ठेवता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व http://mahatet.in अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना व माहितीचे अवलोकन करावे, असे परिषदेतर्फे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

## एडिफाय स्कूलचा जिल्हा युवा महोत्सवात विजय

### लोकनृत्य स्पर्धेत प्रथम तर लोकगीत स्पर्धेत द्वितीय

**अमरावती/का.प्र.**

जिल्हास्तर युवा महोत्सव २०२५-२६ मध्ये एडिफाय स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सांस्कृतिक सादरीकरण करत उत्कृष्ट यश मिळवले.महोत्सवात आयोजित फोक डान्स (लोकनृत्य) आणि लोकगीत या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचा प्रभावी ठसा उमटवला.



विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'कोळी नृत्य' हे विशेष आकर्षण ठरले. या नृत्याचा ताल, सादरीकरणाची लयबद्धता आणि पारंपरिक कोळी पोशाखांनी प्रेक्षकांना भारावून टाकले. हे संपूर्ण कोळी नृत्य विद्यार्थ्यांना एडिफाय स्कूलचे सांस्कृतिक प्रमुख भारत मोंढे यांनी प्रशिक्षित केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी फोक डान्समध्ये प्रथम क्रमांक पटकावला. लोकगीत (ग्रुप सॉन्ग) स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मधुर, सुरेल आणि एकसुरी सादरीकरण करीत दुसरा क्रमांक मिळवला.

एडिफाय स्कूलच्या संगीत शिक्षका पल्लवी शिरभाते यांनी कोळीगीत प्रशिक्षित केले होते.स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी असे देवश्री कुयाते, मधुरा बुरांगे, तृष्णा साव, आरणा शर्मा, यथार्थ रायबोले, निधी कडू, शिवांगी खडसे या विद्यार्थ्यांना संगीत शिक्षिका पल्लवी आणि सांस्कृतिक प्रमुख भारत मोंढे सर यांनी संगीत व प्रस्तुतीचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात मान्यवर म्हणून उपस्थित असलेले अनिल भटकर आणि गणेश जाधव यांच्या शुभहस्ते एडिफाय स्कूलच्या विजयी विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. संचालन भारत मोंढे यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत स्कूल डायरेक्टर प्राचार्य डॉ. जेकब दास, देवी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन पुरनलाल हबलानी, संचालक माननीय शिवरामकृष्ण ,संचालिका आदरणीय पल्लवी चकिलाला आणि डायरेक्टर रवी इंगळे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## केंद्र आसरा अंतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

भातकुली पंचायत समिती मधिल केंद्र आसरा अंतर्गत केंद्रस्तरीय प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा, आसरा येथे करण्यात आले होते. यावेळी वर्ग ५वा व ६वा यांचा पहिला गट व वर्ग ७ वा व वर्ग ८वा यांचा दुसरा गट व वर्ग ९वा. व १० वा यांचा तिसरा गट अशा गटात विभागणी करून प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात आली.



पहिल्या गटाला परीक्षक म्हणून दिपक चिंचे ,सुनिल वानखडे व पंकज दहिकर यांनी तर दुसऱ्या गटाला छाया पोटेकर ,अन्सार व शैलेश मांदळे यांनी परीक्षक म्हणून काम पाहले.स्पर्धेत केंद्र आसरा अंतर्गत सर्व शाळा सहभागी झाल्या होत्या.पहिल्या गटात सिद्धेश निलेश मोहोड (जि.प.पूर्व माध्यमिक मराठी शाळा आसरा) (प्रथम क्रमांक) खुशी गजानन रामाघरे(जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा नांदेडा खुर्द (द्वितीय क्रमांक)सृष्टी यशवंत भोपत (जि.प.पूव.र्माध्य मराठी शाळा,आसरा (तृतीय क्रमांक) तर दुसऱ्या गटात वेदांत अनिल थोरात (जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा आसरा ) (प्रथम क्रमांक),आदिती प्रविण सोळंके(जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा, आसरा)(द्वितीय क्रमांक),मैत्रेयी गुडधे (जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा आसरा) (तृतीय क्रमांक) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.


कार्यक्रमाला गजानन सायंके (उच्च श्रेणी मुख्याध्यापक आसरा) शैलेंद्र स.दहातोंडे (केंद्रप्रमुख आसरा)प्रज्ञा रामटेके (विशेष शिक्षिका) व आसरा केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते.संचालन पंकज दहिकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रभाकर धांडगे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी केंद्र आसरा अंतर्गत सर्व शाळांचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक बंधूभगिनी यांचे सहकार्य लागले.

## एकनाथजी रानडे यांच्या जयंतीदिनी आरोग्य तपासणी

**अमरावती/का.प्र.**

हिंदूधर्माची पताका विश्वामध्ये फडकवणारे युगपुरुष, तरुणाईचे आदर्श, स्वामी श्री विवेकानंद यांचे शिल्पस्मारक कन्याकुमारी येथे साकारणारे श्रद्धेय एकनाथजी रानडे यांची जयंती त्यांच्या मूळ गावी, टिमटाळा येथे साजरी करण्यात आली. जनकल्याण सेवा संस्था अमरावतीच्या वतीने संचालित डॉ.हेडगेवार हॉस्पीटल व संवेदना आरोग्य सेवा केंद्र यांच्या पुढाकाराने दरवर्षी हा जयंती सोहळा साजरा केला जातो.

याप्रसंगी व्यासपीठावर विवेकानंद केंद्र ,अमरावतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते संजयजी पितळे प्रमुख अतिथी ,अक्षय धानोरकर प्रमुख वक्ते , जनकल्याण सेवा संस्थेचे उपाध्यक्ष दामोदरजी खंडेलवाल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आणि संस्थेच्या विश्वस्त निता भाराणी होत्या. डॉ.हेडगेवार हॉस्पीटल व संवेदना आरोग्य सेवा केंद्राच्या वतीने जयंती निमित्त आरोग्य तपासणी शिबिरात ४१ रुग्णांनी डॉक्टरांचे मार्गदर्शन प्राप्त केले.बीपी आणि शुगर



असलेल्या ५० पेशंटची निःशुल्क रक्त तपासणी करून देऊन तज्ञ डॉक्टरांच्या आरोग्य तपासणीची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली. टिमटाळा, खिरसाना, निरसाना, आडगाव,सावनेर,जनुना, सारशी, जावरा या गावातील रुग्णांनी या तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

कार्यक्रमाला जनकल्याण सेवा संस्थेचे विश्वस्त आनंद दशपुते, केडिया,डॉ.हेडगेवार हॉस्पिटलच्या वतीने चालणाऱ्या संवेदना आरोग्य प्रसार उपक्रमाच्या संचालिका डॉ.मानसी कविमंडन, बालरोग तज्ञ डॉ.प्रज्ञा बनसोड, डॉ. विधी, विवेकानंद केंद्राचे नगराचे कार्यकर्ते चारूदत्त चौधरी, टाले प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन पारखी, विजया चिखलकर, प्रेरणा नंदापुरे, कोमल कुकडे, अनिकेत कराळे, ऋषी पांडे, श्रुती बामणे, कविता मेंढे, श्रेया रंगारी, तृषांत तव्वर,आकाश काळे, ज्ञानदेव जगताप, ओम, विशाल कटकतलवारे, अनिल यांनी परिश्रम घेतले .

## हिवरखेड येथे शासकीय सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू

**मोर्शी/वार्ताहर**

तालुक्यात दापोरी हिवरखेड परिसरामध्ये शासकीय सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी कापूस उत्पादक शेतकऱ्यांतर्फे करण्यात आली होती. परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन आजपासून दापोरी हिवरखेड परिसरामध्ये पांडव जिनिंग प्रेसिंग इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड कंपनी येथे सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



केंद्र सरकारच्या माध्यमातून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यामध्ये अनेक ठिकाणी शासकीय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात येत आहेत. या खरेदी केंद्रांवर शासनाने कापसासाठी ८ हजार ११० रुपये हमीभाव जाहीर केला आहे त्यानुसार खरेदी करण्यात येत असल्यामुळे नक्कीच यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यास मदत होत आहे.

राज्यामध्ये अनेक ठिकाणी शासकीय हमीभावापेक्षा देखील कमी दराने खाजगी व्यापाऱ्यांकडून कापूस खरेदी केला जात असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. परंतु आता मोर्शी तालुक्यात दापोरी हिवरखेड परिसरामध्ये शासकीय सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमधून आता आनंद व्यक्त केला जात आहे.सद्या सुरू आलेल्या कापूस खरेदीमध्ये ८ ते १२ टक्के पर्यंतच्या ओलाव्याचा कापूस सीसीआय तर्फे स्वीकारण्यात येत असल्याचे यावेळी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सांगण्यात आले. दापोरी परिसरामध्ये सीसीआय अंतर्गत कापसाचे खरेदी केंद्र सुरू केल्यामुळे तालुक्यातील जास्तीत जास्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्यामुळे कापूस खरेदी केंद्र सुरू केल्याबद्दल शेतकऱ्यांनी शासनाचे आभार मानले यावेळी कापूस खरेदी केंद्राच्या उद्घाटना प्रसंगी सी सी आय चे अधिकारी अमित उपाध्याय, माजी पंचायत समिती सभापती दीपक पांडव, माजी सभापती मोर्शी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव लाभेश लिखितकर, पांडव जिनिंग प्रेसिंगचे संचालक संजय पांडव, संचालिका उज्वला संजय पांडव, सर्जेराव पांडव , रजत पांडव,इंद्रायणी पांडव, ग्राम पंचाय सदस्य रुपेश वाळके, गजानन देशमुख, शैलेंद्र साबळे, पंकज सवाई, अंकुश डोंगरे, रघुनाथभाऊ शहाने, किशोर मोहोड, प्रीतम गायकवाड, विशाल संभावित, विकास कुमार यांच्यासह आदी शेतकरी उपस्थिती होते.

### शोभा भुजाडे यांचे निधन

**अमरावती-**शोभा रामदास भुजाडे (७२, रा. पोटे टाऊनशिप, कठोरा रोड) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी व बराच आप्तपरिवार आहे. वरूड येथे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे यांच्या त्या मातोश्री होत्या.

अचलपूर न.प.नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या निवडणुकीत

# प्रहारच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी माजी आ. बच्चू कडू मैदानात

## जुळ्या शहरातील विविध भागात नागरिकांशी साधला संवाद

**अचलपूर/वार्ताहर**

येथील नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी प्रहार जनशक्ती पक्षाकडून सारिका अनिल पिंपळे व जुळ्या शहरातील २० प्रभागात नगरसेवक पदासाठी रिंगणात असलेल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आज २१ नोव्हेंबर रोजी राज्याचे माजी राज्यमंत्री व माजी आमदार बच्चू कडू स्वतः मैदानात उतरले आहे. जुळ्या शहरातील विविध



भागात नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेत त्यांनी नागरिकांशी संवाद साधला.

गेल्या २० वर्षाच्या कार्यकाळात जुळ्या शहरासह मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करून मतदार संघाचा चेहरामोहरा बदलल्याचे प्रतिपादन अचलपूर नगर परिषद माजी उपाध्यक्ष अनिल पिंपळे यांनी केले. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सारिका पिंपळे सुद्धा उपस्थित होत्या. तसेच विविध प्रभागातील नगरसेवक पदाचे प्रहारचे उमेदवार ही उपस्थित होते.एकीकडे माजी आमदार बच्चू कडू यांच्या कार्यकाळात जुळ्या शहरातील २० ही प्रभागात मूलभूत सुविधा उपलब्ध झालेली आहे.यापुढे ही



जुळ्या शहराच्या सर्वांगीण विकासाचा रथ अविरत रित्या सुरू राहावे यासाठी प्रहारचे नगरसेवक पदाचे उमेदवार व नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सारिका पिंपळे यांना विजयी करण्याचे आवाहन ही प्रहार जनशक्ती पक्षाचे नेतेमंडळींनी केले आहे. अनेक ठिकाणी माजी आमदार बच्चू कडू यांचे नागरिकांनी उत्साहात सत्कार व स्वागत केले.

# लोणी जिल्हापरिषद सर्कलमध्ये वीस वर्षांनंतर अनु.जातीला संधी

## उमेदवारीसाठी प्रचंड रस्सीखेच

**लोणी टाकळी/वार्ताहर**

भविष्यात घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये लोणी टाकळी सर्कल हे अनुसूचित जातीसाठी राखीव झाले असल्याने या निवडणुकीत प्रचंड चुरस निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सदर सर्कलमध्ये तब्बल वीस वर्षानंतर अनुसूचित जातीला संधी मिळत असल्याने इच्छुकांची भाऊगर्दी या सर्कलमध्ये पहावयास मिळत आहे.

लोणी टाकळी जिल्हापरिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये बहुतांश लोकांची जनभावना या निवडणुकीत सत्ताधारी व विरोधी पक्ष यासाठी अनुकूल अशी दिसत असताना काँग्रेस व भाजप यामध्ये काट्याची टक्कर होण्याची संकेत मिळत आहेत. दरम्यान शिवसेना ठाकरे पक्षाची उमेदवारी कोणाला मिळते, यावरून समीकरणे जुळविण्यास सुरुवात केली आहे. मागील निवडणुकीत शिवसेना व भाजप यांच्या लढतीमध्ये भाजपने या ठिकाणी निसटता विजय मिळविला. त्यावेळी काँग्रेसची भूमिका महत्त्वाची ठरली, अशी चर्चा जनभावनेत आहे. या सर्कलमध्ये पारंपरिक काँग्रेस आणि शिवसेना याच पक्षाचे प्रामाणिक राहिले असून भारतीय जनता पक्षाने रवींद्र मुंडे या नवख्या उमेदवाराला उमेदवारी देऊन या ठिकाणी नवा इतिहास घडविला.

यावेळी काँग्रेस पक्षाकडून सुशील थोरात, दीपक सवाई, धनंजय मोहोड, प्रवीण मोखले, निलेश लोहकरे आदींनी उमेदवारीसाठी तयारी दर्शविली आहे, तर सत्ताधारी पक्षाचे भाजपचे उमेदवारीसाठी दीपक लोहकरे, मोहन माहुरे, प्रा. प्रेम मनोहर यांनी लॉबिंग सुरू केल्याचे चित्र आहे. शिवसेना उबाठाकडून मनोज गायबोले यांचे नाव सध्या सर्वत्र चर्चेत आहे. सर्कलमध्ये आठ हजाराच्या वर अनुसूचित जाती समाजाची मते असून ओबीसी ५०००, तर ओबीसी ३०००, अल्पसंख्यांक तीन हजार अंशी या मतदारसंघात आहे.

# राजकीय रणधुमाळीत हायटेक प्रचाराचा बोलबाला

**अमरावती/का.प्र.**

पूर्वी कोणतीही निवडणूक म्हटली की, हँडबिल, मोठमोठी कागदी पोस्टर्स, भोंगे, रंगवलेल्या भिंती, बिल्ले, असे प्रचाराचे माध्यम होते. त्या वेळेस जो तो राजकीय पक्ष विविध रंगांनी आपल्या प्रचारासाठी शहरातील भिंती रंगवायचा. विशेष रंग मिळो की न मिळो, चुना आणि गेरूने शहरातील भिंती सर्वसामान्यांचे लक्ष वेधून घ्यायच्या. आजमितीस ती परिस्थिती राहिलेली नाही. आता भिंती रंगविण्याची पद्धत इतिहासजमा झाली आहे. ना कुठे फारसे भोंगे लावायची गरज पडत आहे. आता थेट इंटरनेटद्वारे व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, फेसबुक अशी माध्यमे आली असून, थेट मतदारांच्या मोबाइल स्क्रिनवर



प्रचाराचा धुरळा उडताना दिसून येतोय.

वेबसाईटवर सत्ताधारी सरकारच्या काळात झालेल्या विकासकामांवर प्रकाश टाकणारे अनेक छोटे व्हिडीओही दाखविण्यात येत आहेत. सोशल मीडियामुळे राजकीय पक्ष व पुढाऱ्यांना कोणत्याही निर्बंधाशिवाय जनतेशी थेट संपर्क, मतदारांकडूनसुद्धा राबविलेल्या योजनाबद्दल अभिप्राय मागितला जात आहे, तर विरोधकही गोरगरिबांच्या कल्याणासाठी आमच्याकडे लक्ष द्या या प्रकारचे स्टेटस मोबाइलवर झळकत आहेत. विविध विकासकामे आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले जात आहे.

मतदारांचे लक्ष आता उमेदवारांच्या कामाकडे, स्वच्छ प्रतिमेकडे आणि विकासाच्या दृष्टिकोनावर अधिक केंद्रित झाले आहे. सोशल मीडियावरील फंडा तात्पुरता प्रभावी ठरू शकतो. पण, मतदानाच्या वेळी मतदार विकास आणि पारदर्शकता यांसारख्या मूलभूत गोष्टीचा विचार करूनच आपला निर्णय घेतो.

कोणत्याही निर्बंधाशिवाय राजकीय पक्षांना जनतेशी मोबाइलमुळे त्वरित संपर्क साधण्यासाठी मदत होते. इस्टाग्राम, एक्स मीडियासारखे अनेक प्लॅटफार्म आहेत. अनेक उमेदवारांनी मतदारांचे व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केले.जनतेचा आशीर्वाद मिळविण्यासाठी इच्छुकांनी सोशल मीडियावर प्रचाराचे सत्र सुरू केले असले तरी मतदार या स्पर्धेत कोणाला कौल देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. निवडणुकीची रणधुमाळीत पाहायला मिळणार आहे.राजकीय जाणकारांच्या मते, सोशल मीडियावरील ही बॅनरबाजी लक्ष वेधणारी असली तरी प्रत्यक्ष मतदानावर तिचा फारसा परिणाम होईलच, असे नाही. सध्याचा मतदार अधिक सजग आणि जागरूक झाला आहे.

### बंडोबांना आता स्वीकृत नगरसेवकपदाचे चॉकलेट!

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील १० नगर नगरपालिकांमध्ये यावेळी चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी कार्यरत असली तरी स्थानिक पातळीवर मात्र, उमेदवारी वाटपातील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली आहे. पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने अनेक इच्छुकांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आता या सर्व बंडखोरांना थंड करून अधिकृत उमेदवारांचा मार्ग मोकळा करण्यासाठी त्या-त्या पक्षाच्या नेत्यांच्या गुप्त बैठका सुरू होऊन बंडोबांना आता स्वीकृत नगरसेवकपदाचे चॉकलेट देऊन थंडोबा करण्याची मोहीम सुरू झाली आहे. माघार घेण्यासाठी आता काही तास उरले आहेत.

जिल्ह्यात दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, अचलपूर, चांदूरबाजार, मोर्शी, वरूड, शेंदूरजनाघाट, चांदूर रेल्वे आणि धामणगाव रेल्वे या १० नगरपालिकांसाठी आणि धारणी व नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतींकरिता निवडणुका होत आहेत. १० ते १७नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची वेळ होती. या दरम्यान उमेदवार निश्चित करताना अनेक राजकीय घडामोडी झाल्या आणि काही ठिकाणी रात्रीतून उमेदवार बदलण्यात आले. १८ नोव्हेंबर रोजी अर्ज छाननी प्रक्रिया पूर्ण झाली. यात अनेकांचे अर्ज वेगवेगळ्या कारणांनी अवैध ठरलेत. २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ अर्ज मागे घेण्यासाठी आहे. त्यामुळे पुढील काही तास नेत्यांसाठी अत्यंत आव्हान देणारे आहेत. अपक्ष आणि बंडखोरांमुळे पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला पराभवाचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती नेत्यांना आहे. म्हणूनच या सर्वांना माघार घेण्यासाठी मनधरणी केली जाण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने सध्या सर्वच नगरपालिकांमध्ये वॉर्डनिहाय मतांची गोळाबेरीज करून विजयाची रणनीती आखली जात आहे.

# अपक्षांसाठी १९४ मुक्त चिन्हे

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात १० नगर परिषदा व २ नगर पंचायत निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जाला सुरुवात झालेली आहे. अर्जाची माघार झाल्यावर २६ नोव्हेंबरला निवडणूक चिन्हांचे वाटप उमेदवारांना होईल. यासाठी राष्ट्रीय पक्षांची ९, राज्यस्तर पक्षांची ५ व मान्यताप्राप्त पण अनोंदणीकृत पक्षांची ९ चिन्हे राखीव आहेत. याव्यतिरिक्त अपक्षांकरिता १९४ मुक्तचिन्ह आहेत. यामध्ये कुणाला स्कुटर तर कुणाला ट्रक, रोड रोलर सारखी चिन्हे मिळतील.

स्थानिक पातळीवर होणाऱ्या नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीत 'निवडणूक चिन्ह'देखील अनन्यसाधारण महत्त्वाचे ठरते. अनेक वेळा उमेदवाराचे भाऊगर्दीत नाव मतदारांना लक्षात राहत नाही, परंतु चिन्ह मात्र मतदारांच्या लक्षात राहते. अत्यंत कमीवेळेत या चिन्हाचा प्रचार उमेदवारांना करावा लागतो. म्हणूनच स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत लक्षवेधक चिन्ह मिळण्याकडे उमेदवारांचा कल राहतो. विशेषतः ग्रामीण भागात उमेदवारांची नावे वाचण्यापेक्षा मतदार त्यांचे चिन्ह लक्षात ठेवतात. त्यामुळे नियमित वापरातील चिन्ह मिळविण्याकडे उमेदवारांचा कल असतो. उमेदवारांना करावा लागतो.

नगरपरिषद निवडणुकीत अपक्षांसाठी १९४ चिन्हे राखीव आहे. यामध्ये विविध वर्गवारीतील चिन्हे आहेत. त्यांनी अर्ज भरताना तीन चिन्हाची मागणी केली आहे. याशिवाय याच चिन्हावर अन्य उमेदवारांनी दावा केल्यास प्रथम मागणी कोणाची व कोणाचा अर्ज प्रथम याचा विचार केल्या जाणार आहे.अर्ज भरताना उमेदवारांना तीन निवडणूक चिन्हांचा पसंतीक्रम द्यावा लागतो. यामध्ये समान चिन्हांची मागणी काही अपक्ष उमेदवारांद्वारे झाल्यास अशावेळी प्रथम अर्ज सादर करणाऱ्यांना प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार चिन्हांचे वाटप होते.अपक्षांना ट्रक, ट्रॅक्टर, नांगर, टीव्ही, रिमोट, इंजेक्शन, टेबल, स्टम्प, स्टूल, पाना, सोफा, पाटी, स्कूटर, कैची, शिलाई मशीन, सेफ्टीपीन, कूलर, रोलर, अंगठी, फ्रीज, चार्जर, पेट्रोलपंप चिन्हे मिळतील.७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षांची संख्या ४१६ आहे. या पक्षांच्या उमेदवारांना निवडणूक चिन्हात प्राधान्य मिळते. याशिवाय राष्ट्रीय पक्ष पाच, राज्यस्तरीय पक्ष पाच, इतर राज्यातील पक्ष नऊ आहेत.स्कीट, केक आईस्क्रीम, आले, हिरवी मिरची, सफरचंद, ढोबळी मिरची, फुलकोबी, द्राक्ष, अक्रोड, कलिंगड, घागर, खलबत्ता आदि चिन्हे आहेत.

# नगरपालिका, नगरपंचायत निवडणूक दोन दिवसात ३५ जणांची माघार

## आठ जणांनी नगराध्यक्षपदाचे तर २७सदस्यांनी मैदान सोडले

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील दहा व नगरपरिषदा आणि दोन नगरपंचायतीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणे त्यानंतर छाननीची प्रक्रिया आटोपल्यानंतर बुधवार, १९ नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये बुधवार आणि गुरुवार २० अशा दोन दिवसांत नगराध्यक्षपदाचे ८ तर सदस्यपदांकरिता २७ जणांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. गत दोन दिवसांत हा आकडा ३५ वर पोहोचला आहे.

जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, अचलपूर, चिखलदरा, चांदूर बाजार, मोर्शी, तरूड, शेंदुरजना घाट, चांदूर रेल्वे आणि धामणगाव रेल्वे अशा १० नगरपालिका व धारणी तसेच नांदगाव या दोन नगरपंचायतीकरिता येत्या २ डिसेंबर रोजी सार्वत्रिक निवडणूक होऊ घातली आहे. खंडेश्वर या निवडणुकीसाठी १० ते १७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीची मुदत होती. या मुदतीत दहा नगरपरिषद आणि दोन नगरपंचायतींमध्ये नगराध्यक्षपदाकरिता १०८ तर नगरसेवकपदासाठी १ हजार ५१६ जणांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. यानंतर १८ नोव्हेंबर रोजी दाखल अर्जाची छाननी आटोपल्यानंतर १९ नोव्हेंबरपासून अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेत गत दोन दिवसांत नगराध्यक्षपदासाठीचे ८ तर सदस्यपदाचे २७, अशा एकूण ३५ जणांनी नगरपरिषद निवडणुकीतून माघार घेतली आहे. शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने आता यापैकी किती जण माघार घेणार याचे चित्र शुक्रवारी सायंकाळपर्यंत स्पष्ट होणार आहे.

**या नगरपालिकेतील उमेदवारांची माघार**

अचलपूर नगरपालिकेत ८, चांदूर बाजार १, दर्यापूर २, नांदगाव खंडेश्वर २, धामणगाव रेल्वे २, वरूड २, अंजनगाव सुर्जी ५, मोर्शी ९, चिखलदरा ४

# अश्लीलतेविरुद्ध एल्गार

**सो**शल मीडियावर अश्लीलतेचा जो नंगा नाच सुरू आहे आणि जो दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. त्याविरुद्ध अनेकांनी चिंता व्यक्त केली आहे. मी सुद्धा दोनेक वर्षांआधी 'सोशल मिडियावरील पोर्न' नावाने एक लेख लिहून जनता आणि सरकारचे लक्ष ह्या विषयाकडे वळविण्याचा प्रयत्न केला होता. पण हे प्रयत्न फारच तोकडे आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली सोशल मीडियावर अश्लीलतेचा जो नंगा नाच सुरू आहे तो सरकारने त्याविरुद्ध कठोर कायदे केल्याशिवाय आणि समाजातील सज्जनशक्ती जागृत झाल्याशिवाय बंद होणार नाही. सोशल मीडियावर सुद्धा अनेकांनी ह्या अश्लीलतेविरुद्ध मत प्रदर्शित केले आहेत आणि करीत असतात. पण सोशल मीडिया कंपन्यांना फक्त व्यवसाय करायचा आहे आणि अश्लील कंटेंटमुळे त्यांच्या व्यवसायात तेजी येते म्हणून ह्या कंपन्यासुद्धा ह्या अश्लीलता पसरविणाऱ्या लोकांविरुद्ध किंवा अश्लील कंटेंटविरुद्ध कोणतेही कठोर पाऊल उचलत नाहीत. ह्या अश्लीलतेचा सामाजिक जीवनावर जो दुष्परिणाम होत आहे त्याची पर्वा ना ह्या कंपन्यांना आहे ना बहुसंख्य जनतेला आहे. सरकार सुद्धा ह्याकडे विशेष लक्ष देताना दिसत नाही. पण आता अश्लीलता इतक्या अधिक प्रमाणात पसरत चालली आहे की मुली अक्षरशः नुसत्या अंतर्वस्त्रसदृश कपडे घालून निव्वळ घरात आणि सोशल मीडियावरच नव्हे तर सार्वजनिक ठिकाणीही फिरायला लागल्या आहेत. घरात येणाऱ्या पाहुण्यांसमोर सुद्धा अगदी घोट्याच्या वर जाणारा बर्म्युडा (बर्म्युडा कसला, चड्डीच ती) घालून वावरतात. त्यांना ना आईवडिलांचा धाक राहिलेला आहे, ना थोरामोठ्यांचा, ना समाजाचा. ह्याचा परिणाम पुरुषांची कामवासना उद्दिपित होण्यात होऊन बलात्काराची प्रकरणे दिवसेंदिवस वाढतच चालली आहेत. नुकतेच मालेगावात एका नराधमाने एका तीन वर्षांच्या बालिकेवर बलात्कार करून तिची हत्या केल्याची घटना घडली. ह्याआधीही अशी अनेक प्रकरणे घडली आहेत. छोटे कपडे किंवा कमी कपडे घातल्याने स्त्रियांवर बलात्कार होत असतील तर लहान मुलींवर का बरे बलात्कार होतात असा एक तर्क कथित आधुनिकतावादी स्त्रिया करताना दिसतात. खरेतर हा तर्कच अश्लीलतेचा बचाव आणि प्रसार करणारा आहे. ज्या स्त्रिया छोटे कपडे किंवा कमी कपडे घालून आपले अंगप्रदर्शन करतात आणि समाजात अश्लीलता पसरवतात नेमके त्यांच्यावरच बलात्कार होतील असे नाही. पण त्यांच्यामुळे पुरुषांच्या कामवासना सातत्याने प्रदीप्त होत राहतात आणि मग एखाद्याची कामवासना जागृत होऊन त्याला संधी मिळताच त्याची बळी एखादी बालिका सुद्धा ठरू शकते. बलात्कार करणारे नराधम त्यांना विरोध होणार नाही किंवा कमीत कमी विरोध होईल अशाच कमजोर स्त्रियांवर किंवा बालिकांवर बलात्कार करतात. बलात्कार करणारे सगळेच पुरुष विकृत मनोवृत्तीचेच असतात किंवा असतील असे नाही. सातत्याने कामुक दृश्य बघितल्याने, घरात बाहेर सातत्याने स्त्रियांचे अंगप्रदर्शन बघितल्याने, अश्लील साहित्य, रिल्स आणि पॉर्न व्हिडिओज बघितल्याने चांगल्या पुरुषांच्याही कामभावना उद्दिपित होऊन त्यांच्या हातूनही नको ते कृत्य घडण्याची दाट शक्यता असते. त्यामुळेच स्त्रियांनी सुसंस्कृत, शालीन आणि सभ्य पेहराव करणे आणि वागणे अत्यावश्यक आहे. कारण त्यांच्या पेहराव आणि वर्तनाचे बळी लहान लहान बालिकाही ठरू शकतात ह्याचे भान त्यांनी ठेवलेच पाहिजे.



अश्लीलता पसरविणाऱ्या स्त्रियांचा आणखी एक कुतर्क असतो की आम्ही आम्हाला पाहिजे तसे,वाटेल तसे आणि पाहिजे तेवढेच कपडे घालू, पुरुषांनी आमच्यावर टीका करण्यापेक्षा आपली स्त्रियांकडे बघण्याची दृष्टी सुधारावी. हा तर्क इतका तकलादू आहे की जर पुरुषांनीही आम्ही सुद्धा आम्हाला पाहिजे तसे आणि पाहिजे तेवढेच कपडे घालू, आम्ही स्त्रियांपेक्षाही अधिक आधुनिक विचारसरणीचे आहोत त्यामुळे प्रसंगी नग्नही फिरू, स्त्रियांनीच पुरुषांकडे पाहण्याची आपली नजर सुधारावी असा अट्टाहास केला तर ! चालेल स्त्रियांना ? निसर्गानेच आम्हाला शीघ्रकामी होण्याचे वरदान दिले आहे तेव्हा आम्ही पाहिजे त्या आणि दिसेल त्या स्त्रीचा लैंगिक उपभोग घेऊ असा तर्क पुरुषांनी केला तर ! चालेल स्त्रियांना ? परंतु सुदैवाने अजूनपर्यंत तरी कोणत्याही पुरुषाने ना कधी असा तर्क केला, ना अशी काही मागणी केली, ना तसे कधी वागत. त्यांच्या ह्या कृतीमुळे आणि आपण असेच कपडे घालू अशा अट्टाहासामुळे, सोशल मीडियावरील नग्नतेचे स्त्रीस्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणून समर्थन करण्यामुळे मात्र समाजात अश्लीलता पसरून मालेगावच्या बालिकेवरील बलात्कारासारखी प्रकरणे घडतात. अशा घटना घडल्या की पुन्हा ह्याच स्त्रिया पुरुषांवरच तुटून पडतात. पुरुषच किती अत्याचारी असतात ह्याच्या रेकॉर्ड वाजवतात. पण पीडितेच्या घरीही पुरुष असतात आणि ते आपल्या घरच्या स्त्रियांची काळजी घेत असतात, त्यांना संरक्षण देत असतात हे मात्र पुरुषांवर तोंडसुख घेणाऱ्या ह्या स्त्रिया सोईस्करपणे विसरतात.

समाजात आणि सोशल मीडियावर सुरू असलेल्या ह्या अश्लीलतेविरुद्ध मात्र आता काही स्त्रियांनीच सोशल मीडियावर एल्गार पुकारलेला आहे. सोशल मीडियावर अश्लील रिल्स बनवून टाकणाऱ्या, गुप्त अवयवांवर टॅटू काढतानाचे व्हिडिओ काढून ते सोशल मीडियावर टाकणाऱ्या, अश्लील कमेंट्स करून पुरुषांच्या भावना चाळवणाऱ्या, संपूर्ण छाती उघडी ठेवून बाळांना स्तनपान करतानाचे व्हिडिओ टाकणाऱ्या, परपुरुषांकडून साडी नेसवून घेणाऱ्या स्त्रियांविरुद्ध फेसबुकसारख्या सोशल मीडियावर काही स्त्रियांनी कठोरपणे विरोध करण्यास सुरुवात केली आहे. त्या स्त्रियांमध्ये सविता परतूरकर,तृप्ती पाटील, प्रार्थना देशमुख ह्यांची नावे उल्लेखनीय आहेत. ह्या स्त्रियांनी अश्लीलतेविरुद्ध जो एल्गार पुकारलेला आहे त्याला मोठ्या संख्येने लोकांचा प्रतिसाद मिळत आहे. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट ही की बहुसंख्य पुरुषच ह्या स्त्रियांना पाठिंबा देत आहेत, त्यांचे समर्थन करीत आहेत. पुरुषांना एरवी आंबटशौकीन म्हणून जी उपमा दिली जाते त्याला ह्या पुरुषांनी सपशेल खोटे ठरविले आहे. ह्याचाच अर्थ असा की ह्या अश्लीलतेचा कहर त्यांच्या घरापर्यंत पोहोचला आहे आणि त्याची कटूफळे त्यांना एकतर भोगावी लागली आहेत किंवा भोगावी लागू शकतात ह्याची त्यांना जाणीव होऊ लागली आहे. ही जाणीव संपूर्ण समाजात तीव्रतेने पसरणे गरजेचे आहे. तरच आणि तेव्हाच समाजात पसरत चाललेली अश्लीलता आणि त्यातून घडणारे लैंगिक अत्याचार ह्यांना आळा बसू शकतो.

सविता परतूरकर ह्यांनी पार्श्वभागावर टॅटू काढून ते सोशल मीडियावर व्हायरल करणाऱ्या स्त्रियांना ढुंगणस्टार, टॅटूस्टार अशी उपमा देऊन त्यांच्यावर टीकेची झोड उठविली आहे. साडी नेसणाऱ्या आणि सौभाग्यचिन्हे अंगावर धारण करणाऱ्या स्त्रियांना गावठी म्हणून संबोधणाऱ्या तथाकथित मॉडर्न स्त्रियांना तृप्ती पाटील ह्यांनी चांगलेच फैलावर घेतले आहे. नवऱ्याला, सासू सासरे, दीर नणंद आदींना घालून पाडून बोलणाऱ्या आणि ह्या नातेवाईकांना दूर सारणाऱ्या स्त्रियांचा प्रार्थना देशमुख ह्यांनी आपल्या अनेक लेखांतून चांगलाच खरपूस समाचार घेतला आहे. स्त्रियांनी अंगप्रदर्शन करणारी वेशभूषा करून, अश्लील रिल्स बनवून समाजात अश्लीलता पसरवू नये अशी विचारसरणी ठेवणाऱ्या स्त्रिया गावठी आणि मनुवादी असतील तर असा गावठीपणा आणि मनुवाद स्त्रियांच्याच नव्हे तर संपूर्ण समाजाच्याच हिताचा आहे. त्यामुळे ह्या स्त्रियांना समाजातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळणे आवश्यक आहे.अशा स्त्रिया समाजातून मोठ्या प्रमाणात पुढे आल्या तर सोशल मीडिया आणि सार्वजनिक जीवनात अश्लीलतेचा जो नंगा नाच सुरू आहे तो बंद झाल्याशिवाय राहणार नाही आणि तो बंद झाला तर स्त्रियांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांनाही नक्कीच पायबंद बसल्याशिवाय राहणार नाही.

**अतुल सोमेश्वर कावळे**
हुडकेश्वर, नागपूर.
मो.क्र.९७३०५३५१९६

■ शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखय

अकोला
जिल्हा विशेष

# सातबारा कोरा न झाल्यास १ डिसेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी दिंडी

## शेतकरी राजा ग्रुपतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

***■ प्रतिनिधी | खेट्री ■***

***पातूर तालुक्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी आणि पिकांच्या मोठ्या नुकसानीमुळे आर्थिक संकटात सापडले असून, शासनाने त्वरित दिलासा द्यावा, या मागणीसाठी शेतकरी राजा ग्रुपतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. अध्यक्ष रवी सोनोने यांच्या नेतृत्वात १९ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांचा प्रतिनिधीमंडळ जिल्हाधिकारी कार्यालयात गेले.***



अतिवृष्टीमुळे कापूस, सोयाबीन, तूर, उडीद, मुंग यांसह अनेक पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात कर्जमाफी न झाल्याने आणि सातबारा कोरा न झाल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली, पण अस्मानी संकटामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. कर्जबाजारीपणा वाढत असून आर्थिक संकट तीव्र झाले आहे. या परिस्थितीत शासनाने मागण्या त्वरित मान्य न केल्यास १ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी दिंडी काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.

> 'निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचे कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अजूनही शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालेला नाही. आमच्या सर्व मागण्या तात्काळ मान्य करण्यात याव्यात; अन्यथा १ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी दिंडी काढण्यात येईल.'
>
> **रवी सोनोने,**
> अध्यक्ष, शेतकरी राजा ग्रुप,
> चान्नी पातूर

**शेतकऱ्यांच्या या आहेत प्रमुख मागण्या :** - शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा
- ओला दुष्काळ जाहीर करा
- हेक्टरी ५०,००० रुपये मदत द्यावी
- पूर्वीची पिक विमा पद्धत पुन्हा सुरु करा
- सोयाबीनला किमान ६,००० रुपये हमीभाव द्या
- नाफेड केंद्र त्वरित सुरु करा
- रोजगार हमीतील व्यक्तिक लाभांच्या योजना शेतकऱ्यांच्या खात्याशी जोडा

## आज रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात रामदेव भजन संध्या

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

स्थानिक गीता नगर परिसरात असलेल्या रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात रामदेव भजन संध्या व दिव्य ज्योत दर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने आज मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया, शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजन करण्यात आले आहे.

या संगीतमय भजन संध्येत भजन गायिका सौ. पुष्पा मंत्री, सौ. सोनल चितलांगे आणि सौ. दिपाली जाजू या रामदेवबाबांचे भक्तिगीत सादर करतील. या भजन उत्सवात भक्तांसाठी दिव्य ज्योत दर्शनाचीही सुव्यवस्था करण्यात आली असून भक्तांना दर्शन आणि पूजनाची संधी उपलब्ध करण्यात येणार आहे. महिला व पुरुष भक्तांनी या दिव्य संगीतमय भजन संध्येला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन रामदेवबाबा- श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुंबईतील 'संविधान सन्मान महासभेला' अकोट तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते जाणार

## वंचित बहुजन आघाडीच्या नियोजन बैठकीत निर्धार

**■ प्रतिनिधी | अकोट ■**

मंगळवारी २५ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे होत असलेल्या 'संविधान सन्मान महासभे'साठी वंचित बहुजन आघाडी अकोट तालुक्याच्या वतीने आयोजित नियोजन बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. अकोट तालुक्यातून शेकडो कार्यकर्ते मुंबईला उपस्थित राहणार असून, या भव्य सभेला विक्रमी उपस्थिती लवकरच दाखल होईल, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

२४ नोव्हेंबरच्या सायंकाळी सर्व कार्यकर्ते मुंबईकडे प्रस्थान करणार असून, वाहतूक व्यवस्था, निवासाची सोय, बॅनर-होर्डिंगची तयारी तसेच शिस्तबद्ध संचलनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक विभागातील जबाबदार



पदाधिकाऱ्यांना नियोजनाची जबाबदारी वाटप करण्यात आली.

या बैठकीला अकोला जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचिव रोशन फुंडकर, सुरेंद्र औईबे, निलेश झाडे, प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे, युवक महासचिव अमन गवई, गोपाल ढोरे, प्रमोद सोनोने, तुषार पाचकोर, देवानंद फुसे, हिरा सरकटे, अजित अहेमद, स्वप्निल दहीभात, सचिन सरकटे, रमेश सरकटे, युवराज मुरकुटे, दिनेश सरकटे, मुस्ताक पटेल, जावेद बागवान, शेख इबाल, निरंजन गावंडे, रजित सरकटे, संजय पुडकर, मनोहर गाढे, निखिल गावंडे, बुद्धभूषण गावंडे, विकी धांडे, राजपाल बडगे, प्रशांत मानकर, सुयोग आठवले, रामभाऊ भाष्कर, संजय खंडारे, संजय बुत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. अकोट तालुक्यातून होणारी मोठी उपस्थिती ही संविधान सन्मान महासभेची ताकद वाढवणारी ठरेल, असा एकमुखी विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.


## Public Notice

This is to inform the general public that the original property registry documents belonging to Mr. Mohammad Salik Mohammad Shaikh Mahboob have been lost/misplaced during shifting of residence.

The said documents pertain to the property situated at: Plot No. 18, Aman Khan Plots, Ramnagar (Behind LRT College), Village Umerkhed, Akola, Maharashtra.

Property details include : Sanctioned Layout No. 350 (Dated 27.03.1967), Survey No. 13, CTS No. 24/2, Sheet No. 66, Total Area: 5350 sq. ft. (50 ft. x 100 ft. plot with 30 ft. main road frontage).

The documents, originally registered in 1971, were preserved by the family but accidentally misplaced during shifting from the previous residence to House No. C6, Nirmaan Aasamant, Parge Nagar, Kondhwa, Pune – 411048. Despite extensive search efforts, the documents have not been found. The Police Report in that Regard has been Already Given to Concerned Police Station.

Anyone who finds these documents or has any information regarding them is requested to immediately contact the undersigned. If anyone uses or attempts to misuse these documents, they shall be held legally respons.

Please Take Note !
Date : 21/11/2025

Yours Sign -
**Sadarul Ula Mohammad**
Address : Ram Nagar, behind LRT College, Akola. 9665077771

## Change In Name

I Have Change
My Name From
**SYED ASIF SYED TAHIR**
--TO--
**SYED ASIF SYED TAHER**
My Residential Address is :- Plot No 13 Mehboob Nagar Khamgaon Buldhana 444303

## Change In Name

I Have Change
My Name From
**AZIMODDIN SAIFODDIN**
--TO-
**AZIMUDDIN SAIFUDDIN**
My Residential Address is :- Chand Khan Plot Near Rahil Store Washim Road Old City Akola MH 444002.


# विद्यार्थ्यांनी गिरवले बालहक्काचे धडे!

## पातूरच्या किड्स पॅरडाईजमध्ये कायदेविषयक कार्यशाळा

**■ प्रतिनिधी | पातूर ■**

बालकांना त्यांच्या हक्कांची तसेच कायद्याविषयीची माहिती मिळावी या उद्देशाने पातूर येथील किड्स पॅरडाईज पब्लिक स्कूल मध्ये कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि उच्च न्यायालय यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात राबविण्यात येणाऱ्या कायदेविषयक जनजागृती अभियानाचा हा एक भाग असून, पातुर तालुका विधी सेवा समितीमार्फत बालदिनाच्या निमित्ताने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून पातूर तालुका न्यायालयाचे न्यायाधीश प्रसाद ठाकरे आणि न्यायाधीश संदीप मोरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना बालहक्क, बालकांसाठी असलेली कायदेशीर तरतूद आणि त्यांच्या संरक्षणासंदर्भातील माहिती अत्यंत सोप्या व समजण्यासारख्या पद्धतीने दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे, युवा उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते विक्रांत उमरकर उपस्थित होते. यावेळी पातूर न्यायालयातील कर्मचारी सुनील इंगळे, वैभव इंगळे, पोलीस कर्मचारी कृष्ण भरती, शिपाई संदीप चव्हाण, अनंता गोटखडे, पंकज वालोकार, निलेश ढोणे आदींची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे व शुभांगी बोरकर यांनी केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षकवर्गातील नितु ढोणे, नरेंद्र बोरकर, रेशमा शेंडे, प्रियांका चव्हाण, इकरा आदिबा खान, प्रतीक्षा भारसाकळे, अविनाश पाटील, बजरंग भुजबटराव, नयना पटोले, साक्षी वानखडे, दिव्या गव्हाळे, स्वराली धनस्कार, पूजा खंडारे, रुपाली पोहरे, कल्पना वानेरे, शुभम पोहरे, मधुकर बोडदे आदींनी परिश्रम घेतले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये बालहक्काविषयी जागरूकता वाढून कायद्याबद्दल सकारात्मक समज निर्माण झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## लघु, मध्यम उद्योजकांसाठी सेंट्रल बँकेचा कर्ज महामेळावा; कर्ज मंजुरीपत्रांचे वितरण



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

जिल्ह्याची अग्रणी बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे लघु, मध्यम उद्योजकांसाठी कर्ज महामेळावा खासदार अनुप धोत्रे यांच्या उपस्थितीत आज झाला. छोट्या उद्योजकांना आर्थिक बळ मिळवून देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असा विश्वास खासदार श्री. धोत्रे यांनी यावेळी व्यक्त केला.

औद्योगिक वसाहतीतील अकोला इंडस्ट्रीयल असोसिएशनच्या सभागृहात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. खासदार श्री. धोत्रे यांनी उपस्थित राहून बँकेच्या उपक्रमांचे कौतुक केले. असोसिएशनचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, बँकेच्या सहायक महाव्यवस्थापक बिनिता राणी, विभागीय प्रमुख पंकज कुमार, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नयन सिन्हा व आरबीआयचे पीयुष अग्रवाल उपस्थित होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील उद्योग, उद्योजक व सूक्ष्म-मध्यम व्यवसायांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक पाठबळ दिले जाईल, असे पंकज कुमार यांनी यावेळी सांगितले.


## चौकशीची जाहिर नोटीस

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

नेमता तारिख :- १७.१२.२०२५

चौकशी क्रमांक :- १९/२०२५ कलम 50A(1) कलम 50A(I) नुसार जाहिर नोटिस

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम 50A(I) अन्वये

**अर्जदार :-** १) श्री. शंकरराव किसनराव खवले -अध्यक्ष रा. लाखोंडा बु. पो. म्हातोडी. ता. जि. अकोला.
२) रामेश्वर ज्ञानदेव सरतकार - सचिव रा. लाखोंडा बु. पो. म्हातोडी. ता. जि. अकोला.

सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यांत येते की, श्री. परमहंस परशराम महाराज संस्थान, लाखोंडा. ता. जि. अकोला, ओ- १६७४ या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्य रितीने चालावा या दृष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

**स्थावर मालमत्ता -:** मालमत्ता रू.१०,००,०००/-

२) हयाअर्थी या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजनेविषयी काही निवेदन / हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन/ हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देऊन मुंबई सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा, तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक २१ / ११ / २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

(शिक्का)

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १९७२/२०२५ — प्रोसेस नं.१८२०१/२०२५
चौ.ता. १५/१२/२०२५ — दिनांक : ०३/११/२०२५

**अर्जदार :** कांताबाई प्रदिप शर्मा रा. अंबिका नगर, नंदाने मंगल कार्यालयाच्या मागे, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. नितीन प्रदिप शर्मा रा. अंबिका नगर, नंदाने मंगल कार्यालयाच्या मागे, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. लेखन प्रदिप शर्मा रा. अंबिका नगर, नंदाने मंगल कार्यालयाच्या मागे, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. दिपा राहुल शर्मा रा. हरिहर पेठ, दसेरा नगर, राजेश मिश्रा यांच्या घराच्या बाजूला, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रदिप विश्वांबर शर्मा
**पत्ता :-** रा. अंबिका नगर, नंदाने मंगल कार्यालयाच्या मागे, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की, मयत प्रदिप विश्वांबर शर्मा यांचे दि. १०/०२/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/ ११ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# पारळा शाळेत निपुण माता–पालक मेळावा उत्साहात

### विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण प्रगतीचे शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून कौतुक

**■ प्रतिनिधी | अकोट ■**

जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, पारळा येथे निपुण माता–पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या मेळाव्याला अकोट पंचायत समितीच्या शिक्षण विस्तार अधिकारी साधनाताई वाघोडे प्रमुख उपस्थित होत्या.



मेळाव्यादरम्यान वाघोडे यांनी निपुण माता–पालकांशी संवाद साधत विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील प्रगती, अभ्यास नियोजन, येणाऱ्या अडचणी तसेच आयडिया व्हिडिओच्या उपयोगाबाबत मार्गदर्शन केले.

यानंतर विज्ञानवेध उपक्रमांतर्गत इस्त्रो वारीसाठी झालेल्या पूर्वचाचणीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अकोट पंचायत समिती अंतर्गत घेतलेल्या चाचणीत ३० विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यामध्ये पारळा शाळेचा विद्यार्थी संकेत चिकटे याने संपूर्ण तालुक्यात सर्वाधिक गुण मिळवत शाळेचा मान वाढविला. त्याचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

तसेच गजानन नागे व संघर्ष गवई या विद्यार्थ्यांचेही विशेष कौतुक करून आगामी जिल्हास्तरीय चाचणीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या यशामागील शाळेचे मुख्याध्यापक धीरज चवरे, शिक्षक अमर भागवत, प्रवीण डेरे, सुरेखा इंगोले व अर्चना ढवळे यांच्या परिश्रमांचे कौतुक करण्यात आले. वाघोडे यांनी वर्गांना भेट देऊन समाधान व्यक्त केले. मेळाव्याचे सूत्रसंचालन शिक्षिका अर्चना ढवळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रवीण डेरे यांनी केले.

# अकोट ग्रामीण पोलिसांनी सहा गौवंशांना दिले जीवनदान

### अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त : दोन आरोपी ताब्यात

**■ प्रतिनिधी | अकोट ■**

ऑपरेशन प्रहार अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी २० नोव्हेंबर रोजी मोठी कारवाई करत कत्तलीसाठी अवैधरित्या नेण्यात येत असलेल्या सहा गौवंशांची सुटका केली. या कारवाईत अंदाजे २ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



प्राप्त माहितीनुसार, अकोट ग्रामीण पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की दोन व्यक्ती पोपटखेड वरून मोहाळा रोड मार्गे गौवंशांना कत्तलीसाठी घेऊन जात आहेत. त्यानुसार पोलीस पथकाने पंचांसह घटनास्थळी छापा टाकला.

घटनास्थळी गोवंशांना हाकलत नेणारे शेख ईस्माईल शेख मुक्तार (वय २०) आणि केज खान अफजल खान (वय १९) दोन्ही रा. मोहाळा, ता. अकोट यांची चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच जनावरांच्या मालकी हक्काची कोणतीही कागदपत्रे त्यांनी सादर केली नाहीत.यामुळे पंचासमक्ष सहा गौवंशांसह एकूण २ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन्ही व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास अकोट ग्रामीण पोलिसांकडून सुरू आहे.

# श्री संत तुकाराम महाराज महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक कार्यशाळा



**■ प्रतिनिधी | अकोट ■**

श्री संत तुकाराम महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, किनखेड (पूर्णा) येथे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या विषयावर प्रबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य देवानंद गावंडे होते. कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. संतोष वाघ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून एमकेसीएल तंत्रज्ञ सौ. प्रियंका पांडे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या प्रबोधनात्मक व्याख्यानात, कृत्रिम बुद्धिमत्ता ही काळाची गरज असून भविष्यात शिक्षणासह विविध क्षेत्रांमध्ये नवनवीन संधी उपलब्ध करून देणारे हे प्रभावी तंत्रज्ञान असल्याचे प्रतिपादन केले. तसेच "ह तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना नव्या युगातील तांत्रिक क्रांतीत मार्गक्रमण करण्यास मोठी मदत होईल, असेही त्यांनी सांगितले. डी-लाईट कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, चोहोट्टा (बाजार) चे संचालक दिवाकर गावंडे हे सुद्धा विशेष उपस्थितीमध्ये होते. कार्यक्रमास प्रा. संध्या खोले, प्रा. राधिका इंगोले, प्रा. सचिन देवर, प्रा. सचिन बाळापुरे, प्रा. गजानन तराळे यांसह इतर मान्यवरांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. संघपाल खंडेराव यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. मोहन देऊळकार यांनी केले.

# नगरपरिषद निवडणूक २०२५ : अर्ज माघारीनंतर निवडणूक चित्र स्पष्ट

## नगराध्यक्ष पदाकरिता १० तर सदस्य पदाकरिता १६८ उमेदवार रिंगणात

***■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■***

***मुर्तिजापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दाखल झालेल्या नामनिर्देशन अर्जांच्या तपासणीनंतर व अर्ज माघारीच्या प्रक्रियेनंतर अंतिम निवडणूक चित्र स्पष्ट झाले आहे. १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालावधीत नगराध्यक्ष पदासाठी १२ तर १२ प्रभागातून सदस्यपदासाठी १८९ उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते.***



त्यानंतर १९ ते २१ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या अर्ज माघारीत नगराध्यक्ष पदासाठी २ जणांनी तसेच सदस्यपदासाठी १२ प्रभागांमधून २१ उमेदवारांनी वैधरित्या माघार घेतली. त्यामुळे आता नगराध्यक्ष पदाकरिता १० आणि सदस्यपदाकरिता १६८ उमेदवार अंतिम रिंगणात उरले आहेत.

अर्ज माघारीनंतर अनेक प्रभागांतील स्पर्धा अधिक काट्यासारखी झाली असून काही ठिकाणी सरळ लढतीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवडणूक कार्यालयाने वैध उमेदवारांची अनुक्रमांकानुसार यादी जाहीर केली असून माघार घेतलेल्या उमेदवारांची माहिती देखील प्रसिद्ध केली आहे.

या प्रक्रियेनंतर उर्वरित उमेदवारांना अधिकृत निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष प्रचाराची रणधुमाळी सुरू होणार आहे. पुढील काही दिवसांत नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदासाठी अंतिम थेट लढती कोणत्या उमेदवारांमध्ये रंगणार हे चित्र स्पष्ट होईल.

मुर्तिजापूरमधील ही निवडणूक स्थानिक राजकारणात मोठे बदल घडवू शकते, त्यामुळे सर्वांचे लक्ष या पुढील घडामोडींवर आहे.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३५१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### थंडीने घेतला वृद्धाचा बळी

**खरांगणा (मो.ङ)-** थंडीत भोवळ येऊन पडल्याने वृद्धाचा मृत्यू झाला. ही घटना आंजी शिवारात घडली. विठोबा महाकाळकर (वय ७०) रा. आंजी मोठी, असे मृताचे नाव आहे. विठोबा महाकाळकर हे प्रभाकर गोल्लर यांच्याकडे सालगडी म्हणून कामाला होते. त्यांच्याच गोठ्यात ते राहत होते. दरम्यान, थंडीत भोवळ येऊन पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. खरांगणा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

### २१ गोवंशांची सुटका, २१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट-**कत्तलखान्याकडे जाणार्याल २१ गोवशांची पोलिसांनी सुटका करून वाहनासह २१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई कलोडे चौकात करण्यात आली. गोवंशांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी कलोडे चौकात सापळा रचला. बी. आर. ०६ जी. जी. ९७९२ क्रमांकाचा ट्रक अडवून पाहणी केली असता त्यात २१ जनावरे आढळून आली. यावेळी पोलिसांनी २१ लहान मोठी गुरे, ट्रक, असा २१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. शिवाय संजय सहनी (वय ३३), दयाशंकर राय (वय ३२) दोन्ही रा. महुआ, दीपक राय (वय २८), बालवीर राय (वय २०) दोन्ही रा. दरबा बिहार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### सव्वातीन लाखांचा ऐवज पळविला

वर्धा - कुटुंबीय बाहेरगावी गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घरातून तब्बल सव्वातीन लाखांचा ऐवज लंपास केला. ही घटना सिंदी मेघे भागातील चंद्रशेखर ले-आउट येथे घडली. डॉ. रुपाली शिंदे (वय ३६) या कुटुंबीयासह बाहेरगावी गेल्या होत्या. दरम्यान, अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश मिळविला. कपाटातील सोन्याचा राणी हार, सोन्याचे बिस्किट, चांदीच्या मूर्ती, रोख असा ३ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज आणि एम. एच. ३२ ए. टी. ५०३९ या क्रमांकाची दुचाकी चोरून नेली. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### प्रवासी महिलेला चोरट्याने केले लक्ष

**वर्धा-** नागपूर ते वर्धा बस प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या पर्समधून २१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. लता धोंगडे (वय ५०) रा. आलोडी या नागपूर येथून वर्धेला बसने आल्या होत्या. घरी पोहोचताच त्यांना बॅगची चेन अर्धवट उघडलेली दिसली. त्यांनी पाहणी केली असता अज्ञात चोरट्यांनी २१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे उघडकीस आले.

### १.७३ लाखांचा ऐवज लंपास

**देवळी-**बसमध्ये चढताना अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या पर्समधून तब्बल १ लाख ७३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना येथील बसस्थानकात घडली. प्रतिभा बाळापुरे (वय ५७) रा. बोरगाव मेघे या गौळ येथे लोटांगण महाराज यांच्या यात्रेकरिता गेल्या होत्या. वर्धा येथे जाण्याकरिता देवळी बसस्थानकावरुन बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पर्समधून १ लाख ७३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. तक्रारीवरून देवळी पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### घर खरेदीच्या नावावर साडेसात लाखांनी गंडा

**वर्धा -** घर आणि खाली जागेचे बनावट कागदपत्रे तयार करून दाम्पत्याने तब्बल साडेसात लाखांनी फसवणूक केली. ही घटना वृंदावन नगर येथे उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली आहे.गोपाल बारी (वय ३५) रा. पिंपळगाव, जि. यवतमाळ यांनी वृंदावन नगर येथील प्रशांत हाडके (वय ४६) आणि कविता हाडके (वय ४०) यांच्यासोबत घर आणि खाली जागा खरेदी करण्याचा १५ लाख ७० हजार रुपयांत सौदा ठरला होता. करारनामा करून हाडके दाम्पत्याला साडेसात लाख रूपये दिले. परंतु, यानंतर ते घराची विक्री करून देण्यास टाळाटाळ करीत होते. या दोघांनी प्लॉट क्रमांक ४१ ची आराजी १८२९.२० चौ. फूट दाखवून व बनावट कागदपत्रे तयार करून ७ लाख ५० हजार रुपयांनी फसवणूक केली.

### कवडू उमाटे यांचे निधन

**समुद्रपूर-**धोंडगाव येथील प्रगतशील शेतकरी व शेतकरी संघटनेचे




कट्टर समर्थक कवडू दमडूजी उमाटे वय ७५ यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते समुद्रपूर पंचायत समितीचे माजी सदस्य होते. तसेच ते शेतकरी संघटनेच्या आंदोलनात त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. ते शेतकऱ्यांचे पंचप्राण स्व.शरद जोशी यांचे निकटचे होते.त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी व आप्त परिवार आहे. त्यांच्यावर धोंडगांव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## आकाश कोहळे यांच्या अचानक निधनाने देलवाडी शोकमग्न

**आष्टी(शहीद)/जनमाध्यम**

देलवाडी गावातील आणि आष्टी तालुक्यातील कार्यक्षम, मनमिळाऊ आणि समाजसेवेत रुजू असलेल्या आकाश रावसाहेब कोहळे (वय ३२) यांच्या अकाली निधनाने गावावर शोककळा पसरली.



आकाश हे आर्वी येथील सहयोग मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. शिक्षणाने अभियंता असलेल्या आकाशने मोठ्या शहरात संधी असूनही गावाशी नाळ जपली आणि बँकिंग क्षेत्रात कारकिर्द करत समाजातील उपेक्षितांना मदत करत राहिले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे अचानक निधन झाले. या बातमीने केवळ देलवाडीच नव्हे तर अंबिकापुर व आसपासच्या गावांतही हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, तीन विवाहित बहिणी आणि मोठा आप्त परिवार आहे.अंत्यसंस्कारा वेळी वर्धा लोकसभेचे खासदार अमर काळे उपस्थित राहिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शोकसभेत विविध मान्यवरांनी श्रद्धांजली व्यक्त केली. आमदार दादाराव केचे आणि काँग्रेस नेते अनंतराव मोहोड यांनीही दुःख व्यक्त करत परिवाराला धीर दिला.आकाशच्या जाण्याने मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि गरजू वर्गावर मोठे दुःख ओढवले असून अजून खूप काही करायचे होते अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## गांजा विक्री करणाऱ्या आरोपीवर गुन्हे शाखेची कारवाई

**वर्धा/जनमाध्यम**



वर्धा जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या विक्रीवर कडक कारवाई सुरु असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धडक मोहिम राबवली आहे. पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या आदेशानुसार दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी पोलीस स्टेशन वडणेर हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहितीच्या आधारे साकिर फिरोज अन्सारी (मौजा सोनेगाव, तह. हिंगणघाट) या आरोपीवर कारवाई करण्यात आली. माहितीवरून आरोपीच्या टायर पंचर दुरुस्ती दुकानावर एन.डी.पी.एस. कायद्यान्वये छापा टाकण्यात आला. झडती दरम्यान आरोपीजवळून ५६६ ग्रॅम गांजा, एक पल्सर २२० मोटारसायकल (MH-४९/BP-२१८७), ७,८५० रुपये नगदी तसेच एक मोबाईल जप्त करण्यात आले. याशिवाय जुना मुद्देमाल १,७९,१७० रुपये मूल्याचा असल्याचे देखील हस्तगत करण्यात आले.सदर आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन वडणेर येथे एन.डी.पी.एस. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा वर्धा पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पो.उपनि. विजयसिंग गोमलाडु, पो.अं. अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित आणि अभिषेक नाईक यांच्या पथकाने केली. स्थानिक पोलिसांनी सांगितले की, अशा मोहिमांमुळे वर्धा जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या विक्रीवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही मोठी पावले आहेत.

या कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण झाली असून, पोलिसांनी असे अधिक मोहिमांचे आश्वासन दिले आहे.

## वाघाचा बैलावर हल्ला

### शेतकऱ्यांचे १५ हजारांचे नुकसान

**समुद्रपूर/जनमाध्यम**

समुद्रपूर तालुक्यातील वायगाव (गोंड) मार्गावरील राळेगाव (कोठारी) परिसरात वाघाचा दहशत पुन्हा वाढली असून गुरुवारी (१९ नोव्हेंबर) सायंकाळी वाघाच्या हल्ल्यात गोरा ठार झाल्याची घटना घडली. या हल्ल्यात शेतकरी राहुल रामभाऊ सराटे यांचे अंदाजे १५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सराटे यांनी आपल्या पडीत शेतात गाय व गोरा चरण्यासाठी बांधले होते. सायंकाळी सुमारास ग्रामीण मजूर कापूस गोळा करत असताना अचानक गाय दोरी तोडून पळत शेतकऱ्यांकडे आली.संशय येताच शेतकऱ्यांनी शेतात पाहणी केली असता शेजारीच वाघाने गोऱ्याला ठार केलेले दिसून आले.

ही घटना पाहून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश गांवडे यांच्या मार्गदर्शनाखाली वनकर्मी घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करण्यात आला. शेतकऱ्यांचे अंदाजे १५ हजार रुपयांचे आर्थिक नुकसान असल्याचे निष्पन्न झाले.

## आंजीत ग्रामीण रुग्णालयासाठी पालकमंत्र्यांची पाहणी

**वर्धा/जनमाध्यम**



आंजी (मोठी) व परिसरातील नागरिकांसाठी आंजी येथे नव्याने मंजूर ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय लवकरच सुरू होणार असून पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी रुग्णालयासाठी निवडलेली जागा पाहून बांधकामासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतिष अंभोरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष सुनिल गफाट आणि अनेक पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.आंजी व आसपासच्या ५०-६० गावांचे नागरिक दुर्गम भागात असल्याने त्यांना आरोग्य सुविधा मिळवणे आव्हानात्मक ठरत होते. शेतात काम करताना सर्पदंश किंवा अन्य आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना जवळच्या वर्धा रुग्णालयात नेणे कठीण होत होते.भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष सुनिल गफाट यांनी सातत्याने शासन दरबारी आंजीत रुग्णालयाची मागणी केली. पालकमंत्री डॉ. भोयर व भाजपाचे आ. राजेश बकाणे यांनी याबाबत पाठपुरावा केल्याने सार्वजनिक आरोग्य विभागाने २४ सप्टेंबर २०२५ रोजी मंजुरी दिली. रुग्णालयासाठी अंदाजे २६ कोटी रुपये खर्च होणार असून, लवकरच आंजी व परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होईल.

## मतदारांनी केलेला सन्मान माझ्यासाठी सर्वात मोठी जबाबदारी : गिरीश अग्निहोत्री

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा नगर परिषदेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १४ मधून भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार गिरीश अग्निहोत्री यांना प्रभागातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पक्षाचे अधिकृत चिन्ह कमळ घेऊन त्यांनी प्रभागात प्रचाराचा शुभारंभ केला.

यावेळी मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तर मोठा सन्मान केला असल्याने हा सन्मान माझ्यासाठी मोठी जबाबदारी असल्याचे प्रतिपादन गिरीश अग्निहोत्री यांनी व्यक्त केला. प्रचाराच्या शुभारंभावेळी प्रभागातील विविध मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी गिरीश अग्निहोत्री यांच्या सोबत असल्याची ग्वाही देत त्यांना मजबूत पाठींबा जाहीर केला. गिरीश अग्निहोत्री हे प्रभागातील परिचित सामाजिक कार्यकर्ते असून लोकांच्या



दुःख-सुखात नेहमी पुढाकार घेणारे म्हणून त्याची ओळख आहे. प्रभागात त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून जनतेचा विश्वास संपादन केला आहे. सध्या निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर प्रभाग १४ मध्ये गिरीश अग्निहोत्री यांच्याबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून नागरिकांचा वाढता पाठिंबा पाहता आगामी निवडणुकीत त्यांना भक्कम साथ मिळेल, असे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

## कोपरा ग्रामपंचायतीत समृद्ध पंचायत राजअंतर्गत दिव्यांगांना ५% निधी वाटप

**सेलू/जनमाध्यम**



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत कोपरा ग्रामपंचायतीत विकासकामांची रेलचेल दिसली. आयोजित कार्यक्रमात दिव्यांग लाभार्थ्यांना ५% निधीचे वाटप, वृक्षारोपण, आयुष्मान भारत कार्ड वितरण आणि वनराई बंधाऱ्याच्या बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामपंचायतीत विकासाचे नवे पर्व सुरू झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाला गटविकास अधिकारी देवानंद पानबुडे, पोलीस निरीक्षक दहेगाव, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक खोब्रागडे, उमेद व्यवस्थापक भोयर, विस्तार अधिकारी बर्डीया, ग्रामसेवक संघटना अध्यक्ष संतोष शिंदे, सचिव किरण वरघणे यांच्यासह सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, जयपूर व टाकली येथील सरपंच, उमेद पदाधिकारी, आशा व अंगणवाडी सेविका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना निधी वितरण करण्यात आले. आयुष्मान भारत योजनेतून पात्रांना कार्ड देण्यात आले असून उर्वरित लाभार्थ्यांसाठी आज विशेष कॅम्प घेण्यात आला. 'एक पेड़ माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.घरकुल योजनांतर्गत लाभार्थ्यांना सोलर प्रणालीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उमेद अभियानांतर्गत महिलांना कर्जसुविधा उपलब्ध करून देण्याचे मान्य करण्यात आले. विशेष म्हणजे, ग्रामपंचायतीचे घरकर व पाणीपट्टीची वसुली १० महिला बचत गटांनी करून दाखवली.दरम्यान, ग्रामसेवक संघटना शाखा सेलू आणि ग्रामस्थांच्या सहभागातून वनराई बंधारा उभारण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत असून ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी पार पडला.

## वर्ध्यात उद्या बौद्धधम्मीय वर-वधू परिचय मेळावा

**वर्धा/जनमाध्यम**

बौद्ध मनोमिलन परिणय ग्रुप, नागपूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने २३ नोव्हेंबर रोजी निःशुल्क वर-वधू परिचय व पालक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा सकाळी १० वाजता सावंगी रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयात होणार आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन आंबेडकरी विचारवंत डॉ. रविदत्त कांबळे यांच्या हस्ते होणार असून डॉ. चेतना दिनेश सवाई, सचिव सुभेदार रामजी आंबेडकर एज्युकेशनल सोसायटी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ. मिलिंद सवाई (प्राचार्य आंबेडकर कॉलेज) आणि डॉ. आंदप्रकाश भेले यांच्या उपस्थितीत मेळावा पार पडणार आहे.उपवर-वधूंची नोंदणी कार्यक्रमाच्या दिवशी सकाळी १० ते ११ या वेळेतच करण्यात येणार आहे. सहभागी युवक-युवतींनी एक पासपोर्ट आकाराचा फोटो सोबत आणावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या मेळाव्यात विवाहासाठी इच्छुक युवक-युवतींचा परिचय सादर होणार असून घटस्फोटित, विधवा व विधुरांनीही सहभागी व्हावे, असे आयोजक विवेक मेश्राम, पंढरीनाथ आडे आणि निशा राऊत यांनी सांगितले.या उपक्रमामुळे वर्धा आणि परिसरातील अनेक कुटुंबांना विवाहाच्या दृष्टीने एक सकारात्मक व्यासपीठ मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

## नांदोरा (डफरे) येथे शेतकऱ्यांसाठी सघन कपाशी लागवडीवर प्रक्षेत्र कार्यक्रम

**वर्धा/जनमाध्यम**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला सलग्नीत वर्धा जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा द्वारे कपाशी पिकावरील विशेष कापूस प्रकल्प राबविण्यात येत आहे. याच अंतर्गत सघन लागवड प्रणालीची ओळख करून देण्यासाठी २०२५-२६ ह्या हंगामात तालुका देवळी येथील नांदोरा (डफरे) गावातील प्रगतीशील शेतकरी निखील डफरे यांच्या शेतावर प्रक्षेत्र दिन आणि प्रत्यक्ष भेट कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे नेतृत्व वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कृषिविद्या विषयतज्ज्ञ डॉ. रुपेश झाडोदे यांनी शेतकऱ्यांना कोरडवाहू कपाशीमध्ये झाडांची संख्या वाढवून उत्पादन अधिक मिळविण्याचे तंत्र स्पष्ट केले. तसेच हिरवळीचे खत व सेंद्रिय खतांचा योग्य वापर करण्यावर भर दिला. कृषि अभियांत्रिकी



विषयतज्ज्ञ डॉ. सविता पवार यांनी शेतकऱ्यांना यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून शेतीतील खर्च कमी करण्याचे मार्गदर्शन केले. संशोधन अधिकारी डॉ. समीर वडयाळकर (अंकुर सीड्स) यांनी सांगितले की पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत सघन कपाशी लागवड केल्यास झाडांची संख्या तीनपट वाढते आणि उत्पादन १०-२०% पर्यंत वाढते. तसेच सघन व अतिघन प्रणालीतील फरक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजावून सांगितला.या प्रसंगी शास्त्रज्ञ आणि शेतकऱ्यांनी निखील डफरे यांच्या शेतातील कपाशी पिकाचे निरीक्षण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विस्तार शिक्षण विषयतज्ज्ञ डॉ. अंकिता अंगाईतकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी किशोर उगलमूगले, गणेश वायरे, ऋतुजा कोरडे व वासिम खान यांनी सहकार्य केले.हा प्रक्षेत्र दिन शेतकऱ्यांसाठी सघन कपाशी लागवड आणि उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शक ठरला असून स्थानिक शेतकरी वर्गास भविष्यातील पिक व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरेल, अशी माहिती आयोजकांनी दिली.

## वारकरी सेवक यशवंत गडवार यांचा आळंदी येथे सत्कार

**हिंगणघाट/जनमाध्यम**



स्थानिक राष्ट्रसंत तुकडोजी वार्डातील रहिवासी आणि पंढरपूर आषाढी वारीसह वारकऱ्यांच्या सेवेत सक्रिय असलेल्या यशवंत वामनराव गडवार यांचा देवाची आळंदी (ता. खेड, जि. पुणे) येथे सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यांच्या वारकरी संप्रदायातील योगदानाची दखल घेत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने हा सत्कार सोहळा पार पडला.

सोहळ्याचे अध्यक्षस्थानी ह.भ.प. गुरुवर्य पुंडलीक महाराज बोळवटकर, संस्थापक अध्यक्ष – ज्ञानराज माऊली कृपाप्रसादिक संस्था, पंढरपूर उपस्थित होते.

कार्यक्रमात रुपदेव महाराज धोटे, अविनाश महाराज भोयर, दिलीप महाराज राऊत, चंद्रकांत महाराज डहाके, नरहरी महाराज बोळवटकर, पांडूरंग महाराज जगधरे, महेश महाराज चौधरी, उमेश महाराज कोल्हे, सोमेश्वर महाराज गौळकर, अजय महाराज डेहणे आदी मान्यवर उपस्थित होते. भागवताचार्य व रामायणाचार्य ह.भ.प. प्रकाश महाराज चंदनखेडे यांच्या हस्ते यशवंत गडवार (सेवानिवृत्त मुख्याध्यापक) यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरवपर सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यास वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर आणि संभाजीनगर येथील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणपत ढगे, दत्ताजी पहाडे, दिवाकर कोल्हे, विनोद कुबडे, ज्ञानेश्वर वैरागडे, डॉ. गारघाटे, पांडूरंग डेहणे, शोभा जिकार, प्रमोदिनी पहाडे, उत्तम बिजावर, साहेब काटकरताई यांच्यासह अनेक स्थानिक उपस्थित होते. उपस्थितांचे आभार रुपदेव महाराज धोटे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता गोपालकाला व महाप्रसादाने करण्यात आली.

### गळफास घेत मुलाची आत्महत्या

**आर्वी-**राहत्या घरी मुलाने गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना संजयनगर येथे उघडकीस आली. जय मडामे (वय १९) रा. संजयनगर, असे मृताचे नाव आहे. कारण कळू शकले नाही. आर्वी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३५३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# कृषिमंत्री भरणे यांच्या दौऱ्यात काँग्रेस कार्यकर्ते नजरकैद

## -माजी मंत्री यशोमती ठाकूर यांचा संताप

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आज शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सकाळी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी नजरकैदेत ठेवल्याने काँग्रेसच्या नेत्या माजी राज्यमंत्री यशोमती ठाकूर चांगल्याच संतापल्या. त्यांनी पोलिसांसमोरच राग व्यक्त केला आणि या कार्यकर्त्यांना आपल्या वाहनात बसवले. या घटनाक्रमाचा व्हीडिओ समाज माध्यमांवर प्रसारीत झाला आहे. शिराळा येथे शुक्रवारी कृषी मेळावा आणि उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे हे येणार असल्याने शहरात पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला होता. त्यातच काँग्रेसचे कार्यकर्ते आंदोलन करण्याची शक्यता असल्याने काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी सकाळ पासून नजरकैदेत ठेवले. याची माहिती कळताच यशोमती ठाकूर या घटनास्थळी पोहचल्या आणि त्यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर रोष व्यक्त केला. एकीकडे शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला असताना पोलीस काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर दडपशाहीचा वापर करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगला वायरल होत आहे.



## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.आर.डी.सिंधनाळे २३ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - २५२९/२०२५
श्रीमती गीता अधिक चार विरुध्द निरंक
पुढील तारीख २२.१२.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1) **Smt. Gita Vinayakrao Thakare,** Age 72 yrs., Occu.- Household, R/o. Galli No.2, Near Gajanan Temple, Shyam Nagar, Amravati
2) **Varsha Ajay Mohod** Age 54 yrs., Occu.- Household, R/o. Galli No.2, Near Gajanan Temple, Shyam Nagar, Amravati
3) **Suchita Sumant Charpe** Age 48 yrs., Occu.- Household, R/o. 43, Bypass Road, Sanjivani Colony, Rukhmini Nagar, Amravati
4) **Savita Vinayakrao Thakare,** Age 50 yrs., Occu.- Household, R/o. Galli No.2, Near Gajanan Temple, Shyam Nagar, Amravati
5) **Rajendra Vinayakrao Thakare,** Age 55 yrs., Occu.- Private Service, R/o. Galli No.2, Near Gajanan Temple, Shyam Nagar, Amravati

-- विरुध्द -

गैरअर्जदार : - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत विनायकराव हनुमंतराव ठाकरे हे दि.२४/०१/२००५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार गिता अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती गिता अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १९.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशान्वये, **सहायक अधीक्षक,** दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
## वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा

आर.एम.जे.सी.क्र.२४५/२०२५ — ने.ता.०६.१२.२०२५

**अर्जदार :** १. आशा नामदेव पाचखंडे
२. विशाल नामदेव पाचखंडे
रा.शिवणी रसुलापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. सारिका बंडु तांबेकर, रा.घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. शारदा प्रविण चपके, रा.नांदगांव पेठ, जि.अमरावती
५. पद्मा संतोष घुबडे, रा.मारखंडा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
६. वैष्णवी महेश रेवासकर
रा.कामरगांव, ता.कारंजा, जि.वाशिम

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **नामदेव काशिनाथ पाचखंडे** कायमस्वरुपी रहिवाशी नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती येथील होते. मयत नामदेव काशिनाथ पाचखंडे यांचा दिनांक २५.०४.२०२५ रोजी मृत्यू झाला. मयत नामदेव काशिनाथ पाचखंडे यांचे अर्जदार हे पत्नी व मुले/मुली आहेत. मयत नामदेव काशिनाथ पाचखंडे यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहे. त्यांना अर्जदारा व्यतिरिक्त कोणीही वारस नाही यांचे कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ०६.१२.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५.११.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय ,क.स्तर नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **कुंदन दिपक विंचुरकर**, रा.राजापेठ, अमरावती यांच्याकडून खालील वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याचा सौदा केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन -**

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावतीचे हद्दीतील मौजे-आकोली, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.२७, मधील २३ एकर ३५ गुंठे जमिनीतील असिस्टंट डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांचे आदेश क.३८४, दि.१३.०२.१९८४ नुसार लेआऊट मंजूर व वि.एस.डी.ओ.साहेब अमरावती यांनी त्यांचे फाईलावरील रे.के.नं.एन.ए.पी-३४/आकोली-४३/१९८३-८४, नि.ता. २७.११.१९८४ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या साहू नगर मधील प्लॉट नं.१५८ (एकशे अठ्ठावन) याची साईज ५० .. ६० फुट याचे एकूण क्षेत्रफळ ३००० चौ.फुट (२७८.८१ चौ.मी.) असून यापैकी उत्तर-दक्षिण वाटणीचा पश्चिमेकडील भाग ज्याचे एकुण क्षेत्रफळ१५०० चौ.फुट असून याची चतुःसिमा-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | याच प्लॉटचा उर्वरित भाग |
| पश्चिमेस | - | प्लॉट नं.१५९ |
| उत्तरेस | - | सर्विस लाईन |
| दक्षिणेस | - | लेआऊटमधील रोड |

या जाहीर सुचनेद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, सदरच्या मिळकतीवर कोणाचाही कोणताही प्रकारचा हक्क, अधिकार, ताबा, गहाण, बोणा, जप्ती, लिज पेंडस, कोर्ट प्रकरण किंवा इतर कुठलाही अधिकार असल्यास लेखी पुराव्यासह ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कळवावे. तसे न केल्यास आमचे पक्षकार कराराप्रमाणे खरेदीखत करुन घेण्यास मोकळे राहतील व पुढे कोणतीही उजर चालणार नाही.

**तारीख - ०७.११.२०२५**

**(ॲड.हरीश बी.तापडीया)**
**देवरणकर नगर, बडनेरा रोड, अमरावती**
**मो.क्र.९८९०१४७९४४**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ७५
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर सूचना

सर्वत्र आम जनतेस सूचित करण्यात येते की, मी सुरज पंडितराव वानखडे, रा.आशिष कॉलनी, विष्णु नगर, साईनगर, अमरावती जाहीर सुचनेव्दारे सूचित करतो की, माझी खरेदीखत दस्त क्र.२४९/१९९६ चे मुळ दस्त १५/११/२०२५ रोजी मी यवतमाळ येथे खाजगी कामानिमित्त राजापेठ, अमरावती येथून जात असतांना राजापेठ अमरावती बस स्थानक येथे हरविलेले आहे. मी माझ्या कागदपत्रांचा बराच शोध घेतला परंतु ते सापडले नाही, तसेच याचा कोणीही गैरवापर करु नये म्हणून मी पोलीस स्टेशन राजापेठ येथे लेखी तक्रार दिली असून आम जनतेस माहिती करिता आज रोजी जाहीर सुचनेव्दारे कळवित आहे.

तसेच उपरोक्त वर्णनातील मुळ खरेदीखत कोणालाही सापडल्यास खालील नमुद पत्यावर कृपया आणून दयावे.

**दिनांक २१.११.२०२५**
**अमरावती**

**सुरज पंडितराव वानखडे**
**रा.आशिष कॉलनी, विष्णु नगर, साईनगर, अमरावती**
**मो.क्र.८६००८३८५९२**

## जाहीर नोटीस

प्रो.नं. /२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१५/११/२०२५

**वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.४५४/२०२५ — ने.ता.१६.१२.२०२५

**अर्जदार -** १. **बाळकृष्ण रंगराव टापरे,** वय ६० वर्षे, धंदा - शेती
२. **तुळशिदास रंगराव टापरे,** वय ५९ वर्षे, धंदा - शेती
३. **किसन रंगराव टापरे,** वय ५८ वर्षे, धंदा - शेती
४. **दिनेश रंगराव टापरे,** वय ४५ वर्षे, धंदा - शेती
रा.अ.क्र.१,२,३ व ४ रा.थिलोरी, ता.दर्यापूर, जि.अमरावती
५. **ललिता अशोकराव देशमुख,** वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेचरवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती
६. **लिला रामदास बुंदे,** वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.चोहोट्टा बाजार, ता.आकोट, जि.अकोला

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **रंगराव महादेवराव टापरे** हे दिनांक **१४.०९.१९८० रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - रंगराव महादेवराव टापर** यांचे नावे मौजा थिलोरी, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील ग्रा.पं.अंतर्गत मालमत्ता क्र.१४५४,क्षेत्रफळ १८२५ चौ.फुट (१७० चौ.मि.) येणेप्रमाणे खाली जागा येणे प्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत १०,००० रु.आहे.

आज दि.**१५.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)** दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

## दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे न्यायालयामधील

किरकोळ आर.एम.जे.सी.क्र.२८३/२०२५ — ने.ता.०३.१२.२०२५

**अर्जदार :** १. प्रकाश श्रावण राठोड
२. पांडुरंग श्रावण राठोड
३. दारासिंग श्रावण राठोड
४. नंदा फत्तुसिंग राठोड
१ ते ४ सर्व रा.मांजरी म्हसला, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती
५. सुनिता महादेव जाधव,
रा.बेल्हारा, ता.आर्वी, जि.वर्धा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत नबीबाई श्रावण राठोड** यांचा दिनांक **१८.०२.२०२५** रोजी मांजरी म्हसला येथे मृत्यू झाला. मयत **नबीबाई** यांचे पती **श्रावण राठोड** यांचे निधन दि.२६.१०.२०२४ रोजी झाले. मयतांचे अर्जदार १ ते ५ हे मुले व मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३१.१०.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय ,क.स्तर नांदगाव खंडेश्वर

## दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे न्यायालयामधील

किरकोळ आर.एम.जे.सी.क्र.२८६/२०२५ — ने.ता.०१.१२.२०२५

**अर्जदार :** १. आशा ज्ञानेश्वर सोनकुसरे
२. संदीप ज्ञानेश्वर सोनकुसरे
३. पवन ज्ञानेश्वर सोनकुसरे
नं.१ ते ३ रा.कंझरा रोड, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती
४. सुजाता गोवर्धन पराते, रा.वास्तु रचना अपार्टमेंट शेगांव रोड, अमरावती
५. शुभांगी आशिष पत्रे, रा.काळा मारोती मंदिर देवी वार्ड पुसद, ता.पुसद जि.यवतमाळ

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **ज्ञानेश्वर रामचंद्र सोनकुसरे** यांचा दिनांक **३०.०८.२०२५** रोजी डॉ.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व २ ते ५ ही मुले व मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहे. त्यांना अर्जदारा व्यतिरिक्त कोणीही वारस नाही. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२९.१०.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय ,क.स्तर नांदगाव खंडेश्वर

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१९४९/२०२५
**बेबी -वि- निरंक**
पुढील ता.०४.१२.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १. बेबी गजानन जानुस्कर, वय ५७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वर्धासा अप्पा नगर रहाटगांव, अमरावती, ता.जि.अमरावती
२. गजानन नामदेवराव जानुस्कर, वय ६२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.वर्धासा अप्पा नगर रहाटगांव, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत विशाल गजानन जानुस्कर** यांचे दिनांक **०३.०४.२०२१** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार बेबी गजानन जानुस्कर व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **बेबी गजानन जानुस्कर व ईतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०८.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ७०४/२०२५ — ने.ता.२४/१२/२०२५

**अर्जदार -** १. **श्रीमती रजनी सुरेश पांडे,** वय ४० वर्षे, धंदा - घरकाम
२. **सम्यक सुरेश पांडे,** वय २० वर्षे, धंदा - शिक्षण
३. **प्रसेनजीत सुरेश पांडे,** वय १९ वर्षे, धंदा - शिक्षण
सर्व रा.निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पति तर अर्जदार नं.२ व ३चे वडिल नामे **सुरेश बकारामजी पांडे हे दिनांक ०६/१०/२०२५ रोजी दयासागर हॉस्पिटल,अमरावती, ता.व जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. वरील मयतांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- २०.११.२०२५**

शिक्का — आदेशानुसार, **(सहाय्यक अधीक्षक)** दिवाणी न्यायालय, मोर्शी

## (Jt. C.J.J.D.) मा.सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२०७/२०२५** — **ने.ता.२३.१२.२०२५**

**गजानन // वि //निरंक**

१. **गजानन तुळशिराम चारपे**
२. **प्रकाश तुळशिराम चारपे**
अ.क्र.१ व २ रा.मंगरुळ चव्हाळा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. **आशा ईश्वरदास जाने**
रा.सफापुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. **शिलाबाई राजेंद्र तटटे,**
रा.रपुरा अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
५. **लिलाबाई श्रीधर चरोडे**
रा.चमक बू., ता.अचलपूर, जि.अमरावती

**// वि // निरंक**

ज्याअर्थी **तुळशीराम लक्ष्मण चरपे यांचा मृत्यू दि.०३.०४.२००९ रोजी मंगरुळ चव्हाळा,** ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला असुन ते तेथीलच मुळ रहिवासी आहेत. अर्जदार क्र.१ ते अ.क्र.०५ हे मयत यांची मुले-मुली आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २५ जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

## दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे न्यायालयामधील

किरकोळ आर.एम.जे.सी.क्र.२८२/२०२५ — ने.ता.२६.११.२०२५

**अर्जदार :** १. नुरबी शेख गणी
२. शेख हनिफ शेख गणी
दोघेही रा.लोणी टाकळी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
३. शेख फारुख शेख गणी, रा.बोरगांव मंजू, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला
४. सुरैया बानो शेख राजिक, रा.अंजनगांव बारी, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत शेख गणी शेख गफुर** यांचा दिनांक **१२.०२.२००६** रोजी लोणी टाकळी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे मृत्यू झाला. मयत यांचे अर्जदार नं.१ ही पत्नी, अर्जदार नं.२ ते ४ हे मुले व मुलगी आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२९.१०.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय ,क.स्तर नांदगाव खंडेश्वर

## दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे न्यायालयामधील

किरकोळ आर.एम.जे.सी.क्र.३०१/२०२५ — ने.ता.१७.१२.२०२५

**अर्जदार :** १. दिपक राजेराम काळे,
रा.वार्ड नं.३ भिवापूर, पो.अमला विश्वेश्वर, जि.अमरावती
२. नलुबाई नरेंद्र इंगोले, रा.जावरा बु, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
३. सिंधु प्रकाश वरठी, रा.वडाळा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
४. रेखा राजारामजी काळे, रा.वडाळा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत शेवंताबाई राजाराम काळे** यांचा दिनांक **१३.०४.२०१९** रोजी पी.डी.एम.सी. हॉस्पीटल, अमरावती, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. मयत **शेवंताबाई राजाराम काळे** यांचे पती नामे **राजेराम मरुजी काळे** यांचा मृत्यू दि.**२०.१२.२००२** रोजी वडाळा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगा आहे तसेच अर्जदार नं.२ ते ४ या मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१५.११.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय ,क.स्तर नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, मी **भारत हरलाल साहू,** वय ४९ वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.मसानगंज, अमरावती, ता.जि.अमरावती मला खालील नमुद स्थावर मालमत्तेचे दिनांक ०४.०७.१९९७ रोजी माझ्या वडीलांनी माझ्या नावाने खरेदीखत दस्त क्र.५००९ करुन दिलेले होते. त्याचा फेरफार ७/१२ नोंदसाठी रु.१००/- चा स्टॅम्प पेपर क्र. 47AB878736 वर स्थावर मालमत्तेचा फेरफार माझ्या नावाने घेण्याकरीता मी स्वतः दिनांक १२.०७.२०२५ रोजी प्रतिज्ञा लेख करुन दिला होता व त्याची नोंद पब्लिक नोटरी समक्ष केली होती. आता मी खालील नमुद मिळकतीचा कायदेशीररित्या मालक व ताबेदार आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे -**

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर विद्यमान कचेरीचे कक्षेतील व अमरावती मनपा हद्दीतील मौजे-महाजनपूर, प्रगणे-बुडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.३/२, मधील लेआऊट क्रन्व्हर्टेड मंजूर झालेल्या नकाशाप्रमाणे प्लॉट नं.३९-अ याची साईज पु.प.५५ फुट, उ.द.२७-- अ फुट, क्षेत्रफळ १५१२-- चौ.फुट याची (चौ.मी.१४०) याची चतुःसिमा खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता |
| पश्चिमेस | - | सर्व्हीस गल्ली |
| उत्तरेस | - | देशमुख यांचा प्लॉट |
| दक्षिणेस | - | प्लॉट नं.३८ |

वर नमुद मिळकतीचा मी एकमेव कायदेशीर मालक व ताबेदार आहे.

सबब वरील मिळकतीमध्ये कुणाचाही काही हक्क, ताबा, गहाण, बोणा, जप्ती, कुळ व अधिकार, हितसंबंध वारसा हक्क इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी पुराव्यासह खालील पत्त्यावर कळवावे. याकरीता सदर जाहीर नोटीस.

**तारीख - २१.११.२०२५**

**(भारत हरलाल साहु)**
**मो.पं.९७६५४३८६१९**
**ॲड.हार्दिक एम.पटेल**
**मो.क्र.७३०४५५७५३७**

## जाहीर नोटीस

प्रो.नं.४४०४/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१९/११/२०२५

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.४५७/२०२५ — ने.ता.१८.१२.२०२५

**अर्जदार -** १. **गजानन रामराव सांगोले,** वय ६६ वर्षे, धंदा - शेती
रा.आराळा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
२. **केशरबाई जानराव वसू,** वय ७१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.रामगाव, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. **शिलाताई अशोकराव झोड,** वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.घडा सांगवा, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **रामराव कृष्णाजी सांगोले** हे दिनांक **१०.०८.१९९३ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - रामराव कृष्णाजी सांगोले** यांचे नावे मौजे माटरगाव, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील शेत गट क्र.३०४,१ हे. ८२ आर, आ.रु.८.६५ येणेप्रमाणे मिळकत आहे.

आज दि.**१९.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **प्र. सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)** दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ७०२/२०२५ — ने.ता.२३/१२/२०२५

**अर्जदार -** १. **श्री वासुदेव भंगी राठोड,** वय ८४ वर्षे, धंदा - शेती
रा. अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती,

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे **वडिल नामे भंगी हिरा राठोड हे दिनांक ३०/०८/१९८८ रोजी अंबाडा,ता.मोर्शी,जि.अमरावती येथे मरण पावलेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. वरील मयतांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १७.११.२०२५**

शिक्का — आदेशानुसार, **(सहाय्यक अधीक्षक)** दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.६७८/२०२५ — ने.ता.०१.०१.२०२६

**अर्जदार :** १) **भिमराव दशरथ डांगे,** वय ४५ वर्षे, धंदा - मजुरी
रा.आसेगाव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२) **बंडूनाना दशरथ डांगे,** वय ४७ वर्षे, धंदा - वकिल
रा.आसेगाव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
ह.मु.फ्लॅट नं.सी/५, सिध्दी विनायक पार्क, अशोका मार्ग, गणेशबाबा मंदिराजवळ, नाशिक, व्दारका कॉर्नर, नाशिक, ता.जि.नाशिक, महाराष्ट्र - ४२२०११
३) **सोनाली भारत गवई,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.विलास नगर जवळ, रमाबाई आंबेडकर नगर, व्ही एमव्ही, अमरावती, ता.जि.अमरावती,
४) **यशोधरा अनिल नानवटकर,** वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.घर नं. ६५१, प्रबुध्द मंडळ जवळ, फ्रेजरपुरा रुक्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत दशरथ सोमाजी डांगे यांचा मृत्यू दि.०७/१०/२००९ रोजी रा. आसेगाव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.** तसेच **मृतक वच्छलाबाई दशरथ डांगे हिचा मृत्यू दि.०९/०१/२०२५** रोजी रा.आसेगाव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यक्तीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरिता वारसाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.६७८/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१९.११.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — **आदेशानुसार, सहायक अधीक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

## दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे न्यायालयामधील

किरकोळ आर.एम.जे.सी.क्र.२९९/२०२५ — ने.ता.१६.१२.२०२५

**अर्जदार :** १. राजेंद्र शिवराम थोरात
रा.वार्ड नं.१ वडाळा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
२. सुलोचना नागोराव मनोहरे,
रा.किन्हाळा, ता.आष्टी, जि.वर्धा
३. रोशनी राजेंद्र थोरात
रा.वार्ड नं.१ वडाळा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत राधाबाई राजू उर्फ राजेंद्र थोरात** यांचा दिनांक **२३.११.२०१५** रोजी जावरा मोळवण, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे मृत्यू झाला. मयत यांचे अर्जदार नं.१ पती आहेत तर अर्जदार २ व ३ या मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१५.११.२०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय ,क.स्तर नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **श्री.सुरेशचंद्र तानकु मोरे,** रा.विद्यापीठ परिसर, अंबिका नगर, मार्डी रोड, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मनपा अमरावतीचे हद्दीतील मौजे वडाळी, प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील सर्वे नंबर ९१/१ मधील प्लॉट नं.५ पैकी पुर्वेकडील बाजुचे १७५१ चौ.फुट (१६२.७३ चौ.मी.) व प्लॉट नं.६ चे क्षेत्रफळ ३७०१ चौ.फुट (३४३.८३ चौ.मी.) असे दोन्ही प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ ५४५२ चौ.फुट (५०३.५६ चौ.मी.) असून यावर बांधलेल्या माऊली कन्स्ट्रक्शन ॲण्ड रेसिडेन्सी कॉम्प्लेक्समधील तळमजल्यावरील दुकान नं.जी-०२, ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ १८.५६ चौ.मी. (२०० चौ.फुट) असून ज्याच्या चतुःसिमा - पुर्वेस - दुकान नं.जी-१, पश्चिमेस - दुकान नं.जी-३, उत्तरेस - बिल्डींगची खुली जागा व दक्षिणेस - पार्कींग आहे. वरील नमुद दुकान मालमत्तेचा खरेदीचा सौदा माझे पक्षकार यांनी मयुरी सागर वानखडे, रा.पुंडलिक बाबा हाऊसिंग सोसायटी, रुक्मिणी नगर, अमरावती यांचेसोबत केला आहे.

तरी या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना सुचित करण्यात येते की, वरील दुकान मालमत्तेवरील कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, वारसा हक्क, गहाण, बोजा, सरकारी वा निमसरकारी संस्थेचे कर्ज, कुठल्याही प्रकारचे हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत माझे पक्षकारासोबत सर्व दस्तऐवजांसह संपर्क करावा. अन्यथा माझे पक्षकार कराराप्रमाणे सदर मालमत्तेची खरेदी करुन घेईल व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**अमरावती**

**तारीख - २०.११.२०२५**

**पक्षकार**
**(मो.नं.९९२२२५९०३८)**

**श्री.सुरेशचंद तानकु मोरे यांचेतर्फे**
**अधिवक्ता (जी.एस.तांबटकर)**
**खंडेलवाल कॉम्प्लेक्स, सुंदरलाल चौक, अमरावती**
**मो.नं.९४२२८५५३४८, ९०७५२७५४२०**

# नळदमयंती सागर पुलाला मंजुरी

## मोर्शी तालुक्यासाठी विकासाचा नवा मार्ग

**मोर्शी/वार्ताहर**

नळदमयंती सागर (अप्पर वर्धा धरण) गेट समोरील मोर्शी आणि आष्टी या दोन तालुक्यांना थेट जोडणारा दीर्घकाल प्रलंबित असलेला पूल बांधण्यास अखेर केंद्रीय मंजुरी मिळाली आहे. तब्बल ३५ कोटी रुपयांच्या निधीचे हे महत्त्वाकांक्षी काम मंजूर झाले असून, मोर्शी–आष्टी परिसरातील नागरिकांच्या दशकांपासूनच्या मागणीची पूर्तता आता प्रत्यक्षात उतरणार आहे.

या पुलासाठी आमदार उमेश



उर्फ चंदु यावलकर यांनी सातत्याने केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करत, विभागीय स्तरापासून दिल्लीपर्यंत अनेकदा पाठपुरावा केला होता. या अथक प्रयत्नांना आज यश लाभले असून, हा पूल बांधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.यामागे केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री सन्माननीय नितीनजी गडकरी यांचे विशेष सहकार्य लाभले. याकरिता सन्माननीय आ. चंदूभाऊ यावलकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

# विद्यापीठात संविधान दिनानिमित्त बुधवारी व्याख्यान

**अमरावती/ का.प्र.**



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने दि. २६ नोव्हेंबर, २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त दुपारी ३.३० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्र सभागृहामध्ये व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. 'संवैधानिक मूल्यांसमोरील २१ व्या शतकातील आव्हाने आणि त्यावरील उपाय' या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाचे ॲड. श्रीकिशन मोरे हे व्याख्यान देणार आहेत. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी उपस्थित राहणार आहेत.व्याख्यान कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी केले आहे.

## संक्षिप्त



### काँग्रेस कार्यालयात इंदिरा गांधी जयंती

**खल्लार**-भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांची जयंती काँग्रेस कार्यालय दर्यापूर येथे साजरी करण्यात आली. दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांच्या हस्ते प्रतिमेची पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी दर्यापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आतिष शिरभाते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अनिल पाटील भारसाकळे, माजी नगरसेवक असलम भाई घाणीवाले, ॲड. निशिकांत पाखरे, दत्ता पाटील कुंभारकर. विनोद वानखडे,रामभाऊ साखरे, मधुभाऊ घाडगे, आदी कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.



### युवा महोत्सवमध्ये व्यंकटेश नेरकरचे सुयश

**अमरावती-** स्थानिक श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती या महाविद्यालयाचा एम.ए.(योगशास्त्र) प्रथम वर्षाचा विद्यार्थी व्यंकटेश नीता नारायण नेरकर याने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५-२६' मध्ये कथालेखन स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले व कविता लेखन स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकावले. या सोबतच त्याला अमरावती जिल्ह्याचे व आपल्या महाविद्यालयाचे 'विभागस्तरीय युवा महोत्सव' मध्ये प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी मिळाली.सदर यशाचे सर्वस्व श्रेय त्याने आपल्या महाविद्यालयातील योगशास्त्र विभागातील सर्व शिक्षकांना दिले. 'साहित्य क्षेत्रामध्ये भविष्यात देखील अशीच सुवर्ण कामगिरी करणार' असा आशावाद त्याने व्यक्त केला. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव मा.पद्मश्री. प्रभाकरराव वैद्य, सचिव डॉ.माधुरी चेंडके, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, योगशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुनील लाबडे आदी शिक्षक-प्रशिक्षक, मित्र-मैत्रिणी, आई-वडील, इत्यादी सर्वांनी त्याचं अभिनंदन करत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### उघड्यावरचा संसार...



**आसेगाव पूर्णा येथे गेल्या १५ दिवसापासून गावालगतच पराज्यातून आलेले 'नाक व कान' टोचविणारे व्यावसायिक या भरथंडीत आपल्या कुटुंबासह वास्तव्य करीत आहेत. त्यांचे उघड्यावरील हे संसार वेदना देणारे असेच आहे.**

(छायाचित्र -किशोर मोकलकर आसेगाव पूर्णा)

# राजुरा गावात एनडी आरएफच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूर रेल्वे तालुक्यातील राजुरा येथील स्व. खंडेराव देशमुख कनिष्ठ माध्यमिक विद्यालयात मंगळवार (ता. १८) रोजी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी तसेच गावातील युवक-युवतींसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रशिक्षणाचे प्रमुख मार्गदर्शक ब्रिजेश कुमार यादव (इन्स्पेक्टर जे.डी.) होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एनडीआरएफच्या एकूण १३ सदस्यांच्या



टीमने विविध आपत्ती काळातील बचावकार्य, प्राथमिक उपचार, सुरक्षितता उपाययोजना यासंबंधी महत्त्वपूर्ण प्रात्यक्षिके सादर केली. या कार्यक्रमात महेश भावसर, प्रशांत वाघमारे, अशोक निंबर्ते, सुरज प्रकाश मिश्रा, गजानन वाडेकर, निलेश रेले, वर्षा भगत, विनोद कुमार जेडे, आवेज अली, परसराम साहू, देवेंद्र कुमार, प्रतीक कडू, मंगेश बोरकर ही चमु उपस्थित होती. या टीमचे स्वागत व सत्कार स्व. खंडेराव देशमुख कनिष्ठ माध्यमिक विद्यालय, राजुरा चे प्राचार्य कापसे तसेच शिक्षकवृंद नितीन टाले, नंदकुमार कापडे, बोरकर, पाटेकर, खंडारे, सोळंके, भास्कर, तुमडाम, हिवरे, अभ्यंकर, शिरभाते, गणगणे, चाफले, जगनाडे, राजेंद्र हेटे, मानवटकर, पतींगे मॅडम, बेलसरे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. आपत्तीच्या प्रसंगी स्वत:ची व इतरांची सुरक्षितता कशी करावी, तात्काळ मदत कशी द्यावी, धोकादायक परिस्थितीत योग्य निर्णय कसे घ्यावेत याबाबत मौलिक मार्गदर्शन व प्रात्यक्षिके या सत्रात घेण्यात आली. सदर कार्यक्रमाचे मुख्य आयोजक राजुरा ग्रा.पं. सदस्य भुषण शिवदासराव काळे होते व त्यांच्या पुढाकाराने हा उपयुक्त व सामाजिक जाणीव वाढवणारा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# अपंग व्यक्तींवरील अत्याचारांना कडक शिक्षा; जिल्ह्यात विशेष न्यायालयाची स्थापना

**अमरावती/क्रा.प्र.**



अपंग व्यक्तींवर होणाऱ्या अत्याचार, अपमान आणि धमक्या रोखण्यासाठी केंद्र सरकारने अपंग व्यक्ती हक्क कायदा २०१६ मधील कठोर तरतुदी लागू करण्यावर भर दिला आहे. या कायद्याच्या कलम ८९, ९२ आणि ९३ नुसार अपंग व्यक्तीचा अपमान करणे, धमकावणे, हल्ला करणे किंवा त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा गैरवर्तन करणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरवण्यात आला आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांसाठी सहा महिने ते पाच वर्षे तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

अपंग व्यक्तींसंबंधित गुन्ह्यांचे तातडीने निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विशेष न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून ही न्यायालये संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या संमतीने सत्र न्यायालयांत कार्यरत राहतील. या प्रकरणांसाठी सात वर्षांचा अनुभव असलेल्या विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती केली जाणार आहे.कायद्यांतर्गत पुढील कृत्यांना गुन्हा घोषित करण्यात आले आहे. अपमान करणे, अश्लील टिप्पणी करणे,धमक्या देणे, ढकलणे किंवा हल्ला करणे,जाणूनबुजून अन्न-पाण्याला नकार देणे,अपंग मुले किंवा महिलांचे लैंगिक शोषण,अपंग व्यक्तींच्या सहाय्यक उपकरणांचे नुकसान,अपंग महिलेच्या संमतीशिवाय गर्भपात या सर्व कृत्यांसाठी कठोर शिक्षा आणि दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच अपंग व्यक्तींना आवश्यक ते सहकार्य मिळावे यासाठी ङङप्रत्येक राज्याने विशेष निधी स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अपंग व्यक्तींच्या संरक्षणासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय भूमिका पार पाडावी, यासाठी जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना अत्याचार आणि गैरवर्तन प्रकरणांत थेट कठोर कारवाई करण्याचे अधिकार दिले आहेत.'दिव्यांग हे केवळ लाभार्थी नाहीत, तर या समाजाचे समान नागरिक आहेत. त्यांचा सन्मान, सुरक्षा आणि न्याय सुनिश्चित करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी जारी केलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

# नांदगाव पेठ येथे आयुष्यमान कार्ड शिबिर

**अमरावती-** आयुष्यमान आरोग्य मंदिर नांदगाव पेठ अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा येथे आयुष्यमान भारत (गोल्डन कार्ड) शिबिर आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४५ विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे आयुष्यमान कार्ड काढण्यात आले. ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे, समुदाय आरोग्य अधिकारी सौरभपाटील, आरोग्य सेवक अभिलाष टेकाडे, वीणा चव्हाण, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# जी.एच.रायसोनी विद्यापीठात 'सस्टेनेबिलिटी अँड ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग विथ इंडस्ट्री ४.० ॲडॉप्शन' व्याख्यान



**अमरावती/का.प्र.**

जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातर्फे प्रथम वर्ष बी.टेक. विद्यार्थ्यांसाठी 'सस्टेनेबिलिटी अँड ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग विथ इंडस्ट्री ४.० ॲडॉप्शन' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून मौलाना आझाद नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (मॅनिट) होते. डॉ. वरुडकर यांनी हरित उत्पादनाचे वाढते महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, 'ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग हा आता पर्याय नसून व्यवसायाची अनिवार्य गरज बनली आहे.' सस्टेनेबल मॅन्युफॅक्चरिंगची व्याख्या करताना ते म्हणाले की, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि पर्यावरणावर कमीत कमी परिणाम करणारी, ऊर्जा व नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणारी तसेच कर्मचारी व समाजाच्या सुरक्षिततेची हमी देणारी उत्पादन प्रक्रिया हीच खरी शाश्वत उत्पादन पद्धती आहे. इंडस्ट्री ४.० तंत्रज्ञानाचा हरित विनिर्माणाला मिळणारा आधार समजावून सांगताना त्यांनी एआय, आयओटी, क्लाउड कंप्यूटिंग, ॲडिटीव्ह मॅन्युफॅक्चरिंग, डिजिटल ट्विन्स यांसारख्या तंत्रज्ञानामुळे प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्स, ऊर्जा बचत, कचरा कमी करणे आणि कार्यक्षम उत्पादन शक्य होत असल्याचे नमूद केले. या क्षेत्रातील उच्च प्रारंभिक गुंतवणूक, कुशल मनुष्यबळाची कमतरता आणि डेटा सिक्युरिटी यांसारखी आव्हाने अधोरेखित करताना देखील डॉ. वरुडकर यांनी इंडस्ट्री ४.० ला 'तरुण पिढीसाठी सर्वात मोठी संधी' असे संबोधले. कार्यक्रमाचे समन्वय डॉ. तपन कुमार शंकर यांनी केले. या प्रसंगी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल, डीन स्टुडंट वेल्फेअर डॉ. प्रशांत अवचट, पीएच.डी. सेल प्रभारी डॉ. श्रीकांत चवाटे यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

# 'स्वाश्रिता अभियान' युवती स्वसंरक्षण कार्यशाळा

**अमरावती -** वॉरिअर्स स्पोर्ट्स अँड मल्टीपर्पज अकादमी अमरावती द्वारा संचालित शहरातील नामांकित कराटे प्रशिक्षण संस्था वॉरीअर्स स्पोर्ट्स अँड मार्शल आर्टस् अकादमी अमरावतीच्या वतीने 'स्वाश्रीता अभियान' अंतर्गत युवती स्वसंरक्षण एकदिवसीय कार्यशाळेचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रसंगी वॉरीअर्स स्पोर्ट्स अँड मार्शल आर्टस् अकादमी अमरावतीचे सचिव व मुख्य प्रशिक्षक सेन्सई उमेश भा. मोवळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात व सहाय्यक प्रशिक्षक ललित ढोके, सागर मेश्राम, आशिष वाघमारे, जय कारंजकर, पिंकी प्रजापती,आयुष चौधरी,कृष्णा वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थित ३०० हुन अधिक विद्यार्थी-विद्यार्थीनीना या शिबिरात आत्मसंरक्षणाचे धडे देण्यात आले. अध्यक्ष विलास गोंगे सचिव प्रदीप चर्जन प्राचार्य प्रीती बजाज, शिक्षिका मुक्ता सराफ, कोमल मोरे, प्रीति राणे, प्रीति खेडकर, रसिका देशमुख, तेजस्विनी अर्डक, कविता चिंचमलकर, वर्षा कराडे, कामिनी काळबांडे, मोना सायरे, रुपाली माळी, अनुजा वैद्य मदतनिस मीरा वाघाडे, वर्षा मंडाळकर, वैशाली ठाकरे व इतर शिक्षक वृंद उपस्थित होते.



# मधुमेहाच्या समूळ उच्चाटन करण्यासाठी तत्पर रहावे -डॉ रुपाली कावरे

**अमरावती/का.प्र.**

मधुमेह नियंत्रणासाठी 'मधुमेह मुक्त कार्यशाळा जोशी सभागृहात झाली. या कार्यशाळेत मधुमेह तज्ञ डॉ. रुपाली कावरे यांनी मधुमेह विकाराचे उत्पत्तीवर समुपदेशन केले. कार्यशाळेत उपस्थित नागरिकांना संबोधित करतांना सांगितले की, जर कुणाला मधुमेहाची लक्षणे जाणवत असतील तर त्यांनी तात्काळ आपल्या रक्ताची तपासणी करून त्यानंतर मधुमेहाचे निदान पक्के झाल्यास अतिशय काटेकोरपणे आपल्या दैनंदिन जीवनात आहार-विहाराचे पथ्य पाळावेत. अन्यथा या विकाराचा प्रादुर्भाव वाढत गेल्यास त्यासोबत इतर अनेक आजारांना तुम्हाला सामोरे जावे लागेल म्हणून आपण याबाबत दक्षता पाळावी.



अनियमित आहार-विहारामुळे नागरिकांमध्ये आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्या अनेक आजारापैकी मधुमेह ( Diabetes) हा एक प्रदिर्घ काळ त्रास देणारा आजार अनेकांमध्ये आढळून आलेला आहे. त्यासाठी सकाळी लवकर उठून फिरायला जाणे व नियमित व्यायाम करावा. आपला आजार जुनाट होऊ देता कामा नये. प्रापंचिक जीवनामध्ये वावरताना काळजी, अर्थहिन चिंता, दूर सारुन आपला तणाव आटोक्यात आणा. मधुमेह हा आजार जेव्हा उद्भवतो व त्याचा प्रसार वाढताना दिसतो त्याच वेळी हा विचार आटोक्यात आणण्यासाठी आपण योग्य उपचारपध्दती अवलंबली पाहिजे. योग्य वेळी दक्षता न घेतल्यास मधुमेहावर नियंत्रण प्रस्थापित करता येणे कठीण आहे.

मधुमेहाचा प्रभाव जास्त प्रमाणात झाल्यास त्याचे आणखी दुष्परिणाम म्हणजे हृदयविकार, मूत्रपिंडांच्या समस्या, दृष्टी कमी होणे, शरीरात जखमा झाल्यास त्या दुरुस्त न होणे अशा समस्या निर्माण होतात. म्हणून या विकाराचा गांभिर्याने विचार सर्वांनी करावा.यावेळी डॉ रुपाली कावरे यांनी लिहलेल्या प्रवास मधुमेह मुक्तीचा या पुस्तकाचे विमोचन ओमप्रकाश चर्जन यांनी केले.

## पी.एम.किसान निधी कार्यक्रम व नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रम

# नैसर्गिक शेती ही काळाची गरज- आ. सुलभा खोडके

**अमरावती/क्रा.प्र.**

शेती व्यवसाय हा अन्नधान्य व खाद्य उत्पादनाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. परंतु आजच्या बदलत्या युगात शेती सुद्धा आधुनिक पद्धतीने होत असून अनेक जैविक व रासायनिक घटकांचा वापर वाढल्याने शेती उत्पादनातील पोषण कमी झाले आहे. परिणामी विषयुक्त अन्न -धान्य हे आपल्या आरोग्यासाठी नुकसानदायी ठरतांना दिसत आहे. नैसर्गिक शेती काळाची गरज असून शेतकऱ्यांमध्ये याबाबत जाणीव -जागृती आवश्यक असल्याचे प्रतिपादन आ.सुलभा संजय खोडके यांनी व्यक्त केले.




कृषी विज्ञान केंद्र, घातखेड, अमरावती येथे पी.एम. किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हप्त्याच्या वितारणाचा लाईव्ह टेलिकास्ट कार्यक्रम तसेच डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत नैसर्गिक शेती विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. नैसर्गिक शेती हे आजच्या काळाचे भाकीत असून, कृषी विज्ञान केंद्रे ही तंत्रज्ञान व ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तमिळनाडूतील कोयंबटूर येथून डीबीटी प्रणालीच्या माध्यमातून देशातील शेतकऱ्यांना पी.एम. किसान योजनेचा २१ वा हप्ता वितरित केला. हा लाईव्ह कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्र, घातखेड येथे शेतकऱ्यांनी पाहिला.या दोन दिवसीय प्रशिक्षणात शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीची मूलभूत तत्त्वे, तण नियंत्रणाच्या पद्धती, विविध नैसर्गिक फॉर्म्युलेशनची निर्मिती व वापर, नैसर्गिक कीटकनाशके, ट्रायकोडर्मा उत्पादन, जैविक खतांची तयारी याबाबत प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले.कार्यक्रमासाठी धारणी तालुक्यातील ४० शेतकरी तसेच इतर तालुक्यांतील १०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला कृषी विज्ञान केंद्र घातखेडा येथील विषय विशेषज्ञ - (कृषी विद्या) डॉ. ए. पी. फुसे, प्रमोद मेंढे, विषय विशेषज्ञ,(कृषी विस्तार) अमर तायडे, डॉ. प्रणिता कडू, संजय पाचकवडे, राजेश राठोड, बीटीएम आत्मा अमरावतीचे दुबे तसेच प्रकल्पातील शुभम लहाने, शुभम कोंडे, डीगंबर सातंगे, प्रणिता भोंगे तर कृषि विज्ञान केंद्राचे प्रतिक घोगरे, विवेक भटकर, सुधिर भुस्कुटे यांचेसह शेतकरी प्रामुख्याने उपस्थित होते. या प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांचे दोन गट तयार करून त्यांनी नैसर्गिक शेतीतील वापरात येत असलेले तंत्रज्ञान बाबत सादरीकरण सादर केले. तसेच शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीविषयक तांत्रिक पुस्तिका वाटप करण्यात आली.

### भव्य कृषी मेळावा आणि उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार २०२५

# शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे -कृषी मंत्री दत्तात्रय भरणे





**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेतकरी बांधव कष्टाने व प्रामाणिकपणे शेती करीत असताना बरेचदा नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. अशावेळी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज शिराळा येथे व्यक्त केला.

स्व. विनायकराव दादा देशमुख कृषी व शोध प्रतिष्ठान तर्फे शिराळा येथे कृषी मेळावा व उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार -२०२५ वितरण कार्यक्रम कस्तुराबाई जैन विद्यालय प्रांगण, शिराळा येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कृषी मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. तसेच उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार -२०२५ चे वितरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. शेती करीत असताना नवनवीन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आला. प्रयोगशील शेतकऱ्यांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती. कृषी मेळाव्यामध्ये विविध कीडनाशके, फवारणी, अवजारे यांची माहिती देण्यात येत होती.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. वातावरण बदलामुळे बरेचदा ☞(पान २ वर)

### ३० जून २०२६ पूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार

## मनोज देशमुख यांचा समर्थकांसह राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश






**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वर्गीय विनायकराव दादा देशमुख कृषी व शोध प्रतिष्ठान शिराळा तालुका जिल्हा अमरावती द्वारा भव्य कृषी मेळावा आणि उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार २०२५ दि.२१ नोव्हेंबर २०२५ ला दुपारी एक वाजता कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमांमध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृषी मेळावा कृषी पुरस्कार व भव्यपक्ष प्रवेश मनोज देशमुख यांच्यासोबत हजारो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये प्रवेश केला. कार्यक्रमाला आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके अमरावती, सुरेखा ठाकर, संतोष महात्मे, सुनील वराडे, राजाभाऊ देशमुख, अभय महल्ले, प्रशांत काळबांडे, अलका शिवाजीराव देशमुख, भावना मंगेश काळमेघ, प्रतिभा मनोज देशमुख, अक्षय भुयार माजी एन एस यु आय अध्यक्ष व आजूबाजूच्या ☞(पान २ वर)

## महापालिकेची प्रारूप मतदार यादी घोषित

## ६ लाख ८१ हजार ५१९ मतदार

### -२७ पर्यंत दाखल करता येणार आक्षेप , -५ डिसेंबरला अंतिम यादी



**अमरावती/प्रतिनिधीः-** नगरपालिका नगरपंचायत निवडणुकीच्या घोषणेनंतर आता महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. आरक्षण घोषित झाल्यानंतर आता महानगरपालिकेच्या वतीने गुरुवार २० नोव्हेंबर रोजी मनपाची प्रारूप मतदार यादी घोषित करण्यात आली. या यादीमध्ये प्रभागात सहभागी क्षेत्र आणि त्यांचे परिसीमनची पूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. यादी नुसार मनपा क्षेत्रामध्ये ६ लाख ८१ हजार ५१९ मतदार आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा ३४ हजार ४६२ मतदार वाढलेले आहे. हे मतदार या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. प्रारूप यादीवर २७ नोव्हेंबर पर्यंत आक्षेप दाखल करण्याची मुदत देण्यात आली आहे. या आक्षेपवर सुनावणी झाल्यावर ५ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी घोषित करण्यात येणार आहे. यानंतर ८ डिसेंबर रोजी मतदान केंद्रांची यादी जारी होणार आणि १२ डिसेंबर रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रकाशित केली जाणार आहे. महानगरपालिकेच्या सूचना फलकावर आणि मनपाच्या वेबसाईटवर ही यादी नागरिकांना पाहण्यासाठी ☞(पान २ वर)

## कृषी मंत्र्यांच्या ताफ्याला काँग्रेसने दाखवले काळे झेंडे



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे आज जिल्हा दौऱ्यावर आले होते. शिराळा येथे कृषी मेळावा व उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी ते आले असता यावेळी वलगाव पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या पुसद येथील शालिनी पेट्रोल पंप जवळ काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवून घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांसाठी शासनाने जे आश्वासन ☞(पान २ वर)

### नांदगाव नगरपंचायत निवडणूकः

## नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या प्रत्येकी ५ उमेदवारांची माघार

### नगराध्यक्ष ६ तर नगरसेवक पदासाठी ७३ रिंगणात



**नांदगाव खांडेश्वर/प्रतिनिधीः-** स्थानिक नांदगाव नगरपंचायतच्या होत असलेल्या सार्वत्रिक निवडणुकी करिता नामांकन अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेत अखेर शुक्रवारी एकूण नगराध्यक्ष पदाचे ५ उमेदवार व नगरसेवक पदाचे ५ उमेदवार मिळून एकूण १० उमेदवारांनी नामांकन मागे घेतले. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात कायम असून नगरसेवक पदासाठी १७ प्रभागातून ७३ उमेदवार रिंगणात कायम आहे. नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी दाखल केलेल्या फौजीया तबस्सुम मोहम्मद जावेद एनसीपी शरद पवार, सुरेखा दिपक शिंदे अपक्ष, हर्षना अविनाश ब्राह्मणवाडे एनसीपी, नीलिमा ओंकार ठाकरे अपक्ष, नूजहत जहाँ सय्यद शोएब अहमद अपक्ष या उमेदवारांनी नगराध्यक्ष पदासाठी दाखल केलेली उमेदवारी मागे घेतली तसेच ☞(पान २ वर)

### मोर्शी नगरपरीषद निवडणूक

## नगराध्यक्ष पदाचे ६ तर नगर सेवकासाठी १४१ उमेदवार रिंगणात!

**मोर्शी/प्रतिनिधीः-** २ डिसेंबर रोजी होऊ घातलेल्या मोर्शी नगरपरिषदेच्या निवडणुकीकरिता दि.१० नोव्हेंबर पासून नामांकन अर्ज दाखल करायला सुरुवात झाली होती. छाननी दरम्यान नगराध्यक्ष पदाकरिता एकूण ११ व नगरसेवक पदाकरिता १५३ नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वैध ठरविले होते. दि.२० नोव्हेंबर रोजी नगराध्यक्ष पदाच्या ११ नामांकन पैकी महल्ले प्रतिभा निलेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष(शरद पवार गट),चिखले वर्षा दिलीप अपक्ष,वसंत कांचन दिनेश अपक्ष यांनी तर नगरसेवक पदाच्या १५३ नामांकनापैकी फंदे आदर्श पल्लवी, अरसडे गजानन सूर्यभान,अकर्ते मंगेश गुलाबराव यांनी आपले नामांकन पत्र परत घेतला. त्यामुळे नगराध्यक्ष पदाकरिता ८ उमेदवार तसेच नगरसेवक पदाकरिता १५० उमेदवार निवडणूक मैदानात असतांना आज अखेरच्या दिवशी दि. २१ नोव्हेंबर रोजी नगराध्यक्ष पदाच्या स्मिता प्रदीप अजमीरे यांनी आपले नामांकन परत घेतले. सोनल निलेश रोडे यांनी दोन नामांकन दाखल केले होते. त्यामुळे ☞(पान २ वर)

### लोकसभा, विधानसभेला मुभा, स्थानिक निवडणुकीत अटी

## निवडणूक आयोगाच्या जाचक अटीमुळे आर्थिक गरिब उमेदवारांवर अन्याय

### -एमआयएम उमेदवार विनित डोंगरदीवे



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** नगरपरीषद सार्वत्रीक निवडणुक २०२५ उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ३ वाजता नंतर उमेदवारांना फलक, झेंडे,कॉर्नर सभा घेण्याचे संमती पत्र बघीतल्यानंतर ही निवडणूक गोरगरीब जनतेसाठी नसून फक्त श्रीमंत उमेदवारानकरीता असल्याचा आरोप नगराध्यक्षपदाचे एमआयएम चे उमेदवार विनीत डोंगरदिवे यांनी पत्रकार परिषदेत केला. नगरपालीका निवडणुक ही निष्पक्ष भयमुक्त न्याय तसेच समानतेने व्हावी असे नगरपरीषद निवडणुक ॲक्ट मध्ये नमुद आहे. निवडणुकीत श्रीमंतच नाही तर गोरगरीब उमेदवार सुद्धा निवडणुक रिंगणात उभे असतांना फलक लावण्याच्या समंती पत्रात घरमालकाची संमती तसेच घराचा टॅक्स भरल्याची पावती बंधनकारक आहे.घरावर झेंडा लावायचा असल्यास त्यासाठीही घरटॅक्स भरणे आवाश्यक आहे.आणि सर्वात महत्वाचे म्हणजे कॉर्नर सभा घेतांना ज्या व्यक्तीच्या ☞(पान २ वर)

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

### पिस्तुल दाखवून मारण्याची धमकी



**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका ४० वर्षीय महिलेला तिच्या ओळखीच्या ५० वर्षीय इसमाने लग्नाचे आमीष देऊन ४ वर्षापर्यंत तिचे शोषण केले. या दरम्यान तिचे अश्लील फोटो काढून तिला ब्लॅकमेल करण्यात आले. आरोपी एवढ्यावरच नाही थांबला तर त्याने पिस्तूल दाखवून फ्लॅट नावावर नाही केल्यास महिलेला ठार मारण्याची धमकी दिली. महिलेच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी आरोपी मंगेश सदाशिव खेडकर (५०, मनसावली अपार्टमेंट, कांता नगर) याच्या विरुद्ध ☞(पान २ वर)

### धामणगाव रेल्वे नगर परिषद निवडणूक

## ५ उमेदवारांनी घेतली माघार



**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारांची यादी अंतिम यादी टप्प्यात आली असून नामांकन अर्ज मागे घेण्याच्या दिवशी राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या विनोद तलवारे व अपक्ष प्रवीण इंगळे यांनी अधिकृतपणे आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. धामणगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक दोन मधील प्रतिष्ठेच्या मानल्या जाणा-या प्रभाग क्रमांक २ (ब) मधून राष्ट्रवादी काँग्रेस (अजीत पवार गट) ☞(पान २ वर)

## वाईन शॉपच्या आड बारमध्ये नकली दारूचा पुरवठा

### एक्साइज धाडीत मोठा घोटाळा उघड - बॅच नंबर बनावट!

### अमरावतीमध्ये बनावट दारूचा लाखोंचा खेळ



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीत दारूसारख्या नियंत्रित आणि परवाना असलेल्या व्यवसायावरच माफियांनी कब्जा केला आहे. शहरात एक 'दारु माफिया' बनावट दारूचा महापूरच सोडत असून, राज्य सरकारपासून दारू कंपन्यांपर्यंत सर्वांचेच लाखो-करोडो रुपयांचे नुकसान होत आहे. सर्वात भयानक म्हणजे, ही दारू पिणारे नागरिक प्राणघातक मिश्रणाने आपले आरोग्य बिघडवू लागले आहेत.

नागपूर-यवतमाळच्या मोठ्या कंपन्यांत व्यवस्थापक राहिलेल्या आरोपीने अमरावती शहरात तब्बल सहा वाईन शॉप भाड्याने घेतली. या दुकानांच्या आडून १८ ते १९ परमिट रूम्स आणि बीअरबार्सना बनावट दारूचा पुरवठा करण्यात आला. काही पेट्यात अस्सल दारू तर बाकी बाटल्यांवर बनावट बॅच नंबरची ☞(पान २ वर)

### दर्यापूर नगरपरिषद निवडणूक :

## रिंगणातून सात उमेदवारांची माघार

### नगराध्यक्षपदासाठी सात उमेदवार रिंगणात



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज भरण्याच्या दि. १० ते १७ नोव्हेंबर या कालावधीत नगरसेवक पदासाठी इच्छूक ऊमेदवारांकडून १३९ तर नगराध्यक्ष पदासाठी ७ नामनिर्देशन दाखल झाले होते. अर्ज छाननीप्रक्रीयेत १३९ पैकी १२ अर्ज अवैध ठरले होते. दरम्यान उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शुक्रवारी (दि.२१ ) शेवटच्या दिवसापर्यंत नगरसेवकपदाच्या रिंगणातून ७ जणांनी उमेदवारी मागे घेतली असून नगराध्यक्षपदाचे ७ ही उमेदवार कायम आहेत. आता थेट निवडणुकीच्या मैदानात नगराध्यक्षपदासाठी ७ तर नगरसेवक पदासाठी १२० उमेदवार कायम आहेत.

नगरपरिषद निवडणूकीतून माघार घेणाऱ्यांमध्ये तेजस रामेश्वर चव्हाण प्रभाग क्र.५ ब (अपक्ष), मनोहर वामन इंगळे प्रभाग क्र.१ (युवा स्वाभिमानी पार्टी), संतोष सुभाष राठोड प्रभाग ☞(पान २ वर)

## औषध विक्रेत्याला ३०.४० लाखांनी फसविले



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील एका औषध विक्रेत्याला जास्त नफ्याचे आमिष दाखवून ३० लाख ४३ हजार ३७८ रुपयांनी फसविण्यात आल्याची घटना समोर आली आहे. सायबर पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार काँग्रेस नगर परिसरातील त्रिवेणी कॉलनी मध्ये राहणारे रवींद्र उत्तमराव शिंगाडे (३८) यांचे मेडिकल दुकान आहे. ४ ते १२ सप्टेंबर रोजी त्यांना जास्त नफ्याचे प्रलोभन देऊन मो.नंबर ९९८०१८७०८९ वरून लिंक पाठविण्यात आली. मोबाईलमध्ये ॲप डाउनलोड करून जास्त पैशांची गुंतवणूक करून जास्त नफा ☞(पान २ वर)

## ६४ व्या हौशी मराठी राज्य नाटय स्पर्धेला प्रेक्षकांचा वाढता प्रतिसाद



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६४ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धा प्राथमिक फेरी अमरावती येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पं. दे. मेडिकल कॉलेज परिसर येथे दि.१४ पासून सुरवात झाली आहे. जसजशी स्पर्धा पुढे सरकत आहे तसतशी रंगतदार होत आहे.गुरुवार दि. २० रोजी गंधर्व नाट्य संस्थेचे जेंडर ॲन आयडेंटिटी हे एकंदर २१ कलावंतांचा सहभाग असलेले डॉ. सोमनाथ सोनवलकर लिखित आणि दीपक नांदगावकर दिग्दर्शित नाटक सादर झाले.

लेखक वडील आणि बुटीक संचालक आई असलेल्या घरात जन्माला आलेला मुलगा मुलीसारखं वागायला लागतो आणि तरुणपणात एका मुलाच्या प्रेमात पडतो. लिंग बदलाची शस्त्रक्रिया करून त्याला लग्न करायचे असते पण आईच्या विरोधामुळे तो ☞(पान २ वर)

## अचलपुरात रेल्वे स्टेशन परिसरात देहव्यापाराचा पर्दाफाश

### महिला दलाल आणि साथीदाराला अटक



**अमरावती/प्रतिनिधीः-** अचलपुर शहरातील बंद पडलेल्या रेल्वे स्टेशन परिसरात सुरू असलेल्या अनैतिक देहव्यापाराच्या रॅकेटवर अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकत दोन जणांना रंगेहात पकडले. ही कारवाई २० नोव्हेंबर रोजी गुप्त माहितीवरून करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली होती की, कांताबाई प्रविण शाहा (५०, रा. पेन्शनपुरा, परतवाडा) ही महिला आर्थिक फायद्यासाठी तरुण मुलींकडून देहव्यापार करून घेत आहे. हा व्यापार बंद पडलेल्या अचलपुर रेल्वे स्टेशन परिसरात सुरू असल्याचे निष्पन्न झाले. माहितीनंतर पोलिसांनी एक बनावट ग्राहक त्या ठिकाणी पाठविला. त्या वेळी महिलेने ग्राहकाकडून पैसे घेऊन त्याला तिचा ☞(पान २ वर)